ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष तिसरे । अंक आठवा । ऑगस्ट २०२४

३५ वर्ष
संघटनेची वाटचाल
२०२४




## महा. अंनिस
## ३५ वा वर्धापन दिन

## महा. अंनिसचे विविध उपक्रम



देहदान व अवयवदान अभियान (लासूर)
भास्कर बनसोडे व साथी




नूतन शाखा कार्यान्वित (नागपूर)
गौरव आळणे, विनोद उलीपवार व सहकारी




बकरी ईद निमित्त रक्तदान अभियान (लातूर)
माधव बावगे, रुकसाना मुल्ला, अनिल दरेकर व साथी



बकरी ईद निमित्त रक्तदान अभियान (नंदुरबार)
सुर्यकांत आगळे, बलदेव वसईकर व साथी




विविध संघटनाच्या वतीने बकरी ईद निमित्त
रक्तदान अभियान (पनवेल)



ए.आय.एस.एफ (गडचिरोली) आयोजित शिबिरात
मार्गदर्शन करताना विलास निंबोरकर



प्रशिक्षण शिबीर संपन्न (कोल्हापूर)
कृष्णात, रेश्मा, रामदास, राहुल व साथी



पाक्षिक बैठक संपन्न (सानपाडा)
अशोक निकम, राजेंद्र पंडित व साथी

## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
  पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
  ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- **मुखपृष्ठ**
  विशाल विमल/पुणे
- **स्वागतमूल्य : ₹ २०/-**
- **पृष्ठ संख्या : ४०**

**वार्षिक वर्गणी**

४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)

**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**

**विवेक जागर संस्था**
ICICI **बँक, धुळे**
**खाते नंबर :**646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay



विज्ञान निर्भयता नीती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

आम्ही वारस विवेकाचे

ISSN : 2584-0398

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**

**वर्ष तिसरे । अंक आठवा । ऑगस्ट २०२४**


## अनुक्रमणिका


- **संपादकीय...** ४
- **विचारमंथन**
  - इंडिया आघाडीसाठी संविधानलक्ष्यी राजकारणाचे व्याकरण/ डॉ. यशवंत मनोहर ५
  - भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल (उत्तरार्ध)/ किशोर बेडकिहाळ १४
- **अभिवादन**
  - प्रिय डॉक्टर... / विनायक सावळे २१
- **संघटन**
  - वाढत्या आव्हानांना सामोरे जाण्याचा निर्धार करू या! / माधव बावगे २३
- **जडणघडण**
  - माझे आणि माझ्या पत्नीचे विवेकवादी भान / जगदीश काबरे २५
- **चिकित्सा**
  - सत्संग मेळावे की मृत्यूचे सापळे? / सुशीला मुंडे २८
- **बुवाबाजी**
  - जादूटोण्याच्या संशयावरून खून / विलास निंबोरकर ३२
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३६



'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## ।। सं पा द की य ।।

### शोधायचे, लढायचे आणि भिडायचे देखील...

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निर्घृण हत्येला अकरा वर्षे, तर 'अंधश्रद्धा निर्मूलन' हे ब्रीदवाक्य घेऊन त्यांनी स्थापन केलेल्या महा. अंनिसला पस्तीस वर्षे पूर्ण होत आहेत. डॉक्टरांच्या हत्येनंतर ना त्यांचे विचार संपले ना चळवळ थांबली. उलट संघटना विविध अंगाने विस्तारली. हे सकारात्मक चित्र एकाबाजूला असताना अंधश्रद्धांच्या घटनांमध्ये मात्र वाढ होताना दिसून येत आहे. चमत्कार करणाऱ्या बुवा बाबांची जागा आता नव्या रूपातील फसवणूक करणाऱ्या काही स्वयंघोषित गुरु आणि संप्रदायांनी घेतली आहे. सत्संगाच्या माध्यमातून समाजाला फसवणूकीचा नवा विळखा पडतो आहे. यांना थोपवण्यासाठी सक्षम प्रतिवाद करणारी निर्भीड कार्यकर्त्यांची फळी निर्माण करावी लागेल. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने शोषण, फसवणूक आणि दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करीत सुरु केलेल्या चळवळीने गेल्या पस्तीस वर्षामध्ये आपल्या कामाचा विस्तार पंचसूत्री पर्यंत कधी नेऊन ठेवला, हे कळले देखील नाही. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार, प्रसार आणि अंगीकार करत व्यापक परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेण्यापर्यंतची संघटनेची मजल केवळ कार्यकर्त्यांची झोकून देऊन काम करण्याची आणि निर्भीडपणे संघर्षाला सामोरे जाण्याची तयारी कारणीभूत ठरलेली आहे. डॉ. दाभोलकर नेहमी म्हणत की, 'अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही दशकांची लढाई नसून ती अनेक शतकांची आहे.' याची प्रचिती आजही वारंवार येताना दिसत आहे.

हाथरस येथील घटनेने तर तथाकथित गुरु आणि सत्संग याबद्दल अनेक प्रश्न निर्माण केलेले आहेत. एक बाबा, साकार हरी नारायण अर्थात भोले बाबा प्रवचनाच्या माध्यमातून अडीच लाखांचा समुदाय जमा करतो, प्रभावशाली प्रवचनाच्या माध्यमातून स्वत:च्या पायाची धूळ वेचण्याचा अप्रत्यक्ष आदेश देतो, प्रवचन संपल्यानंतर त्याच्या पायाची धूळ वेचण्यासाठी लाखोंचा समुदाय धावतो आणि प्रचंड चेंगराचेंगरी होऊन १२२ जणांचा मृत्यू होतो. याचा अन्वयार्थ लावायचा कसा? एखाद्या व्यक्तीच्या पायाची माती आपले प्रश्न सोडवू शकते ही धारणा असणारा वर्ग प्रचंड संख्येने येतो हे अचंबित करणारे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार किती जोमाने करावा लागेल, याची प्रचिती अशा घटना अनुभवल्यानंतर येते. यापेक्षा लाजिरवाणी बाब म्हणजे मृत्यूला कारणीभूत असणारा प्रवचनकार बाबा सहीसलामत राहतो. पोलिस कर्मचारी असलेल्या आणि स्वत:ला गुरु म्हणवून घेणाऱ्या बाबाच्या विरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल न होणं हे त्याचे राजकीय लागेबांधे अथवा जातीय हितसंबंध दर्शवतात. सदर घटनेच्या राज्यसभेमधील चर्चेदरम्यान काँग्रेस पक्षाचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्राने केलेला जादूटोणाविरोधी कायदा सर्व देशभर लागू करण्याचे सूतोवाच केले. ही खर तर महा. अंनिसने महाराष्ट्रामध्ये केलेल्या कामाची पोचपावतीच म्हणावी लागेल. कारण, या कायद्याचे सर्व श्रेय समितीचेच आहे. खंत एकच आहे की, कायद्याच्या निर्मितीसाठी डॉक्टरांचा खून व्हावा लागला. डॉ. नरेंद्र दाभोलकर मंगेश पाडगावकरांची कविता नेहमी उधृक्त करत.

माणसे खपाट खंगलेली। आतून आतून भंगलेली।।
अदृश्य दहशतीने तंगलेली। आधार पाहिजे।।

प्रत्येकास येथे हवा। कोणीतरी जबरी बुवा।।
जो काढेल साऱ्या उवा। मनातल्या चिंतेच्या।।

आपण शोधायचे नाही। आपण लढायचे नाही।।
आपण भिडायचे नाही। आयुष्याला।।

ही कविता कालही लागू पडत होती. आजही लागू पडते आणि भविष्यातसुद्धा लागू पडेल. जर आपण अशीच अविवेकी वाटचाल करत राहिलो तर. पण आपणाला हे होऊ द्यायचं नाही. त्यासाठी प्रबोधनाच्या चळवळीचे शिलेदार होणं आणि समाजाप्रति आपली बांधिलकी दृढ करणं हे आपले आद्य कर्तव्य आहे. विवेकाचा आवाज बुलंद करू या!

**– डॉ. नितीन शिंदे**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# इंडिया आघाडीसाठी संविधानलक्ष्यी राजकारणाचे व्याकरण

**यशवंत मनोहर** । नागपूर

धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि वाङ्मयीन अशा सर्वच जीवनक्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या वर्चस्ववृत्तीचा क्षण हा राजकारणाच्याच आरंभाचा क्षण असतो. वर्चस्वामागे व्यक्तिगत वा सामूहिक लालसा उभी असते. लालसेला लोभ, हाव वा स्वार्थ असेही शब्द वापरता येतील. समाजात प्रामुख्य स्थापन करण्याची स्पर्धा ही जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठीच चाललेली स्पर्धा असते. या सत्तास्पर्धेला राजकारण ही संज्ञा वापरली जाते. आर्थिक वा राजकीय अधिराज्य स्थापन करणे हे कारण कधीकधी दडवले जात असले तरी हे अधिराज्य निर्माण करण्यासाठीच खेळल्या जाणाऱ्या खेळाला राजकारण असे म्हटले जाते. या राजकारणाच्या पाठीशी हितसंबंधांची स्पर्धा किंवा युद्ध उभे असते. राजकारणाला या युद्धाचेही आणि युद्धभूमीचेही रूप येते. म्हणूनच राजकारणाला धुरीणत्व प्रस्थापित करण्याचा क्रूर खेळ म्हटले जाते.

**एक :**

दांडग्या चोऱ्या करणे म्हणजे भ्रष्टाचार करणे, प्रभावीपणे खोटे बोलणे आणि लोकांना फसवणे यांचा विकास करण्याच्या धंद्याला प्रामुख्याने राजकारण म्हटले जाते. हे लोकांसाठी होत नाही. म्हणून त्याला स्वार्थकारण म्हटले जाते. हा लोकांसाठी होणाऱ्या राजकारणाचा अंत असतो आणि राजकारण्यांच्या बेफाट, अनिर्बंध आणि अवैध समृद्धीच्या अनीतीकारणाचा अंधारोदय असतो. हे लोकांचे कंगालीकरण आणि राजकारण्यांचे बेहिशोबी समृद्धीकरण असते. राजकारणाची ही वाईट व्याख्या हस्तक्षेपविहीन ठरते तेव्हा देशासाठी आणि लोकशाहीसाठी तो अत्यंत वाईट काळ असतो.

सर्वंकष सत्तेसाठी करण्यात येणाऱ्या युक्त्या वा आखले जाणारे डावपेच वा स्पर्धकांना पराभूत करण्यासाठी तयार केली जाणारी षड्यंत्रे असेही त्यामुळेच राजकारणासंबंधी म्हटले जाते. हे राजकारण सतत वेगवेगळ्या पातळ्यांवर चाललेले असते. या सर्वच स्पर्धकांची भलीबुरी स्पष्टीकरणे असतात. त्यांना आपण त्यांच्या चलाख्या म्हणतो.

**दोन:**

यातले एक राजकारण निखळ व्यक्तिकेंद्री असते. एखादी व्यक्ती बहुसंख्य लोकांच्या हुकमी अज्ञानाच्या बळावर सत्ताधारी होते. अशा राजकारणात धर्मश्रद्धेचा आणि इतरांच्या द्वेषाचा इंधन म्हणून वापर केला जातो. ही स्थिती संबंधित व्यक्तीला एकाधिकारशाहीकडे घेऊन जाते. असा एकाधिकारशहा धर्मासोबतच पक्षाचाही उपयोग आपल्या अघोरी स्वार्थासाठी करून घेत असतो; शिवाय पक्षकेंद्रीही राजकारण असू शकते. तेही धर्माचा उपयोग करून घेत असते. असे पक्षकेंद्री राजकारण नाना पद्धतींनी इतर पक्षांच्या निर्मूलनाची मोहीम राबवत असते. इतर धर्मांना दुय्यमत्व देण्याची मोहीम धर्मकेंद्री राजकारणही राबवत असते. हे धर्मावलंबी आणि पक्षकेंद्री राजकारणही फॅसिझमच्या सापळ्याचेच राजकारण असते. ही सर्व राजकारणे त्या त्या व्यक्तीच्या, धर्माच्या वा पक्षांच्या हितसंबंधांचीच राजकारणे असतात. हितसंबंधांचे परीघ लहान वा मोठे असले तरी ती हितसंबंधांचीच राजकारणे असतात. ही राजकारणे संविधानविरोधी वा लोकशाहीविरोधीच असतात. आणखी एक राजकारण संभवते. त्याला आपण वर्गकेंद्री राजकारण म्हणू, कामगार, शेतकरी, स्त्रिया, मजूर अशा वेगवेगळ्या वर्गाच्या न्यायासाठी राजकारण केले जाते. या राजकारणामागे काही निश्चित भूमिका असतात. वर्गशत्रू कोण वा वर्गमित्र कोण याचे भान या राजकारणाला असते. उदा. शेकापचे राजकारण, भाकप-माकपचे राजकारण इत्यादी.

**तीन :**

आणखी एक राजकारण असते. त्याला आपण सर्वलोककेंद्री राजकारण म्हणू, हे राजकारण सर्व लोकांच्या समान हितसंबंधांचे राजकारण असते. आधीच्या सर्वच राजकारणांचे परीघ छोटे असतात. या सर्वलोककेंद्री राजकारणाचा परीघ असीमच असतो. हे लोकशाहीचे राजकारण असते. ते भारतीय संविधानाचेच

राजकारण असते. या आधीची राजकारणे पक्षपाती असतात. लोकशाहीचे किंवा सर्वलोककेंद्री राजकारण मात्र निःपक्षपातीच असते. हे राजकारण स्त्री-पुरुष वा पुरुष-पुरुष असा भेदभाव करीत नाही. हे राजकारण कोणालाही परके मानत नाही. ते सर्वांनाच आपले मानते आणि पोटाशी धरते. हे राजकारण अभिजन, बहुजन या वर्गवारीपासूनही दूर गेलेले, केवळ सर्वजनकेंद्रीच राजकारण नसते तर ते संपूर्ण जीवनाच्या सांस्कृतिक सलोख्याचे आणि नैसर्गिक पर्यावरणाच्या विधायक संवर्धनाचेच अनिवार्य राजकारण असते. म्हणून ते सकल विश्वाला पोटात वागवणारे आणि सकलांच्या हिताचेच राजकारण असते.

**चार :**

आज आपल्या देशाला असेच धर्मनिरपेक्ष, सद्विवेकवादी आणि निःपक्षपाती राजकारण हवे आहे. हेच खरे विश्वसमांतर राजकारण ठरू शकते. या राजकारणाची आज गरज आहे, पण आज संविधानाला आणि लोकशाहीला अभिप्रेत नसलेले धार्मिक जमातवादी राजकारण पुढे येत आहे. ही परिस्थिती अत्यंत भयावह आहे. हा धर्माच्या नावाने बेबंद झालेला बहुसंख्याकांचा जमातवादच आहे.

धर्मनिरपेक्षतेला आव्हान देणारे, भारताच्या संमिश्र वारशाची संरचना उद्ध्वस्त करणारे आणि विज्ञाननिष्ठेला दयनीय करणारे राजकारण पुढे रेटले जात आहे. लोकांच्या मनातील धर्मश्रद्धेचा दुरुपयोग करून त्यांना संविधानानेच दिलेल्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवले जात आहे. म्हणजे सर्वसामान्य लोकांच्या हितसंबंधांचा बळी देऊन मूठभरांच्या वर्चस्वासाठी या सर्व लोकांना राजकारणविहीन केले जात आहे. व्यक्तीच्या वा एखाद्या पक्षाच्या हितासाठी या सर्वसामान्य माणसांना त्यांच्याच हितसंबंधांपासून परावृत्त केले जात आहे. हे एकविसाव्या शतकात सुरू आहे. वर्चस्ववाद्यांचे हितसंबंध असे अमानुष आणि निर्दय असतात. त्यासाठी भोळ्याभाबड्या लोकांच्या मनातील धर्मश्रद्धांचा ते अत्यंत चलाखीने वापर करून घेत असतात.

**पाच :**

मागल्या काही वर्षांमधील राजकारणातील घडामोडी हे प्रकर्षाने सांगतात की, महाराष्ट्राच्या वा केंद्राच्या पातळीवरही एकपक्षी शासनाचा काळ आता संपलेला आहे. आता राजकारणात आघाड्यांचे युग सुरू झालेले आहे. रालोआमध्ये (एनडीए) सुमारे चाळीस पक्ष आहेत, तर इंडिया आघाडीमध्ये सत्तावीस पक्ष आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत इतके पक्ष असले तरी 'रालोआ' हा कोणताही एक पक्ष नव्हे, ते गठबंधन वा अनेक पक्षांचे संघटन वा आघाडी आहे. 'इंडिया' हाही कोणताही एक पक्ष नव्हे. इंडियाही अनेक छोट्यामोठ्या पक्षांचा समूह वा आघाडी आहे. म्हणजे देशात आता दोन आघाड्यांचे राजकारण सुरू झालेले आहे. आघाड्यांचे कारण कोणत्याही पक्षाला ही खात्री वाटते की, सत्ताप्रस्थापनेसाठी आवश्यक ते बहुमत आपल्याला मिळत नाही. त्यामुळे इतर पक्षांची मदत सत्ता स्थापण्याच्या दृष्टीने घ्यावी लागते. आघाड्यांचा उगम या स्थितीत आहे. हे एका दृष्टीने चांगले घडत आहे असेच म्हणायला हवे. दोन प्रमुख परस्परविरोधी विचारसरणींमध्ये किंवा विचारवर्गामध्ये देश वाटला गेला आहे. एका अर्थी हा मूल्यसंघर्षच आहे. या जीवनरचनेसंबंधीच्या दोन छावण्या आहेत असे म्हणता येईल. हा दोन परस्परविरोधी हितसंबंधांचा कसोटी सामना आहे किंवा मूल्यांचा वर्गविग्रह आहे असे म्हणता येईल.

**सहा :**

इंडिया आघाडी संविधाननिष्ठ आणि लोकशाहीवादी आहे. धर्मनिरपेक्षतेचे, बहुजनकेंद्री आणि त्याहीपुढे जाऊन 'आम्ही भारतीय लोककेंद्री राजकारण इंडिया आघाडीला करायचे आहे.' महागाई, बेरोजगारी, विश्वसमांतर आधुनिक शिक्षणाची परवड आणि धार्मिक-आर्थिक शोषण हे लोकांचे जीवनमरणाचे प्रश्न सोडवायलाच हवेत असे इंडिया आघाडीला वाटते. कोणत्याही धर्माचे राजकारण करून देशाचा संमिश्र वारसा नष्ट करावा आणि देशात कलह माजवावेत असे इंडिया आघाडीला वाटत नाही.

याउलट रालोआ (एनडीए)चे आहे. एकच पक्ष, एकच धर्म आणि एकच नेता असे संविधानाच्या विरोधात जाणारे राजकारण रालोआ करू इच्छिते. त्या दृष्टीने इतिहास बदलणे, शिक्षण बदलणे आणि धार्मिक वातावरणाचा रंग राजकारणाला देणे हे रालोआच्या राजकारणाचे स्वरूप आहे. रालोआ धर्मनिरपेक्षता मानीत नाही. रालोआतील अनेक लोक आम्हाला संविधान बदलायचे आहे आणि मनुस्मृतीचे सर्व कायदे पुन्हा प्रस्थापित करायचे आहेत हे सतत उघडपणे बोलत

असतात.

हे खरे म्हणजे दोन हितसंबंध आहेत. ते परस्परविरोधीच आहेत. एका बाजूला काय वाटेल ते करून अभिजनहितासाठी सत्ता मिळवणारे राजकारण आणि दुसऱ्या बाजूला सर्व भारतीय जनहितासाठी आवश्यक त्या संविधाननिष्ठ सत्तेच्या प्रस्थापनेचे राजकारण असे चित्र आज देशात दिसते. अशा दोन प्रमुख आघाड्या आज देशाच्या राजकारणात कार्यरत आहेत. दोन्ही आघाड्यांना परस्परांची वैचारिक चारित्र्ये चांगली माहीत आहेत. मला असे वाटते की, फार वर्षांच्या नंतर देश आज दोन विचारवर्गामध्ये स्पष्टपणे विभागला गेला आहे. एक वर्ग मूलतत्त्ववादी आहे, तर दुसरा वर्ग मुक्ततत्त्ववादी आहे. एक वर्ग मनुस्मृतीमय आहे तर दुसरा वर्ग संविधानमय आहे. रणांगणावर अनेक पक्षांच्या छावण्या असल्या तर रणांगणच बिनचेहऱ्याचे होऊन जाते. आज राजकारणाच्या रणांगणाला प्रथमच अशी स्पष्टता आली आहे. या अवस्थेतून काही आश्वासने मिळत आहेत. ती आश्वासने संविधानाच्या आणि लोकशाहीच्या अजिंक्यपणासंबंधीचीच आहेत असे मला वाटते.

**सात :**

हे खरे आहे की राहुल गांधी यांनी 'इंडिया आघाडीला' संविधानातील मूल्यांचा आशय आणि आकार देण्यासाठी अपार कष्ट घेतले आहेत. त्यांनी काढलेल्या 'भारत जोडो यात्रा' आणि 'न्याय यात्रा' या भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अपूर्व अशी गौरवघटिते आहेत. या यात्रांच्या माथ्यात संविधानमूल्यांची स्वप्ने आहेत. अडवाणींच्या रथयात्रेच्या डोक्यात मनुस्मृती होती, तर राहुल गांधींच्या डोक्यात भीमस्मृती आहे. राहुल गांधींच्या या यात्रा भारताच्या इतिहासातील आणखी एक नवा टर्निंग पॉईंट आहेत. राहुल गांधींचे हे अनन्य साहस भारतीय राजकारणाची संपूर्ण उलथापालथ करणारे आहे. २०१४ नंतरच्या काळातील ही विधायक परिवर्तनाचीच पाऊले आहेत. या काळात जे करणे अपरिहार्य आहे ते राहुल गांधी करत आहेत. राजकीय कोरोना पसरत होता. त्याला प्रतिष्ठाही मिळत होती. त्याकाळात राहुल गांधींनी मूलतत्त्ववादी राजकारणाच्याविरुद्ध लढाई सुरू केली. ते काँग्रेसचे असले तरी ही लढाई काँग्रेसपुरती त्यांनी ठेवली नाही. तिला व्यापक जनाधार मिळवून देण्यासाठी काँग्रेसचे सीमोल्लंघन करून त्यांनी इंडिया आघाडी ही नवी संग्रामछावणी मल्लिकार्जुन खर्गेसारख्या अनेक वडीलधाऱ्या सहकाऱ्यांच्या सोबतीने स्थापन केली. हा बिंदू भारतीय राजकारणातला अत्यंत सर्जनशील बिंदू आहे. बीजेपीचा चौखूर उधळणारा धर्मांध अश्व रोखण्याचाच हा मुद्दा होता. हा पराक्रम एकट्या काँग्रेसला करता येणे शक्य नाही हे त्यांनी प्राधान्याने घेतले आणि संविधानमित्रांच्या आणि लोकशाहीपुत्रांच्या सहकार्याने 'इंडिया' ही आघाडी निर्माण केली. आता कोणताही एक पक्ष एकधर्मी बीजेपीचा मुकाबला करू शकत नाही. हे ज्या लोकांच्या लक्षात आले, त्यात राहुल गांधी अत्यंत महत्त्वाचे सक्रिय राजकारणी आहेत. एकपक्षातीत पण अनेक पक्षांच्या एकमय राजकारणाचा प्रारंभ त्यांनी ओळखला. मला ही गोष्ट फार महत्त्वाची वाटते. मूलतत्त्ववादाकडे वा चातुर्वर्णी धर्मांधतेकडे भरधाव निघालेले राजकारण थोपवण्याचाच हा मुद्दा आहे. भारतातील अनेक छोट्या प्रादेशिक पक्षांना हे कळत नव्हते असे नाही; पण त्यापैकी कोणताही एकटा पक्ष हे फॅसिझमचे राजकारण थांबवू शकत नव्हता. त्यांची इच्छा मोठी असली तरी कुवत लहान होती. या पार्श्वभूमीवर या सर्व उत्कट इच्छांच्या कुवती एकत्र केल्या तर एक मोठी इच्छा आणि मोठी लढाऊ कुवत निर्माण होऊ शकते हे ज्या नेत्यांच्या लक्षात आले त्यांच्याबद्दल आपण गौरवाचाच शब्द उच्चारायला हवा, असे मला वाटते. विशेषतः त्यांच्या आणि त्यांच्या इतरही जाणत्या सहकाऱ्यांमुळे इंडिया आघाडीला एक निश्चित अर्थ आणि चेहरा प्राप्त झाला. एनडीएविरुद्धच्या आघाडीचे असे निर्माण होणे ही काळाची गरज होती आणि इंडिया आघाडी या सर्वच घडामोडीतून निर्माण झाली. ही एकविसाव्या शतकातील भारतीय संविधानाच्या आणि लोकशाहीच्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना आहे. तिला एक निश्चित ऐतिहासिक मूल्य आहे. तरी इंडिया आघाडी ज्या पक्षांसह अस्तित्वात आली त्यापैकी कोणत्याही एका पक्षात इतर पक्षांनी विलीन व्हावे असा त्याचा अर्थ नाही. काँग्रेससकट इंडिया आघाडीत सामील झालेले सर्वच पक्ष स्वतंत्रही आहेत आणि ते एकजीव इंडिया आघाडीही आहेत असे इंडिया आघाडीला वाटावे.

**आठ :**

'इंडिया आघाडी' ही लोकशाहीला सार्वभौम आणि अजिंक्य करण्यासाठी निर्माण झाली आहे आणि

आघाडीतील सर्वच पक्षांसाठी इंडिया आघाडी ही स्वतःच एक लोकशाही आहे. लोकशाहीची प्रक्रिया तिच्यात अंतर्भूत आहेच. वैदिक येण्यापूर्वीच्या काळात सिंधुश्रमणसंस्कृतीमध्ये गणतंत्रे होती. ती लोकशाहीचीच आद्यरूपे होती. ती आदिम साम्यवादी शासनेच होती. अनेक गणांच्या महानायिका स्त्रियाच होत्या. गणांमधील सर्वांच्या सल्लामसलतीने वा विचारविनिमयाने ही लोकप्रशासने कार्य करीत होती. 'इंडिया आघाडी'ने हे लोकशाही प्रशासनाचे रूप धारण करावे. सर्व सहभागी पक्षांचा समान सन्मान इंडिया आघाडीने करावा. इंडिया आघाडीत लहानमोठे पक्ष असतील; पण तरी त्यांना आघाडीने समस्तरच मानावे. संपूर्ण देशातील लोकांच्या समान हितसंबंधांची प्रस्थापना हे ध्येय असल्याने आघाडीला सर्व पक्षांची संसदच मानावे. त्यांना समजावून घ्यावे आणि लोकशाही मार्गानेच सर्व पक्षांच्या चर्चेतूनच निष्कर्ष काढावेत. लोकशाहीच्या विजयासाठी इंडिया आघाडीनेही प्रथम प्रगल्भ आणि सर्वव्यापी लोकशाही व्हावे. आघाडीत सहभागी झालेले सर्व पक्ष आपले संविधानसहोदर बंधू आहेत हे भान इंडिया आघाडीने मनातून कधी धुसर होऊ देऊ नये.

**नऊ :**

कोणत्याही आघाडीच्या मार्गात एक संकट नेहमीच उभे असते. परस्परांचे दोष काढण्याचे ते संकट असते आणि प्रत्येकच सहभागी पक्ष स्वतःला छान धुतलेले तांदूळ मानत असतो, पण आघाडी या प्रवृत्तीमुळे एकतर तयार होत नाही आणि झाली तर ती तुटूनच जाते. दोष शोधण्यासाठी भूतकाळाचा धांडोळा घेतला जातो. आपल्याला काय करायचे आहे ते विसरून एकत्र येण्याच्या मार्गातील अवरोधांचे संशोधन केले जाते. त्यामुळे खरी आणि मानसिक आघाडी तयारच होत नाही. दूध नासू नये असे वाटत असेल तर त्यात मिठाचे खडे टाकण्याचा विघातक उद्योग आघाडी करू इच्छिणाऱ्यांनी करू नये. दोष प्रत्येक व्यक्तीतही आणि पक्षातही असतात. दोष प्रत्येक घरातील प्रत्येक व्यक्तीतही असतात, पण तेच शोधत बसायचे नसतात. संघटना वा आघाडी मतभेदांच्या, अविश्वासाच्या वा दोषांच्या पायावर उभी राहात नाही. दोष बाजूला सारून चांगल्या गोष्टी शोधायला गेलो तर त्यांची संख्या खरे म्हणजे दोषांपेक्षा कितीतरी पटींनी जास्त असते, पण दोषच शोधणारी प्रवृत्ती ही गोचिडप्रवृत्ती असते. गाईच्या स्तनातून दूध घेता येते; पण ते न घेता गोचिड रक्त प्यायला लागते. ही स्वभावमीमांसा लक्षात ठेवण्यासारखी आहे. आपल्याला गाईचे दूध हवे की गोचिडाप्रमाणे तिचे रक्त हवे याचा स्वच्छ निर्णय आघाडीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी घ्यायचा असतो. दोषशोधकाचे पद्धतीशास्त्रही समजावून घ्यावे. त्याला इतरांचे दोष तीव्रपणे दिसतात, पण स्वतःमधले दोष मात्र त्याला दिसत नाही. 'इतरांच्या डोळ्यातले कुसळही दिसते पण स्वतःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही' तसे हे असते. या प्रवृत्तीमुळे एकत्रीकरण अशक्य होते आणि विलगीकरण मात्र सहज होते. आघाडी होऊ इच्छिणाऱ्यांनी कोळसे उगाळू नयेत. चंदन उगाळावे. तेही तिथे असतेच आणि ध्येयाच्या दृष्टीने तेच जवळही करायचे असते. आघाडी होऊ इच्छिणाऱ्यांनी त्यांना परस्परांपासून तोडणारे मुद्दे बाजूला सारत, त्यांना परस्परांशी जोडणारे मुद्दे अधिक प्रखर करायचे असतात.

**दहा :**

फाळणीकरण टाळण्यासाठी सर्वांच्या समान हिताचा एक सर्वमान्य मसुदा तयार करावा. त्याला ध्येयधोरण स्पष्टपणे सांगणाऱ्या जाहीरनाम्याचे रूप द्यावे. आपला हेतू काय? आघाडीचे ध्येय काय? कशासाठी हे ध्येय? आणि या ध्येयाला प्रत्यक्षात उतरविणारी साधनसामग्री कोणती या सर्व गोष्टींचा विचार यावा. या मोठ्या आणि संपूर्ण भारतीय लोकांच्या समान हिताच्या साध्यासाठी आपण एकत्र आलो आहोत. जबाबदारी मोठी आहे. अतिउत्साहीपणा इथे कामाचा नाही. नेत्यांच्या व्यक्तिगत आकांक्षा वा अहंकार यांचा विघातक संसर्ग पक्षावर म्हणजे पक्षातील लोकांवरही होत असतो. त्यामुळे प्रथम पक्षांच्या नेतृत्वाने विधायक व्हायला हवे. आघाडी होऊ इच्छिणाऱ्या लोकांनी संकुचितता टाळून सुज्ञ उदारमतवाद जवळ करायचा असतो. संबंधित पक्षांनी एक पाऊल मागे घेण्याची तयारी ठेवली तर आघाडीला दोन पावले पुढे जाण्याचे बळ मिळत असते. हे सामंजस्यच नेत्यांना आणि नेत्यांच्या पक्षांना एकत्र गुंफण्याचे कार्य करू शकते.

मोठ्या पक्षांच्या नेत्यांनी हारांसाठी आपलेच गळे आणि पदांसाठी आपलीच नावे पुढे करण्याऐवजी आपल्याही पक्षातील कार्यकर्त्यांना आणि इतरही छोट्या पक्षांमधील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना मुख्य पदे देण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. आघाडी त्यामुळे

अधिक अभेद्य आणि जबाबदार होईल. मोठ्यांचे हात मोठ्या पदांच्या दिशेने जाण्यापेक्षा लहानांना मोठे करण्यासाठी सतत पुढे असावेत. आघाडीची नैतिकता त्यामुळे बुलंद होईल. आघाडीच्या सत्तासंपादनाचा मार्ग कोणी रोखू शकणार नाही. व्यक्तिकेंद्री, धर्मकेंद्री वा पक्षकेंद्री माणसे आघाडीचे नुकसानच करतील ही बाब संबंधितांनी सततच लक्षात ठेवायला हवी. आपला आदर्श लोकशाही असेल तर लोकांनीच तसे आदर्श शासनकर्ते व्हायला हवे. ज्यांनी आजवर सत्ता भोगली, इतरही सर्व प्रतिष्ठा भोगल्या त्यांच्याच हाती पुनःपुन्हा सत्ता देण्याऐवजी सर्वसामान्य लोकांमधून शासनकर्ते तयार करावेत. तशा राजकीय कार्यशाळा निर्माण कराव्यात. धनदांडगे, उच्चवर्णीय आणि अनेक वर्षे ज्यांनी सत्ता भोगली आहे त्यांच्याबाहेर सत्ता फारशी जात नाही. म्हणजे वरील लोकांमध्येच सत्तांतर होते. सत्तेत मूल्यांतर व्हावे असे वाटणाऱ्यांनी आता ज्यांना सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक शोषणाने सतत जाळले आहे आणि ज्यांना संविधान मूल्यांशिवाय दुसरा कोणी वाली नाही अशा लोकांच्या प्रतिनिधींना शासनकर्ते करावे. भारताला, लोकशाहीला आणि संविधानाला अशाच शासनकर्त्यांची गरज आज आहे.

**अकरा :**

धर्मनिरपेक्ष इंडिया आघाडीने स्त्रिया, ओबीसी, बौद्ध, मुस्लीम, आदिवासी, भटकेविमुक्त, ख्रिश्चन, जैन, शीख, शेतकरी, सर्व कष्टकरी आणि तरुणाई या सर्व समूहांना भारतीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजकारण करावे. या लोकांवर वरच्या थोड्या लोकांनी सतत राज्य करण्यापेक्षा या लोकांनाच भारताचे राजकारण करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. त्यांना अभावग्रस्त भारताचे प्रश्न माहीत आहेत. या प्रश्नांच्या आगीत तेही जळत आलेले आहेत. हे लोक शासनकर्ते झाले तरच भारत बदलेल. भारताचे राजकारण बदलेल. हे राजकारण अभावग्रस्तकेंद्री होईल. घराणेशाहीचा याच मार्गाने अंत होऊ शकेल. याच मार्गाने भ्रष्टाचाराचा अंत होऊ शकेल. आम्हीच लोकांसाठी राजकारण करू ही वृत्ती आता वरिष्ठ वर्गातील सर्वच लोकांनी सोडायला हवी. उपेक्षितांच्या हिताचे राजकारण त्यांनाच करू द्या. त्यांचे हित त्यांना ठरवू द्या. संविधानाचा आणि लोकशाहीचा त्यांनी लावलेला अर्थ राजकारणातून साक्षात होऊ द्या. लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले शासन म्हणजे लोकशाही ही व्याख्या लोकांना प्रत्यक्ष जीवनात दिसू द्या. हे झाले की संविधानासंबंधी आणि लोकशाहीसंबंधी उणा शब्द बोलण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही. हे झाले तर देशात खऱ्याखुऱ्या अर्थाने 'लोकांच्या गरजांमधून' निर्माण झालेले लोकशाही राजकारण सुरू होईल.

मनुस्मृतीच्या पुनरुज्जीवनाची समकालीन पार्श्वभूमी लक्षात घेता आज भारतात धर्मनिरपेक्ष सांविधानिक राजकारणाचीच गरज आहे. महाराष्ट्राचा बौद्धिक संदर्भ घेऊन बोलायचे तर हे राजकारण फुले-शाहू-आंबेडकरांचेच राजकारण असणे अपरिहार्य आहे. तेराव्या अनुच्छेदापासून एक्कावन्नाव्या अनुच्छेदापर्यंत संविधानाचे जे तत्त्वज्ञान आलेले आहे आणि ज्या तत्त्वज्ञानाचा संक्षेप संविधानाच्या उद्देशिकेत आहे त्या सर्व सांविधानिक तत्त्वज्ञानाचे राजकारण हेच इंडिया आघाडीचे ध्येय आहे. लक्षणेने हे राजकारण शिवरायांचे, फुले-शाहू-आंबेडकरांचे आणि पेरियार नायकर यांचेच असायला हवे. मी असे मानतो की, हेच भारताच्या इतिहासातील समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता या परंपरेचे इहविज्ञाननिष्ठ राजकारण ठरेल.

**बारा :**

याचा अर्थ इंडिया आघाडीत वरील राजकारणाशी नाते सांगणारे भारतातील सर्वच छोटेमोठे पक्ष असावेत. त्यांना इंडिया आघाडीत प्राधान्यही द्यावे असे मला वाटते. हे सांविधानिक राजकारणच इंडिया आघाडीचे नियंत्रक असावे. हे राजकारणच इंडिया आघाडीची तडजोडविहीन दिशाही असावी आणि हेच राजकारण इंडिया आघाडीचे दिग्दर्शकही असावे. हे राजकारण छोट्यामोठ्या प्रमाणात करणारे देशातले सर्वच पक्ष इंडिया आघाडीत समाविष्ट करता न येणे ही इंडिया आघाडीची नैतिक कमजोरी ठरेल. या सर्व फुले-शाहू-आंबेडकरी वा पेरियारवादी पक्षांना इंडिया आघाडीत सामावून घेतले नाही, तर इंडिया आघाडीसंबंधी लोकांच्या मनात संभ्रम आणि शंका निर्माण होतील. त्यातून इंडिया आघाडी कमकुवत होत जाईल. तिची नैतिक बैठकच शंकास्पद ठरेल.

इंडिया आघाडीबाहेर ठेवले गेलेले पक्ष भाजपात जाणार नाहीत; पण तरी ते इंडिया आघाडीचे आपापल्या पातळीवर नुकसान करू शकतील. ते इंडिया आघाडीबाहेर असणे इंडिया आघाडीच्या उद्दिष्टाच्या

दृष्टीने हानीकारकच आहे. म्हणून सर्व पक्षांना एकमय करणे ही इंडिया आघाडीचीही गरज आहे आणि या आघाडीबाहेर ठेवल्या गेलेल्या संविधाननिष्ठ पक्षांचीही गरज आहे. त्यांना बाहेर ठेवणे इंडिया आघाडीच्या अहिताचे ठरेल. प्रकाश आंबेडकर, मायावती, वामन मेश्राम, चंद्रशेखर आझाद आणि असेच इतरही पक्ष इंडिया आघाडीच्या बाहेर असणे हे इंडिया आघाडीसाठी अजिबात हितावह नाही. फुले-शाहू-आंबेडकरी विचारसरणी तत्त्वतः भारतातील परिवर्तनाच्या सर्वच चळवळींचे बौद्धिक नेतृत्व करू शकणारी आणि संविधानाच्या राजकारणाचा मार्ग बलशाली करणारी विचारसरणी आहे. मंडल आयोग, भूमिहिनांचा सत्याग्रह, रिडल्सचे आंदोलन, संविधानाचा लढा या सर्व पातळ्यांवर सर्वात आधी या चळवळीमधील कार्यकर्त्यांनीच उडी घेतली आहे. देशाच्या संविधानकाराच्या भूमिकेवर अपार निष्ठा असलेले हे लोक आहेत. शिवाय त्यांच्यासोबत सर्वच संविधाननिष्ठ लोक जुळलेले आहेत. त्यात मुस्लीम, आदिवासी, भटके- विमुक्त, ओबीसी असे सर्वच आहेत. भूमिहिनांचा लढा, मनुस्मृतीदहनाचा लढा, नामांतराचा लढा, रिडल्सचा लढा अशा सर्वच लढ्यांमध्ये वरील सर्वच समूह सहभागी झालेले आहेत. या सर्वच योद्ध्या लोकांना इंडिया आघाडीने बाहेर ठेवणे योग्य नव्हे. ते तिच्यासाठी कोणत्याही अर्थाने सोयीचे नाही.

मी तर असे म्हणेन की, इंडिया आघाडीने या सर्वांनाच सन्मानाने जोडून घेतले तरी एवढ्यामुळेही रालोआ (एनडीए) ला ओहोटी लागेल. रालोआ म्हणजे मनू आणि इंडिया आघाडी म्हणजे संविधान असे क्रांतिकारी समीकरण भारतापुढे सहज तयार होईल आणि इंडिया आघाडीच्या विजयाचा दिवस उगवेल. नितीशकुमार, चंद्राबाबू नायडू यांना इंडिया आघाडीचे संविधान समजावून सांगावे, आज राजकारणात कशाची आणि का गरज आहे हे त्यांनाही समजावून सांगावे. योगेंद्र यादव, सुहास पळशीकर, गोपाळ गुरू अशा तज्ज्ञांसोबत त्यांची बैठक घडवून आणावी. त्यांना इंडिया आघाडीत समाविष्ट करून घेण्यासाठी यंत्रणा राबवावी. भारतात मूल्यांतर होईल. राजकारण बदलेल. ही खात्री मला आहे.

**तेरा :**

निवडणुकीत इंडिया आघाडीतील सहभागी पक्षांची फक्त नावे देऊ नयेत. इंडिया आघाडी काँग्रेस, इंडिया आघाडी राष्ट्रवादी, इंडिया आघाडी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, इंडिया आघाडी वंचित बहुजन आघाडी, इंडिया आघाडी बसपा, इंडिया आघाडी तृणमूल काँग्रेस, इंडिया आघाडी आमआदमी पार्टी अशीच नावे द्यावी. इंडिया आघाडी हे प्रत्येक पक्षाचे इलेक्शन शीर्षक असावे. काँग्रेस-राष्ट्रवादीमधील विखे, भुजबळ, अजित पवार, अशोक चव्हाण अशी नेते मंडळी बीजेपीकडे सरकली. कोणीही सिद्ध करायच्या आधी त्यांनीच स्वतः आपण भयानक भ्रष्टाचारी आहोत हे सर्व लोकांना सांगून टाकले आहे. ही बीजेपीशी साधली जाणारी जवळीक कोणत्याही अर्थाने वैचारिक नव्हे. ती जवळीक संरक्षणासाठी आहे, पण हे या लोकांना का करावेसे वाटते? हे लोक दोनदा संविधानद्रोही ठरले आहेत. भ्रष्टाचार केला तेव्हा एकदा आणि बीजेपीला शरण गेले तेव्हा दुसऱ्यांदा. हे लोक लोकशाही मानत नाहीत ही गोष्टच त्यातून सिद्ध होते. राजकारणातील लोक लोकांचा पैसा घरी नेतात. कुठलेही उत्पादन न करता हजारो कोटीची संपत्ती जमवतात. ही मानसिकता लोकशाहीची नव्हे. ही लोकांशीही केलेली बेइमानी आहे. असे शासनकर्ते देशाचे वाटोळे करण्याशिवाय दुसरे काहीही करू शकत नाहीत.

इंडिया आघाडीने आमचे राजकारण स्वच्छपणे भारतीय संविधान मूल्यांचेच राजकारण आहे हे स्पष्ट करावे. हे राजकारण फुले-शाहू-आंबेडकरांचे, पेरियार नायकरांचे आणि शिवरायांच्या मूल्यांचेच राहील यासाठी झटावे. आमदार, खासदार, मंत्री होण्यापूर्वीच्या संपत्तीत पुढल्या पाच वर्षांत कोणतीही वाढ होणार नाही ही काळजी प्रत्येकाने घ्यावी. हा लोकशाही आदर्श घालून द्यावा. लोकांचा पैसा घरात भरणारा शासनकर्ता अमानुषच असतो. तो लोकशाहीचा आणि संविधानाचा मारेकरीच असतो. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातीलही नाते या संदर्भात विरोधाचे नसते. 'एकमेकां साह्य करू, अवघे खाऊ मलिदा' असाच हा विघातक सलोखा असतो.

**चौदा :**

भ्रष्टाचार ही हिंसाच असते. खोटे बोलणारे लोक सत्याची हिंसाच करीत असतात. भ्रष्टाचाऱ्यांना आणि खोट्यांना संरक्षण देणारे लोक हिंस्रच असतात. सर्वसामान्य माणसांना संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार त्यांच्यापर्यंत जाऊ न देणे ही हिंसाच असते.

साध्य आणि साधने दोन्हीमध्ये सलोखाभान असावे. साध्यही जोडणारे आणि अहिंसक असावे. साधनेही जोडणारी आणि अहिंसकच असावीत.

साध्य एकमय व्हावे असे वाटत असेल तर आपली भाषाही नव्या जोडणीचीच असावी. त्यासाठी आपल्या भाषेला काही पथ्ये पाळावी लागतील. आपल्या अस्मिता जपूनही आपल्या अस्मितांची ताकद वाढवणारी एकमय महाअस्मिता हे आपले ध्येय आहे हे प्रत्येक सहभागी पक्षाला वाटले पाहिजे. सर्व पक्ष वेगवेगळे असले तरी त्यांचा इंडिया आघाडी हा सूर एकच असला पाहिजे. 'आम्ही भारतीय लोक' बहिणीबहिणी आणि भाऊभाऊ आहोत. आमची शरीरे, आम्ही राहातो ती ठिकाणे वेगवेगळी असली तरी आम्ही एकहृदय आणि एकचित्तच आहोत, असे प्रत्येक पक्षाला वाटायला हवे. इंडिया आघाडी हाच आम्हा सर्व पक्षांचा एकमय पक्ष आहे. इंडिया आघाडीच्या विजयातच आमचा विजय आहे. इंडिया आघाडीतच संविधानाचा आणि लोकशाहीचाही विजय आहे. आम्ही संविधानाची भक्ती करीत नाही. पूजा करीत नाही. आम्ही संविधान जगतो. डोक्यात मनुस्मृती आणि ओठात संविधान अशी आमची दुटप्पी वृत्ती नाही हे सिद्ध व्हायला हवे.

मतभेद असतातच, पण मतभेदांसह आम्ही एका समान ध्येयासाठी एकत्र आलो आहोत. आमच्यातील छोट्या-छोट्या मतभेदांपेक्षा आम्हाला इंडिया आघाडीचे ध्येय महत्त्वाचे वाटते, याचे कारण आम्हाला भारत हा आमचा देश महत्त्वाचा वाटतो आणि आमच्या भारताच्या सर्वसन्मानासाठी आम्हाला आमचे संविधान आणि आमची लोकशाही महत्त्वाची वाटते. म्हणूनच आम्ही आमच्यातील किरकोळ मतभेद बाजूला सारून इंडिया आघाडी झालो आहोत असे सर्व पक्षांना वाटायला हवे.

**पंधरा :**

२०२४ च्या निवडणुकीत इंडिया आघाडीला बहुमत मिळाले असते तर इंडिया आघाडी आज सत्ताधारी असती, पण त्यासाठी २७ ची संख्या इंडिया आघाडीला पन्नास करता यायला हवी होती. राजकीय मुत्सद्देगिरीचा तोही एक अतुल्य नमुना ठरला असता, पण ते झाले नाही. इंडिया आघाडी सत्तेत आली असती तर इंडिया आघाडीतील सर्वच पक्ष सत्ताधारी झाले असते. त्यांचे स्वतंत्र अस्तित्वही सुरक्षित असते आणि इंडिया आघाडी म्हणून ते सत्ताधारीही झाले असते.

२०२४ च्या निवडणुकीत भारतीय लोकांनी एनडीएलाही वा इंडियालाही बहुमत दिले नाही. त्यामुळे एनडीएला नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांच्या मदतीने सरकार स्थापन करावे लागले आहे. इंडिया आघाडीला बहुमत असते तर नितीशकुमार आणि चंद्राबाबू इंडिया आघाडीच्या बाजूने आले असते. सत्ताकांक्षी मने सत्तेकडेच झुकतात. ताकद वाढायला लागली की ती वाढतच जाते. आज ते सत्तेसाठी इष्ट मूल्यांचा बळी देत आहेत. इंडिया आघाडी बहुमतात असती तर त्यांच्यावर ही वेळ आली नसती.

छोट्या-मोठ्या प्रत्येक पक्षातील लोकांना आपल्या पक्षाचा गौरव वाटणे स्वाभाविकच असले तरी या गौरवाचे रूपांतर सत्ताविहीनतेत होऊ नये. हा गौरव अधिक अर्थपूर्ण ठरण्यासाठी संविधानाच्या महाशक्तीशी त्यांनी जुळायला हवे. आजच्या स्थितीत स्ट्रॅटेजी बदलायला हव्यात. समीकरणे बदलली आहेत. डावपेच बदलायला हवेत. राजकारण्यांच्या आणि पक्षांच्या जीवनात शेवटचा डावपेच कधीच येत नसतो. बदलत्या गरजांच्यानुसार आपल्या संविधानकेंद्री भूमिकेला धक्का न लावता डावपेच बदलायला हवेत. सत्ता हे ध्येय कशासाठी आहे? देशातील सर्वच लोक आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच दृष्टींनी समस्तर व्हावेत. भारत जातिविहीन, वर्णविहीन, वर्चस्वविहीन, शोषणविहीन, स्त्रीपारतंत्र्यविहीन, महागाईविहीन, बेकारीविहीन, द्वेषविहीन, असहिष्णुताविहीन व्हावा. भारत सर्वांचा आहे. देशातील प्रत्येकाचेच नाव भारताच्या भूमीवर लिहिले आहे. संविधानाच्या प्रत्येक अनुच्छेदातून सर्वच भारतीयांचे चेहरे रेखाटलेले आहेत. ते जपण्यासाठी राजकारण हवे. आज सर्वांच्या समान आणि सन्मानदायी हितसंबंधांचेच राजकारण हवे. कोणालाही उण्या नजरेने बघितले जाऊ नये. परिघावर आणि परिघाबाहेर हे शब्द मिटवून इंडिया आघाडीने देशाला एकप्रवाही, समस्तर वा मुख्यप्रवाही करावे. संविधानमय करावे.

**सोळा :**

इंडिया आघाडी ही जातींची वा धर्माची आघाडी नव्हे, असेच आघाडीतील सर्व पक्षांच्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे वागणे, बोलणे असावे. जे लोक जाती पाळतात ते लोकशाहीचे विरोधक आणि संविधानद्रोहीच असतात. आघाडीतील सर्वच पक्षांच्या मनात

सर्वपक्षसमभाव असावा. प्रत्येकच पक्ष स्वतःला सर्वश्रेष्ठ मानायच्या नादात मग्न होत असेल तर असा कोणताही एकटा पक्ष आज सत्तेपर्यंत पोचूच शकत नाही आणि सत्तेपर्यंत पोचू शकेल अशा प्रवाहात तो या श्रेष्ठत्वगंडामुळे सहभागी होऊ शकत नाही. मग 'तुला न मला घाल कुत्र्या'ला या स्थितीची निर्मिती होते. मनुस्मृतीचे राज्य आणू पाहाणाऱ्या लोकांच्या हातात सत्ता जाते. जातीला, वर्णाला, पक्षाला श्रेष्ठ करण्याच्या नादात हे सर्वच अहंकार संविधाननिष्ठांच्या पराभवाची निर्मिती करतात आणि सत्ताविहीन होतात. इंडिया आघाडीत सहभागी होणाऱ्या सर्व पक्षांनी जातीधर्माच्या भाषेत बोलू आणि वागू नये. स्वतःला 'आम्ही भारतीय लोक' म्हणजेच आम्ही इंडिया आघाडीचे लोक म्हणावे. तशी एकमयतेची परिभाषाच निर्माण करावी.

मी हे सांगायला हवे की, महाराष्ट्रात महाविकास आघाडी हे इंडिया आघाडीचे राज्यपातळीवरचे रूप आहे, पण शरद पवार, उद्धव ठाकरे, पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले अशा सर्वच नेत्यांनी 'इंडिया आघाडी महाराष्ट्र' असेच म्हणवून घ्यावे. जे तुमच्या मनात असते तेच तुमच्या भाषेत येते. जे तुमच्या मनात असते तेच तुमच्या वागण्यातून प्रकट होते. आपल्या मनात सर्वच पातळ्यांवरील भेदभाव असला तर तो आपल्या वागण्या-बोलण्यातून लोकांपर्यंत जाणारच आणि इंडिया आघाडीचेही मग लोकशाहीविरोधी वा संविधानविरोधी रूपच प्रकट होणार, हे बीजेपीशी जुळणारे आपले रूप इंडिया आघाडीतील सर्वच पक्षांतील लोकांनी विसर्जित करण्याची पहिली गरज आहे असे मला वाटते.

**सतरा :**

आपण इंडिया आघाडीत सहभागी न होता स्वतंत्रपणे निवडणूक लढविली, तर आपल्या या राजकीय वर्तनाचा सत्ताप्रस्थापनेसाठी एनडीएला लाभ होईल की, इंडियाला लाभ होईल याचा विचार करणे हे आज आवश्यक अशा राजकीय मुत्सद्देगिरीचे लक्षण ठरेल. जर मनुस्मृतीवाल्यांना कळतनकळत आपला उपयोग होत असेल तर आपण संविधानाच्या आणि लोकशाहीच्या विरोधात आणि मनुस्मृतीवाल्यांच्या हिताचे काम करीत आहोत असाच त्याचा अर्थ होईल. आपण पक्ष म्हणून स्वतंत्र पण ध्येय म्हणून इंडिया आघाडीचा अविभाज्य भाग आहोत, हे इंडिया आघाडीतल्या प्रत्येकच पक्षाचे अभेद्य धोरण असायला हवे. आपली या ना त्या प्रकारे बीजेपीला मदत होत असेल तर आपण मनुस्मृतीच्या श्रेणीबद्ध छावणीत शिरलो आहोत, इच्छा नसताना आपल्या अप्रगल्भतेमुळे आपण विषमतेचा आणि शोषणाचा सक्रिय भाग झालो आहोत असाच त्याचा अर्थ होईल.

**अठरा :**

घराणेशाही आणि लोकशाही या गोष्टी परस्परमारकच आहेत. राजकारणासकट इतर कोणत्याही क्षेत्रातील घराणेशाही लोकशाहीविरोधीच असते. 'लोकशाहीतील' वा 'आम्ही भारतीय लोक'मधील लोक म्हणजे कुटुंबातील वा परिवारातील लोक नव्हेत. भारतीय संविधानाने कुटुंबाची वा परिवाराची संकल्पना भारतव्यापीच केली आहे. भारत हे आमचे कुटुंब आहे आणि या कुटुंबातील सदस्यांमध्ये भेदभाव करणे हे लोकशाही मनाचे वा सांविधानिक मनाचे लक्षण नसते. असे झाले तर संविधानाने भारताला एकसंध कुटुंब मानले; परंतु या कुटुंबाचा भाग होऊ न शकलेली माणसे त्यांच्या कुटुंबालाच भारत मानतात. हे असीमाला सीमित करणेच असते. हे एकमय भारतीय कुटुंबाला लपूनचोरून अनेकमय इजा करणेच असते. भारतासाठी त्याग करण्याच्या वृत्तीचा इथे अभावच असतो. कुटुंबापुरता आणि घराण्यापुरताच स्वार्थी विचार माणसांना लोकशाहीपर्यंत पोचूच देत नाही. त्या त्या पक्षाचे सर्व प्रमुखही मग लोकशाहीविरोधीच वर्तन करीत असतात. त्यांचा देश वा त्यांची लोकशाही त्यामुळे घराण्याच्या वा कुटुंबाच्या चौकटीतच संपून जाते. त्यांच्याच पक्षात त्यांच्या घराण्यातील लोकांपेक्षा कितीतरी बुद्धिमान, निष्ठावान, त्यागशील आणि अभ्यासू कार्यकर्ते असतात. खूप कार्यकर्ते जिनिअस असतात. ते सभांच्या आयोजनासाठी, मोर्च्यात घोषणा देण्यासाठी वा नेत्यांचा गौरव करण्यासाठी वापरले जातात. कारण ते घराण्याबाहेरचे असतात. घराणे आणि जात यांच्याबाहेर राजकीय टॅलेंट नसते का? असते. घराण्यातील लोकांपेक्षाही ते जास्त असते, पण या टॅलेंटचा सन्मान करण्याची राजकीय दानत नेत्यांमध्ये नसल्याने स्त्रिया, आदिवासी, भटकेविमुक्त, मुस्लीम, बौद्ध, ओबीसी या सर्वच समूहांमधील टॅलेंट दुर्लक्षित राहते आणि ते टॅलेंट घोषणा देण्याच्या महान कार्यातच संपून जाते. हे अन्याय्य आणि विघातकच राजकारण आहे. आपण जी अफाट संपत्ती भल्याबुऱ्या मार्गांनी जमवली तशी इतरांना जमा

करता येऊ नये. ती तशी जमा करता आली तर इतर समूहांतील लोक आपले प्रतिस्पर्धी होतात. राजकीय शक्ती सर्व उपेक्षितांकडे जाते. हे होणे मक्तेदार म्हणून आपल्या अहिताचे आहे असे घराण्याच्या मुखंडांना वाटत असते. अर्थात, घराणेशाहीचा हा संसर्ग केवळ काहीच समूहातील राजकारणधुरंधरांना झाला आहे असे नाही. हा मगरूरीप्रवर्तक कुप्रभाव वा संसर्ग छोट्याछोट्या बहुतेक सर्वच पक्षांमधील नेत्यांपर्यंत यशस्वीपणे पोहोचला आहे. नावे देत नाही, कारण अख्ख्या महाराष्ट्राला आणि देशालाही ती माहीत आहेत. अशा घराण्यातील केवळ प्रमुखच हजारोलाखो कोटींचे मालक असतात असे नाही, तर त्यांच्या कुटुंबातील सर्वच छोटेमोठे लोक शेकडोहजारो कोटींचे धनी असतात. कोणतेही उत्पादन न करता ही श्रीमंती नेत्यांच्या कुटुंबातील लोकांना मोफत मिळत असेल तर घराणेशाहीशी फारकत कोण आणि कशी घेणार?

**एकोणीस :**

हा पैसा घराणेग्रस्तांना त्यांच्या बेचाळीस पिढ्यांच्या सोयीसाठी, निवडणुकांसाठी आणि गडगंज वैभवासाठी लागतो. इथे लोकशाहीतील लोकांचा पैसा आपला करून घेण्याचे महान कौशल्य महत्त्वाचे ठरते. हा लोकद्रोहही असतो. लोकशाहीद्रोहही असतो. याला राजकारण म्हणता येत नाही. ते अमानुष अर्थकारण असते आणि घराणे या फक्त त्यांच्याच विश्वापुरते मर्यादित असते. त्यातून भ्रष्टाचार बोकाळतो. भ्रष्टाचार म्हणजे हजारोलाखो कोटींच्या चोऱ्या. या सर्वांमुळेच लोकशाही पांगळी आणि संविधान दयनीय होते. ही भीषण हिंसाच असते. या चौर्यकारणाला राजकारण म्हणताच येत नाही.

भ्रष्टाचार म्हणजे महाचोरी! अशा महाचोऱ्या करणारे लोक 'भारतीय लोकांचीच' संपत्ती चोरतात. हे देश चोरण्यासारखेच आहे. महाचोऱ्या करून हे दरोडेखोर भारताचेच कंगालीकरण करीत असतात. भुरट्या छोट्या चोरांना शिक्षा करण्यासाठी कायदा तत्पर असतो; पण या महाचोरांना शिक्षा करताना कायदा झोपी जातो. हे महाचोर राजकारण करण्यासाठी राजकारणात जात नाहीत. तेवढी बौद्धिक ऐपतच त्यांच्याजवळ नसते. ते राजकारणाला कमाईचे मुक्त कुरण मानतात. त्यांच्यासाठी राजकारण फक्त शोषणकारण असते. त्यांच्यासाठी राजकारण हा माल जमवण्याचा धंदा असतो. गडगंज अज्ञान असल्याशिवाय कोणीही या गडगंज लोकांना मत देता येणे शक्य नाही. लोकशाही आणि घराणेशाही यातले अंतर या लोकांनी पुसूनच टाकलेले असते. लोकशाहीतील 'लोक' हे पूर्वपद 'घराणे' या अर्थानेच ते वापरत असतात. त्यामुळे मतदारांना बहुधा या चोरांमधूनच निवड करावी लागते. त्यासाठी अनेक मतदार चोरांकडून पैसे घेतात. याप्रकारे मत मिळविण्यासाठी हे चोर लोकांकडूनच चोरलेला पैसा लोकांना थोड्या प्रमाणात परत करतात.

**वीस :**

निवडून आलेली व्यक्ती अल्पकाळातच सरंजामदार होते आणि संपूर्ण राजकारण मग या नवसरंजामदारां- भोवती त्यांच्या तालावरच नाचत राहाते. हे झाले की लोकांना समान हितापर्यंत पोचवणारी लोकशाही या लोकांमुळे मरूनच जात असते.

हिंसा म्हणजे मानसिक वा शारीरिक छळ! हिंसा मनांचीही आणि शरीरांचीही हत्या करते. विषमता ही हिंसाच असते. द्वेष ही हिंसाच असते. अस्पृश्यता, स्त्रीपुरुषविषमता आणि इतरांसंबंधीची तुच्छता ही हिंसाच असते. सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि वाङ्मयीन शोषण ही हिंसाच असते. दुजाभाव, असहिष्णुता आणि वर्चस्व ही हिंसाच आहे आणि या संदर्भात मनुस्मृतीएवढा हिंसक ग्रंथ जगात दुसरा नाही. मनुस्मृतीची विषमतावादी पूर्वोत्तर परंपरा ही समता, सभ्यता, सद्भाव आणि संस्कृती मारणारी हिंसाच आहे. प्रेम, सत्य, समता, आपलेपणा आणि समानुषता ही अहिंसा आहे तर असत्य, द्वेष, आपपरभाव, लोकांची फसवणूक करणे, त्यांना अज्ञानी ठेवणे, त्यांना मूर्ख बनवणे ही घोर हिंसाच असते.

इंडिया आघाडीने अशी हिंसा कधीही मान्य करू नये. असत्य शिरजोर, मुजोर असले तरी दुबळेही असते आणि विघातकही असते. सत्य प्रशांत असते. तेच अजिंक्य आणि विधायकही असते. असत्य जास्त बोलते. सत्य मुलांची काळजी वाहणाऱ्या बापासारखे कमी बोलणारे आणि जास्त हितमय असते. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सर्वहितमयता याहून मोठे सत्य जगात नाही. इंडिया आघाडीने स्वतःला असे सत्यमय समजावे आणि न्यायाच्या प्रस्थापनेसाठी निर्वाण मांडावे हीच सदिच्छा!

**(लेखक ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक आहेत.)**

●

# भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल (उत्तरार्ध)



**किशोर बेडकिहाळ** । सातारा
९७७५०२०९४४

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या इस्लामपूर येथील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत दि. ३१ मे २०२४ रोजी ज्येष्ठ विचारवंत मा. किशोर बेडकिहाळ यांनी 'भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल' या विषयावर मांडलेले विचार.**

मागील लेखाच्या शेवटी आपण पाहिले की, एकछत्री ब्रिटिश अंमलाखालील भारतात राष्ट्रवादाची जाणीव निर्माण झाल्यानंतर जी स्वातंत्र्य चळवळ उभी राहिली त्या काळात राष्ट्रवादाचे महत्त्वाचे चार प्रवाह निर्माण झाले. पहिला प्रवाह सामाजिक सुधारणावादाचा, दुसरा आर्थिक राष्ट्रवादाचा, तिसरा राजकीय राष्ट्रवादाचा तर चौथा प्रवाह हा क्रांतिकारक राष्ट्रवादाचा होता. मागासलेल्या आणि प्रचंड गरिबी, निरक्षरता, अज्ञान असलेल्या, इतके दारिद्र्य असलेल्या देशात प्रत्येकाच्या हाती शस्त्र देणे शक्य नाही आणि इंग्रज ते देऊ देणार नाहीत. त्यामुळे क्रांतिकारक राष्ट्रवादाऐवजी दुसरा कुठलातरी मार्ग शोधायला पाहिजे होता.

सामाजिक सुधारणांचा प्रवाह, आर्थिक राष्ट्रवाद आणि राजकीय राष्ट्रवाद यांचा हा एक गट पाहिला तर तो न्या. रानडे, गोखले, लोकहितवादी अशा नेमस्तांचा होता. त्यांचा मार्ग अगदी आरंभीच्या काळातला म्हणजे नियमाने, कायद्याने, अर्ज, विनंत्या करून चालणाऱ्यांचा होता. आपण ब्रिटिश साम्राज्याचे नागरिक आहोत, अशी त्यांची मान्यता होती आणि म्हणून आपल्या राज्यकर्त्यांकडे त्यांनी आपल्या मागणीच्या रूपात दाद मागितली. अशी नेमस्त जाणीव इथल्या सुशिक्षितांमध्ये निर्माण झाली एवढेच त्यांचे मर्यादित महत्त्व आहे. दुसरा गट क्रांतिकारक राष्ट्रवादाचा होता, तो सगळ्यांना परवडणारा नव्हता आणि म्हणून तिसरा मार्ग लोकमान्यांनी शोधला, तो प्रतियोगी सहकारितेचा होता. म्हणजे ब्रिटिश जेवढे सहकार्य करतील तेवढाच प्रतिसाद आम्ही देऊ आणि आम्ही केलेल्या सहकार्याच्या बदल्यात ब्रिटिशांनी आम्हाला वासाहतिक स्वराज्य द्यावे, अशी लोकमान्यांची भूमिका होती. १९३० पर्यंत सर्व भारतीय नेत्यांची स्वातंत्र्याबद्दलची भूमिका अशीच वासाहतिक स्वराज्याची होती. म्हणजे कसे? त्यावेळी कॅनडा, ऑस्ट्रेलिया किंवा दक्षिण आफ्रिका अशा वसाहती स्वतंत्र होत्या. पण त्यांचा गव्हर्नर इंग्लंडच्या राणीचा होता. राणीच्या अधिपत्याखाली हे देश होते. ते स्वतः निर्णय करीत, स्वतःच्या निवडणुका घेत. स्वतःचे पार्लमेंट तयार करीत असत. पण इंग्लंडच्या राणीचे अधिपत्य मान्य करीत. तसे स्वराज्य आम्हा भारतीयांना द्या, अशी भूमिका १९३० पर्यंत होती.

भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर या क्षणाला गांधींच्या जोडीला पंडित जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस आले. त्या काळामध्ये हा वासाहतिक स्वराज्याचा मुद्दा मागे पडला आणि नेहरू व बोस यांनी संयुक्तपणे मागणी केली की, आम्हाला वासाहतिक स्वराज्य नको; आम्हाला संपूर्ण स्वराज्य हवे आहे. संपूर्ण स्वराज्याचा अर्थ ब्रिटिशांचा आमच्या राज्यकारभाराशी कोणताही संबंध असता कामा नये. आम्हाला ब्रिटिशांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष किंवा कोणत्याही स्वरूपाचे अधिपत्य नको आहे. आमच्या राज्यकारभाराचा सगळा व्यवहार आम्हीच बघू; आमची पदे आम्ही निर्माण करू. आम्हाला संपूर्ण स्वराज्य हवे आहे. इथे स्वातंत्र्यलढा पहिल्या टप्प्यातून राष्ट्रवादाच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये सरकतो आणि संपूर्ण स्वराज्यासाठीचे आंदोलन इथून सुरू होते. त्यात दांडीचा सत्याग्रह येतो. त्यानंतर गांधीजींची असहकारितेची आंदोलने, 'छोडो भारत'ची प्रचंड मोठी चळवळ; असा हा दुसरा टप्पा आहे. या दोन्ही टप्प्यांमधून जात असतानाच्या काळात (देश पारतंत्र्यात असूनही) आपल्याला लोकशाहीची सवय होत राहिली. या वाटचालीतून हळूहळू ज्या संस्था निर्माण झाल्या त्या निवडणुकांच्या मार्गाने ताब्यात घेण्याचा उपक्रम आपल्या राजकीय पक्षांनी केला. त्यांच्यामध्ये काँग्रेस, हिंदू महासभा, त्यावेळचा कम्युनिस्ट पक्ष, असे अनेक पक्ष होते. या संस्था भारतीयांनी चालवल्या पाहिजेत, अशी या पक्षांची भूमिका होती.

जेव्हा वासाहतिक साम्राज्याअंतर्गतच स्वराज्याची

मागणी होती तेव्हाच या मागणीवर १९२४ मध्ये जो व्हाईसरॉय होता तो तुच्छतेने असे म्हणाला होता की, 'तुम्हाला हे राज्य स्वतःच चालवायचे ना, मग तुम्ही राज्यघटना निर्माण करून दाखवा'. ते आव्हान स्वीकारले गेले. १९२८ मध्ये काँग्रेसचे सदस्य मोतीलाल नेहरू यांच्या अधिपत्याखाली 'नेहरू आयोग' नेमण्यात आला. मोतीलाल नेहरू आयोग सर्वपक्षसमावेशक होता. जवाहरलाल नेहरू आयोगाचे सचिव झाले. नेहरू आयोगाने अल्पावधीमध्ये जो अहवाल तयार केला तो 'नेहरू रिपोर्ट' म्हणून प्रसिद्ध आहे. तोच नेहरू रिपोर्ट मागणी होत असलेल्या भारताच्या संपूर्ण स्वराज्याच्या राज्यघटनेचे प्रारूप ठरला. त्या प्रारूपामध्ये जातिभेद, वर्णभेद, शोषण, साम्राज्यवाद यांना विरोध, तर (जात, धर्म, वर्ण, लिंग, प्रदेश आदींच्या निरपेक्ष) समान नागरिकत्व, (जेव्हा अमेरिकेत सुद्धा स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळालेला नव्हता) आर्थिक आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार, या सगळ्या बाबी समाविष्ट आहेत. नेहरू रिपोर्टमधील प्रत्येक शब्द जरी ब्रिटिशांकडून त्यावेळी मान्य झाला नसला तरी त्यात सुचवलेले एकंदरीत जे प्रारूप आहे तेच पुढे स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे प्रारूप ठरले. म्हणून राज्यघटनेचा विकास कसा होत गेला हे पाहायचे असेल तर नेहरू रिपोर्टपासून पुढे जावे लागते.

पुढे १९३१ मध्ये कराचीला काँग्रेसचे जे अधिवेशन झाले त्यात या भारतातल्या नागरिकांना मूलभूत हक्क, समान नागरिकत्व, आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळावा यासाठीचे ठराव झाले. तेव्हापासूनच देश आणि स्वातंत्र्य चळवळ, राष्ट्रवादाची सबंध वाटचाल एका वेगळ्या टप्प्यावर गेली. या टप्प्यावरील वाटचाल आधीच्या टप्प्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जी जनआंदोलने झाली त्या टप्प्यापेक्षा वेगळी होती. जसे जहाल टिळकांचे जहाल म्हणवणारे अनुयायी टिळक तुरुंगात गेल्यानंतर रस्त्यावरसुद्धा आले नाहीत. कित्येकांनी तर असे लिहिले आहे की, टिळकांचे निवासस्थान असलेल्या गायकवाडवाड्याकडेसुद्धा त्यांचे अनुयायी फिरकले नाहीत. कारण त्यांना नेता राहिला नव्हता. मोठ्या प्रमाणावरच्या जनआंदोलनासाठी त्यांची तयारीच नव्हती. अशी आधीच्या टप्प्यातील स्थिती होती. मात्र टिळकांच्यानंतर १९२० ला स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे महात्मा गांधींकडे आली; तिथून या सगळ्या लढ्यामध्ये जनआंदोलनांचा एक कालखंड सुरू झाला. त्यात 'आम्ही मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर येऊन शांततेने निदर्शने करू, सत्याग्रह करू, हिंसा करणार नाही, आमचा हात उठणार नाही', अशी धोरणे जनतेने मान्य केलेली होती. या तात्त्विक धोरणांचा प्रभाव इतका दीर्घकाळ राहिला की, जयप्रकाश नारायण यांनी १९७४ च्या आंदोलनामध्ये आमच्यासारख्या तरुणांना त्यावेळेला सूचना केली होती की, 'हमला चाहे जैसा हो, हाथ हमारा नहीं उठेगा'. कसाही हल्ला आमच्यावर करा; परंतु आमचा हात तुमच्यावर उठणार नाही. गांधींनी आफ्रिकेत जे केले होते तेच तत्त्वज्ञान इथे येऊन त्यांनी भारतात त्याचा मोठ्या प्रमाणावर अवलंब करून जनचळवळीचा आरंभ केला. नुसत्या १९३० च्या दांडीच्या सत्याग्रहात जवळपास एक लाख लोक त्या काळात तुरुंगात गेले होते. म्हणजे बघा, जनआंदोलनांची व्यापकता किती होती आणि ही आंदोलने उत्तरोत्तर व्यापक होत गेली. समाजातले निरनिराळे घटक या सगळ्या चळवळींमध्ये सामील होत गेले. आधीची चळवळ वरिष्ठ वर्गाची चळवळ म्हणता येत होती, तशी गांधींची चळवळ वरिष्ठ वर्गाची चळवळ म्हणता येत नव्हती. गांधींनी आपल्या कार्यक्रमांमध्ये आधीची राजकीय चळवळ आणि सामाजिक सुधारणा एकत्र आणलेल्या होत्या. तरीही तिथे भारताच्या राजकारणातले राजकीय विरुद्ध सामाजिक हे जे द्वंद्व आधी होते, ते गांधींच्या नेतृत्वामध्ये संपलेले दिसते. आणि मग जोमाने जी जनतेची चळवळ सुरू झाली त्याचा रेटा म्हणून सत्तांतराच्या वाटाघाटी सुरू झाल्या. प्रस्तावित राज्यघटनेचे प्रारूप आपण पुन्हापुन्हा सांगत राहिलो आणि १९४७ मध्ये ज्या वेळी फाळणी होऊन हा देश स्वतंत्र झाला त्यावेळी आपला स्वतःचा देश आपल्या ताब्यात आला आणि आपली स्वतःची राज्यसंस्था आपल्या ताब्यात आली.

आता आमच्यापुढे अशी परीक्षा होती की, स्वातंत्र्यलढ्याच्या काळामध्ये लोकांना दाखविलेल्या ध्येयाच्या आधारे, स्वप्नांच्या आधारे त्यांची पूर्तता करण्यासाठी आपल्याला हा देश पुढे न्यायचा होता. त्यातला पहिला टप्पा म्हणून १९५० साली राज्यघटना निर्माण केली; ती आपण आपल्याप्रतिच अर्पण केली. या राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये सर्वपक्षीय लोक होते. हिंदू महासभा होती, हिंदुत्ववादी मंडळी होती. काँग्रेसमध्ये असणारी हिंदुत्ववादी मंडळी होती, स्वतंत्र पक्षाचे लोक होते, कम्युनिस्ट पक्षाचे होते. सगळ्या प्रकारचे लोक, लोकांचे प्रतिनिधी राज्यघटना निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये होते. श्यामाप्रसाद मुखर्जी जे त्यावेळच्या हिंदू महासभेमध्ये होते; नंतर ते जनसंघाचे पुढारी झाले. ते

हिंदूराष्ट्राचे आग्रही होते, परंतु त्यांनासुद्धा या संविधान सभेमध्ये संधी दिली गेली आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पाच वर्षात, १९४७ ते १९५२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक होईपर्यंत जे अंतरिम मंत्रिमंडळ होते ते सर्वपक्षीय होते. केवळ काँग्रेसचे नव्हते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्यामाप्रसाद मुखर्जी, चिंतामणराव देशमुख, केरळचे मुदलियार, आर. के. षण्मुगम चेट्टी वगैरे अशी सर्व मंडळी काँग्रेसची नव्हती; तरीही त्यांना मंत्रिमंडळात स्थान होते. मंत्रिमंडळातील या सर्वांनी मिळून पाच वर्षे ते सरकार चालवलेले आहे; त्यामध्येच आपल्या देशाच्या एकात्मतेची पायाभरणी झाली, असे मला वाटते.

१९५२ सालानंतर ज्या निवडणुका झाल्या त्यात विविध पक्षांची सरकारे आली; परंतु देशाच्या एकात्मतेचे हे प्रारूप बदलायचा मुद्दा कधीही उपस्थित झाला नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रीय चळवळीमध्ये, स्वातंत्र्य चळवळीमध्ये, सर्व पक्षांनी एकत्र येऊन राष्ट्राचे जे प्रारूप ठरवले ते काय होते? ते असे होते - स्त्री-पुरुष, जाती, वर्ण, धर्म या भेदांच्याविरहित समान हक्क. कोणत्याही एका धर्माच्या नियमानुसार राज्यसंस्था चालणार नाही, म्हणजेच राज्य धर्मनिरपेक्ष असेल. सर्व धर्मांपासून राज्यसंस्था समान अंतरावर असेल, कोणाचाही पक्षपात केला जाणार नाही. आंतरराष्ट्रीय धोरणांमध्ये आम्ही शांततेच्या बाजूचे असू. आमच्याबरोबर जी राष्ट्रे स्वतंत्र व्हायला पाहिजे होती, पण ती झाली नाहीत, त्यांच्या स्वातंत्र्यलढ्याला आम्ही बळ देऊ. त्यामुळेच आफ्रिकेमध्ये मार्टिन ल्युथर किंग वगैरे जी सगळी मंडळी त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी महात्मा गांधींना प्रेरणा मानतात, परंतु हे आपल्या विद्यमान पंतप्रधानांना माहीत नव्हते, त्या प्रेरणा मानणारे जे लोक होते ते आपल्याला त्या काळामध्ये दिसून येतात. म्हणून आशिया आणि आफ्रिका मधल्या उरलेल्या वसाहतींना स्वातंत्र्याची प्रेरणा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामधून मिळाली आणि महात्मा गांधी त्यांचा मोठा आदर्श होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर आम्ही वसाहत म्हणून मुक्त झालो आहोत आणि आम्ही कोणाला वसाहत करणार नाही, कोणावर आक्रमण करणार नाही, आमचे साम्राज्य असणार नाही. जागतिक शांतता आणि बंधुभावावर आधारलेले आमचे स्वतःचे धोरण असेल. अशा तऱ्हेच्या राष्ट्राचे, राष्ट्रवादाचे प्रारूप आपण उभे केले.

काहींच्या म्हणण्यानुसार भारत २०१४ ला तर काहींच्या म्हणण्यानुसार २००० ला भारत स्वतंत्र झालेला आहे, असे मानणारे काही लोक आहेत. त्यामुळे त्यांची गोष्ट सोडून देऊ या. परंतु १९४७ पासून जवळपास २०१४ पर्यंत राज्यघटना अमान्य करीत राज्यघटनेच्या आधारे निर्माण झालेल्या भारत या राष्ट्राच्या अथवा राष्ट्रवादाच्या प्रारूपाला कुठलाही धोका निर्माण झाला नाही. काही काळ भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला होता, पण तो वेगळ्या अर्थाने. स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेला सुद्धा आपल्यापुढे अशी तीन आव्हाने शिल्लक होती. त्यातील एक आव्हान १९२५ साली निर्माण झाले होते, ज्याला आता शंभर वर्षे होताहेत, ते हिंदूराष्ट्रवाद्यांचे होते. रा. स्व. संघ आणि हिंदू महासभेचे ते आव्हान होते. त्यांना हे हिंदूराष्ट्र हवे होते, त्यांना तेव्हापासूनच इथल्या मुसलमानांना नागरिकत्व द्यायचे नव्हते. अशीच भूमिका ते त्या काळामध्ये सुद्धा मांडत राहिले होते. परंतु त्याही काळामध्ये त्यांच्या या भूमिकेला अधिमान्यता, लोकमान्यता नव्हती; म्हणून ती भूमिका क्षीण राहिली. तरीही पुन्हा फाळणीच्या वेळी संघटन करून देशाची सत्ता ताब्यात घेता येते का याचा त्यांनी एक प्रयत्न करून पाहिला; परंतु प्रबळ जनाधार लाभलेल्या काँग्रेसच्या भक्कम फळीमुळे त्यांना ते तेव्हा अशक्य झाले. त्यांच्या दुर्दैवाने त्यांनी, (त्यांच्या प्रवाहाने) महात्मा गांधींची हत्या केली आणि त्या हत्येचा परिणाम म्हणून पुढची जवळपास २५-३० वर्षे हिंदुत्ववादी प्रवाहाला सार्वजनिक जीवनामध्ये खाली मान घालून वावरावे लागले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींचे मारेकरी अशीच त्यांची ओळख जनमानसामध्ये त्या काळात राहिली. १९७० - ८० च्या दशकापर्यंत गांधींचे मारेकरी अशी त्यांची ओळख कायम होती. हिंदूराष्ट्रवाद हा त्या काळातला मोठा घटक भारतीय राष्ट्रवादाच्या मूलभूत भूमिकेला छेद देणारा असला तरी तो इतका क्षीण होता की, राज्यघटना तयार करताना त्यांच्या विरोधाची दखल घेतली गेली नाही. नंतर त्या चित्रात बदल होत गेला आणि आजचे चित्र आमूलाग्र बदललेले आहे.

दुसरे आव्हान होते ते तामिळनाडूचे. त्यांचे म्हणणे असे होते की, तुमचा आमचा काही संबंधच नाही. आम्ही दक्षिणेकडचे, तुम्ही उत्तरेकडचे, दोन्हींमध्ये विंध्य पर्वताची विभागणी करणारी रेषा आहे. आमचे वेगळे राष्ट्र आहे आणि आम्ही आमचे तमिळ राष्ट्र निर्माण करू. मात्र त्यांचा हा विरोध क्रांतिकारक पातळीवर गेला नाही. १९६५ च्या आसपास त्यांचा विरोध संपला आणि त्यांनी जाहीर केले की, आम्ही भारताचे नागरिक आहोत. तशा

सगळ्या निवडणुका वगैरे सर्व राज्यघटनेनुसार तेव्हाही होतच होत्या, परंतु ते बरीच वर्षे असे म्हणत राहिले की, आम्ही तुमचे नाहीत. आता मात्र ते 'आम्ही तुमचे आहोत' असे म्हणतात.

तिसरा घटक होता शिखांमधल्या अस्वस्थतेचा. शिखांमधली अस्वस्थता हळूहळू वाढत १९८०-८४ च्या दरम्यान टोकाला आली. आंतरराष्ट्रीय पातळीवर खलिस्तानवाद्यांना कॅनडा, अमेरिका, इंग्लंड येथे स्थायिक झालेले श्रीमंत शीख व्यापारी, उद्योगपती यांच्याकडून मदत, शस्त्रास्त्रे मिळू लागली, काही शस्त्रास्त्रे पाकिस्तानकडून मिळालेली होती. त्या सगळ्यांचा परिणाम म्हणून शिखांनी खलिस्तानचा आग्रह धरला. तो तसा आधीपासूनच होता; परंतु भाषावार प्रांतरचनेमध्ये त्यांचा तो आग्रह स्वायत्ततेसाठी होता. आता ते असे म्हणू लागले होते की, 'शीख ही वेगळी जमात आहे, तुमचा आमचा संबंध नाही आणि आम्हाला वेगळे शिखीस्थान, खलिस्तान राष्ट्र हवे आहे (खली म्हणजे पवित्र). त्यामुळे आम्हाला आमचा देश स्वतंत्र करायचा आहे, त्यासाठी आम्हाला भारत सरकारशी लढले पाहिजे.' शिखांचा प्रश्न वाटाघाटीने सोडवायच्या आधी त्यांची भूमिका अशी होती की, हा दोन राष्ट्रांमधला प्रश्न आहे, त्यामुळे आम्हाला भारत सरकारशी वाटाघाटी करून वेगळे राष्ट्र मिळाले तर ठीक, नाहीतर आम्हाला सशस्त्र मार्गाने ते मिळवावे लागेल. भारत १९६२ च्या युद्धामध्ये भारताची लष्करी तयारी नसल्यामुळे हरला. परंतु १९६५ आणि १९७१ च्या युद्धात भारताने पाकिस्तानला चांगलीच धूळ चारलेली होती. त्यामुळे १९८४ सालापर्यंत भारतीय लष्कराचे, भारतीय राज्यसंस्थेचे सामर्थ्य वाढलेले होते, तिच्याविरुद्ध लढून स्वतंत्र होऊ शकत नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले नाही. जून १९८४ ला गुरुद्वारामध्ये सैन्य घालून ते सगळे बंड मोडून काढले गेले. आजतागायत कुठे कुठे खलिस्तानचा आवाज येतोच आहे. परंतु भारतीय राष्ट्रवादाच्या विरोधातला तो जो एक मोठा घटक होता, तोही संपला.

पण हिंदू राष्ट्रवाद, तमिळ राष्ट्रवाद आणि शिखांचा फुटीर राष्ट्रवाद या घटकांनी किती बळी घेतले पहा. हिंदूराष्ट्रवादाने महात्मा गांधींचा बळी घेतला, दाभोलकर, गौरी लंकेश, कलबुर्गी, गोविंद पानसरे यांचे बळी घेतले आणि पुढे कित्येकांची नावे आहेत आपल्याला माहीत नाही. वांशिक तमिळ राष्ट्रवादातून राजीव गांधींचा आणि शिखांच्या फुटीर राष्ट्रवादामधून इंदिरा गांधींचा बळी गेला. हे बळी या राष्ट्रवादाच्या उपप्रवाहांमध्ये गेलेले आहेत. मध्यवर्ती भारतीय राष्ट्रवादाच्या विचारधारेमुळे एकही बळी गेलेला नाही आणि जाणारही नाही. कारण सर्वसमावेशक, उदारमतवादावर आधारलेले राज्याचे प्रारूप आपण स्वीकारलेले आहे. तमिळ आणि शिखांची आव्हाने संपली. बहुसंख्याक हिंदुराष्ट्रवादाचे आव्हान मात्र शिल्लक राहिले. हिंदुराष्ट्रवादाचे आव्हान जवळपास १९८४ पर्यंत नगण्य होते. १९८४ नंतर ते एकदम पृष्ठभागी आले आणि त्याचे निमित्त असे झाले की, शहाबानो खटल्यात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला शह देत राजीव गांधींनी संसदेचा वापर करून एक नवीन कायदा केला व तो मुस्लीम पुरुषांच्या बाजूने पक्षपाती ठरला. हिंदुत्ववाद्यांनी त्याचा प्रचार असा केला की, यांनी फार आधीच 'हिंदू कोड बिल' आणून हिंदू विवाह कायदा, वारसा कायदा, दत्तक कायदा असे हिंदू सुधारणांचे कायदे आमच्यावर लादले आणि मुसलमानांना मात्र हे सुधारणांचे कोणतेही नियम लावायला तयार नाहीत. मुसलमानांसाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय संसदेने बदलून मुसलमानांचे लांगुलचालन केले. तेव्हापासून हा लांगुलचालनाचा मुद्दा सातत्याने हिंदू-मुस्लीम विश्वामध्ये चर्चेचा राहिला आहे. त्याचा परिणाम असा झाला की, ध्रुवीकरणासाठी एक संघटन बळकट झाले. मी स्वतः १९८५-८६ ला सातारा शहरामध्ये अयोध्या मुक्ती आंदोलनाची मिरवणूक पाहिली होती. त्यात ४०-५० लोकसुद्धा नव्हते. त्याच १९८९-९० च्या मिरवणुकीमध्ये हजारो लोक सामील व्हायला लागले आणि तिथून पुढे भारतीय राजकारणाचा मध्यवर्ती अजेंडा जो आधी विकासाचा असायचा तो बाजूला पडत जमातवादाचा अजेंडा छुपेपणाने प्रभावी होत गेलेला दिसतो. १९८८-८९ नंतरच्या सगळ्या निवडणुकांमध्ये जमातवादाचा मुद्दा सतत छुप्या पद्धतीने वापरला गेला आणि २०२४ च्या निवडणुकीत तर तो बेमुर्वतपणे उघडरीत्या वापरला गेला. आताच्या निवडणुकीमधील सत्ताधाऱ्यांचा अजेंडा पाहिला तर हिंदूंवर होणारे आक्रमण, हिंदूंची गुलामगिरी, हिंदूंची देवळे परत मिळवणे, मशिदी पाडणे या सगळ्या गोष्टींनी हा अजेंडा भरलेला आहे. त्यांच्या आताच्या सगळ्या भाषणांमध्ये हाच अजेंडा आपल्याला दिसेल. विकासाचा मुद्दा निदान काही काळ तरी मनमोहन सिंग पंतप्रधान होते तोपर्यंत चर्चेमध्ये होता.

व्ही. पी. सिंग यांचे सरकार होते, देवेगौडा यांचे

सरकार होते, त्यानंतर वाजपेयींचे सरकार आले. त्या वाजपेयींच्या नेतृत्वाखालील सरकार असतानासुद्धा हिंदुत्ववाद्यांनी जे मुद्दे बाजूला ठेवलेले होते ते २०१४ सालच्या भाजप सरकारने पुन्हा वर आणले. कारण त्यांना पूर्ण बहुमत मिळालेले होते. आपला अजेंडा राबवण्यासाठी त्यांना आता कोणावरही अवलंबून राहावे लागणार नव्हते. वाजपेयींचे मंत्रिमंडळ २४ पक्षांचे होते, त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागायचे. नरेंद्र मोदींना २०१४ च्या निवडणुकीनंतर कुठल्याही घटक पक्षावर अवलंबून राहावे लागले नाही, इतके बहुमत त्यांनी अयोध्या आणि त्याविषयीच्या वादात कमावलेल्या शक्तींच्या आधारावर मिळवलेले होते. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्याबरोबर त्यांचे एक भाषण झाले, त्यात ते असे म्हणाले, 'जवळपास १३ ते १४ शतकानंतर हिंदू समाज स्वतंत्र होत आहे'. मधल्या काळामध्ये हिंदू समाज गुलामगिरीत होता असे म्हणत तो आज स्वतंत्र झालेला आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. आणि म्हणून २०१४ ला स्वातंत्र्य मिळाले असे म्हणतांना हिंदू समाजाला खऱ्या अर्थाने २०१४ ला स्वातंत्र्य मिळाले आहे, ही त्यांची मांडणी असते. हा जो त्यांचा राष्ट्रवादाचा लढा आणि प्रवाह सुरू झाला तो असा मूळच्या मध्यवर्ती भारतीय राष्ट्रवादाच्या प्रवाहापासून वेगळा झाला. पण आता हिंदूंचे राज्य, हिंदू बहुसंख्याक असल्यामुळे हिंदूंचे राष्ट्र असण्यात काहीच गैर नाही; असा हा सगळा आकृतिबंध कोणाचा आहे? अगोदर हिंदुत्ववाद्यांच्या पुढे जो पॅटर्न होता तो दुसऱ्या महायुद्धातल्या जर्मनीचा होता. त्याच्याही आधी इटलीचा होता. जर्मनी मधल्या ज्यू लोकांना ज्या पद्धतीने कंठस्नान घातले, त्यांचे शिरकाण केले, त्याच पद्धतीने भारतातल्या मुसलमानांचे आणि ख्रिश्चनांचे व्हायला पाहिजे, अशी हिंदुत्ववाद्यांची भूमिका त्या काळामध्ये होती. गोळवलकरांचे 'We Or Our Nationhood Defined' नावाचे एक पुस्तक त्या काळात निर्माण झाले, त्यात असा हा सगळा विचार आलेला आहे आणि यांच्या विचारसरणीतसुद्धा हेच आहे की असेच व्हायला पाहिजे. पुढे हिटलरचा पराभव झाला नि मग त्यांचे मॉडेल जर्मनीकडून इस्रायलकडे गेले. इस्रायलकडे का गेले? १९४८ मध्ये जर्मनीतल्या ज्यू लोकांना आवाहन करून इस्रायलमध्ये बोलावून घेण्यात आले आणि हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन केले गेले. हिब्रू भाषेवर आधारलेले केवळ ज्यू लोकांसाठी असलेले इस्रायल नावाचे नवीन राष्ट्र अस्तित्वात आले. आणि परवा त्यांनी जाहीर केले की, इस्रायल हे केवळ ज्यू लोकांसाठीच आहे आणि इस्रायल हे ज्यू राष्ट्र आहे. हे जसे इस्रायलने केले तसे आता हिंदूंसाठी व्हायला हवे; म्हणून यांचा हिंदू राष्ट्रवाद. त्याचे आधार काय? तर प्राचीन ग्रंथ, प्राचीन ग्रंथांमधले भ्रामक विज्ञान, अंधश्रद्धेच्या चालीरीती आणि रूढी आणि वर्णवर्चस्वाची भूमिका ही अशी सगळी वाक्ये तुम्हाला भाजपच्या नेत्यांकडून ऐकायला मिळतील. विशेषतः उत्तरेकडे जर गेलात तर राजस्थान वगैरेमध्ये त्यांनी सांगून टाकले आहे की, 'दलितांनो, लक्षात ठेवा, तुम्हाला आता शिकता येणार नाही. आमच्या राज्यात तुम्हाला जुनीच भूमिका वठवावी लागेल.' हे अगदी स्पष्टपणे बोलणारे लोक आहेत. धर्मसंमेलनामध्ये मुस्लिमांची हत्या करण्याचे ज्या पद्धतीने आवाहन केले गेले ते आपल्याला माहीत आहे. त्याचबरोबर गुजरातमध्ये झालेल्या दलितांच्या हत्या, ऊना प्रकरणामध्ये व इतरत्र झालेल्या हत्या, उत्तर प्रदेशात झालेले मुसलमानांचे शिरकाण, झुंडबळी, हे तुमच्या डोळ्यासमोर असेल. हा सगळा प्रवाह भारतीय राष्ट्रवादाकडून हिंदू राष्ट्रवादाकडचा आहे आणि हिंदू राष्ट्रवादाचा आधार अहिंसा नाही, हिंसा आहे. गोळवलकरांच्या वाङ्मयामध्ये एक वाक्य आहे. ते लक्षात ठेवा, त्या वाक्याला संघ नेहमीच जागलेला आहे. ते वाक्य असे आहे, 'शत्रूवर हल्ला करण्याची हौस तुम्ही पहिल्यांदा भागवून घ्या'. जे बहुमतात आहेत, बहुसंख्य आहेत, त्यांनी अल्पसंख्याकांना शत्रू मानावे आणि त्यांच्यावर पहिल्यांदा हल्ला सुरू करावा. हौस भागवून घ्या आणि ती हौस इतक्या प्रमाणावरती भागवून घ्या की, इथे राहणारे जे अल्पसंख्याक लोक असतील ते तुम्ही सांगणार त्या पद्धतीनेच वागतील, तसेच राहतील आणि तोच न्याय आम्हाला अपेक्षित आहे. गोळवलकरांच्या लेखनामध्ये हे म्हटलेले आहे की, अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांच्या संस्कृतीमध्ये स्वतःला विलीन केले पाहिजे. त्यांचा स्वतंत्र धर्म असता कामा नये, त्यांना फक्त आम्ही उपासनेचे स्वातंत्र्य देऊ, बाकी कोणतेही स्वातंत्र्य नाही. देशाच्या मुळावर येणारा असा हा आताच्या राष्ट्रवादाच्या वाटचालीतला टप्पा या नव्या पिढीने समजून घेतला पाहिजे.

आतापर्यंत ज्यांनी नेहरूंच्या भारतीय राष्ट्रवादाच्या राजवटीत निर्माण झालेल्या संस्था, वैज्ञानिक संस्था, शिक्षण संस्था वगैरेंचा फायदा घेतला, ते सगळे खाऊन उलटलेले हे लोक आहेत. आज आयटीमध्ये दिसणारे, विदेशामध्ये असणारे, हे सगळे खाऊन उलटलेले लोक आहेत. नव्या भांडवलशाहीच्या समृद्धीतून ते गब्बर

झालेले आहेत. ज्यांनी सरकारी अर्थव्यवस्थेचा फायदा घेतला त्यांना आता सरकारी अर्थव्यवस्था नावाची गोष्ट नको आहे. ज्यांनी सार्वजनिक क्षेत्राचा फायदा घेतला त्यांना आता सार्वजनिक क्षेत्र नको आहे. त्यांना खाजगी उपक्रमांना प्राधान्य देणारी अर्थव्यवस्था हवी. नफा जेवढा होईल तेवढा हवा. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ही आहे की, त्यांना मागच्या इतिहासाचे ओझे नको आहे आणि आताची भारतातल्या राजकारणाची घडी अशी आहे की आताचे, विशेषतः सत्ताधाऱ्यांचे, सगळे राजकारण इतिहासावर आधारलेले आहे. सगळ्या गोष्टी आपण इतिहासात शोधतो आणि त्यामुळे इतिहास हा इथल्या राजकारणाचा नायक झालेला आहे. इतिहास जेव्हा राजकारणाचा नायक होतो तेव्हा त्या समाजाला भविष्य नाही. त्याचा भूतकाळही इतिहास आहे, त्याचा वर्तमानकाळही इतिहास आणि त्याचे भविष्यही इतिहास आहे, हे लक्षात घ्या. म्हणून इतिहासाच्या सगळ्या पुनर्मांडणीचा जो घाट आता या सरकारने घातलेला आहे त्यात या हिंदूराष्ट्राचे इतिहास लेखन करण्यासाठी जवळपास साठ वर्षे त्यांची एक समिती कार्यरत आहे. असंख्य माणसे त्यांनी कामाला लावलेली आहेत. असंख्य बुद्धिमान लोक त्यांच्या कच्छपी लागलेले आहेत आणि तो नवा इतिहास तयार झाला की तो अधिकृत इतिहास म्हणून ते जाहीर करणार आहेत. तो अभ्यासक्रमात शिकवावा लागेल. त्यांनी सध्या मनुस्मृतितले 'ज्येष्ठांना वंदन करावे, त्यांचा मान राखावा', अशा पद्धतीचे श्लोक टाकलेले आहेत. मग कोणी म्हणेल, याच्यात गैर काय आहे? गैर असेल किंवा नसेल; पण प्रश्न असा विचारला पाहिजे की, हा श्लोक ज्यांनी टाकला ते सर्व विभक्त कुटुंबात राहतात, की एकत्र कुटुंबात? तुमच्या कुटुंबात तुमचे आई-वडीलसुद्धा तुमच्याजवळ नसतात. तुम्ही सकाळी उठून कोणाला वंदन करता? कोणाचे पाय धरता? किती जण याचे पालन करतात? असे प्रश्न विचारले पाहिजेत. कदाचित हे प्रश्न व्यक्तिलक्ष्यी वाटतील. परंतु ते व्यक्तिलक्ष्यी नसून वर्गलक्ष्यी आहेत, हे लक्षात घ्यावे. म्हणून असे प्रश्न विचारले पाहिजेत. इतिहासाबद्दल आपण आपल्या पद्धतीने, आपल्याला तात्त्विक पातळीवर आक्रमक व्हावे लागेल. तात्त्विक पातळीवर आक्रमक व्हायचे आहे, म्हणजे हातात हातोडा घेऊन हिंसक व्हा असे नाही.

तुम्ही दुसरी प्रक्रिया बघा, मंडल आयोगानंतर सगळ्याच जातिजमातींच्या अस्मिता कडव्या व्हायला लागलेल्या आहेत. कडवी जातनिष्ठा आणि त्यामुळे जातीच्या परिघाबाहेर जायचे नाही, मुलामुलींनी जातीच्या बाहेर लग्नं करायची नाहीत. हे आताच्या सगळ्या आंदोलनांमधून आलेले फलित आहे. म्हणजे एके काळी जातविरोधाकडे जाणारा महाराष्ट्र ज्याचे सगळे प्रबोधन कधीच जातकेंद्री नव्हते, जातविरोधाचे होते, ते सगळे प्रबोधन उलटून आता समाज पुन्हा जातकेंद्री बनून जातीची बंधने दिवसेंदिवस कडक होताना दिसत आहेत. टी.व्ही.वरील मालिकांमधील समाजातील वैभव वगैरे समाजाचे प्रतिबिंब नसते. रमाबाई रानड्यांवरच्या मालिकेत कशाचे कौतुक होते? त्या कुटुंबामध्ये दागिने, सोने-चांदी किती होते, स्त्रियांनी अंगावर काय काय घातले होते, इत्यादी. एक खोटे जग उभे करणारी भांडवलशाहीची व्यवस्था आहे. ऐंशी कोटी लोकांना फुकट धान्य देतो हे सांगायची लाजसुद्धा आपल्याला वाटत नाही. तेव्हा काँग्रेसने काय केले त्यापेक्षा यांनी दहा वर्षांत काय केले?

पण आता राष्ट्र म्हणून पुढील वाटचालीसाठी तुम्हाला जातनिष्ठा, धर्मनिष्ठा आणि वर्गनिष्ठा या सोडल्या पाहिजेत. मी धर्म व्यक्तिशः कदाचित मानेन, परंतु माझा धर्म सार्वजनिक जीवनामध्ये कुठेही आडवा येता कामा नये. माझ्या मुलांवर माझ्या धर्मामुळे कोणतीही बंधने येता कामा नयेत. ही भूमिका मला घ्यायला पाहिजे म्हणून मी जिथे जिथे जातो तिथल्या सगळ्या तरुण मंडळींना एक आवाहन करतो ते तुम्हालाही इथे करतो. आमच्या जुन्या पिढीवर आता फक्त प्रबोधन अवलंबून आहे, हे लक्षात ठेवा. तुम्हा तरुणांच्या पिढीवर मात्र राष्ट्र अवलंबून असणार आहे, म्हणून निर्णय तुम्हाला करावा लागेल. इतिहासात प्रत्येक टप्प्यावर तरुण पिढीला निर्णय करावा लागलेला आहे. १८५७ च्या बंडामध्ये त्या सुशिक्षित पिढीने निर्णय केला की, No to back, no to history; नाही, आम्हाला मागे जायचे नाही, इतिहासात जगायचे नाही, आम्हाला पुढेच जायचे आहे. त्यांनी नवा विचार केला. १९९०च्या दशकात (जागतिकीकरणाचा) तसाच प्रश्न निर्माण झाला. तेव्हा आपण असे म्हणालो की, ठीक आहे, आता जगाच्या पाठीवर आम्हाला आणखी पुढे जायचे आहे. विज्ञान आले, तंत्रज्ञान आले. मंगळापर्यंत स्वारी गेली, इतकं सगळं (स्ट्रक्चर) झालं आहे. सगळ्यांची कारणमीमांसा कळलेली आहे. अशा वेळेला भारतातून अमेरिकेला किंवा इतर देशांमध्ये शिकायला जाणारा माणूस जर शेणावर, गोमूत्रावर संशोधन करणार असेल तर तिथे त्याची काय पातळी असेल?

अलीकडे 'फ्रीडम हाऊस' नावाच्या संस्थेकडून

भारतीय लोकशाहीची जी पाहणी झालेली आहे त्यात त्यांनी जगातल्या लोकशाहीची तीन प्रकारे वर्गवारी केलेली आहे. 'संपूर्ण स्वतंत्र' असलेला समाज; त्यात अमेरिकन सोसायटी, ब्रिटिश सोसायटी आहे, स्कँडेव्हियन देश आहेत, युरोपातील देश, पश्चिम युरोपातील देश आहेत. आपण 'अंशतः स्वतंत्र' मध्ये आहोत. आशुतोष वार्ष्णे नावाचा भारताच्या लोकशाहीचा अमेरिकन अभ्यासक म्हणतो की, भारतीय राष्ट्रवादाच्या दृष्टीने भारताची लोकाशाही महत्त्वाच्या अशा वळणावर आलेली आहे. आता भारतात फक्त निवडणुकांपुरती लोकशाही शिल्लक राहील, परंतु कार्यान्वयी (Operative and Functional) लोकशाही शिल्लक राहणार नाही. आपण त्याचे नमुने या दोन-चार वर्षात ठळकपणे पाहिले. विरोधकांना मोठ्या संख्येने निलंबित करणे, कोण कुठल्या बाजूला आहे हे कळू नये यासाठी आवाजी मतदानाने निर्णय घेणे, विरोधक कमीत कमी संख्येने सभागृहात उपस्थित असताना महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेणे, महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चाच होऊ न देणे, काश्मीरच्या विधेयकावर, अंदाजपत्रकांवर, (तीन शेतीविषयक विधेयकांवर) पुरेशा चर्चाच झालेल्या नाहीत. कोणतीही विधेयके कमीत कमी खासदारांच्या उपस्थितीत उरकून टाकायचे धोरण आहे. लोकशाहीची केवळ एक गरज म्हणून त्यापलीकडे त्याला महत्त्व द्यायला राज्यकर्ते तयार नाहीत. ते फक्त निवडणुकांना महत्त्व देतात, कारण निवडणुकीची मोहोर सत्तेवर उमटली पाहिजे. निवडणुकांच्या नंतर कार्यान्वयी पातळीवर जी लोकशाही दिसायला पाहिजे ती आता दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयाने दिल्लीला दिलेला संपूर्ण राज्याचा दर्जा केंद्र शासनाने पुन्हा एका वटहुकुमाने काढून घेतला. (हा का काढून घेतला?) फेडरल स्टेट, संघराज्य आहे. तरीही संघराज्यातील राज्यघटकांना आता दुय्यम स्थान दिले जाते आहे. ईडी, सीबीआय यांचे मार्फत राज्यांचे राजकारण अस्थिर करण्याचे प्रयत्न झालेले आहेत; त्यांचे पक्ष फोडण्याचे प्रयत्न झालेत. हे असे दर्शवते की, कार्यान्वयी लोकशाहीचा अंत जवळ आला आहे. फक्त निवडणुकांपुरतीच लोकशाही आता शिल्लक राहील. इथल्या राष्ट्रवादाला खरा धोका हाच आहे. जर भारतात सर्वांना सामावून घेणारी लोकशाही शिल्लक राहिली नाही तर भारतीय राष्ट्राचे विघटन व्हायला कुठल्या बाजूने सुरुवात होईल हे सांगता येत नाही. कारण विविध जनसमूह जर सतत अशांत असतील तर एका टप्प्यानंतर काय करतील हे मणिपूरमध्ये आपण पाहिले. लोकांनी परवाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना गावागावांत येऊ दिले नाही. पंजाबमधल्या शेतकऱ्यांनी येऊ दिले नाही. भाजप म्हणून मला त्याचे महत्त्व नाही. सरकार म्हणून त्यांनी हा धडा घ्यायचा आहे, की जनता तुम्हाला जवळ करीत नाही. आज असंतोष या मार्गाने व्यक्त झाला. उद्या आणखी कोणत्या मार्गाने होईल, आपल्याला माहीत नाही. तेव्हा हे सगळे लक्षात घेता नव्या पिढीने वर्गमुक्त, जातमुक्त, धर्ममुक्त आणि हिंसामुक्त व्हावे. स्वतःशी प्रतिज्ञा करा की, मी कोणत्याही जातीच्या संघटनेचा सभासद होणार नाही. तुमच्या व्यक्तिगत अजेंड्यावर ही प्रतिज्ञा येऊ द्या की, मी कोणत्याही धर्माचा आंधळेपणाने अनुनय करणार नाही. बुद्धी चालवूनच वैज्ञानिक कसोट्या लावूनच मी त्याचा निर्णय करेन, तेवढीच मी धर्मश्रद्धा बाळगेन, त्यापलीकडे बाळगणार नाही. कोणत्याही धर्माचार्याचा आदेश मी पाळणार नाही. आदेश नव्हे, आता फतवे निघायला लागलेत. तुमचे हिंदू असणे हे हिंदू म्हणण्यापुरते आता राहिले नाही. गुढीपाडव्याला झेंडा लावणे, थाळ्या-टाळ्या वाजवणे, संकष्टीचा उपवास करणे यावर तुमचे हिंदू असणे ठळक होत जाणार आहे. तुम्ही देवाला मानत नसाल, हिंदूंच्या सणांना विरोध करीत असाल तर हिंदूंना विरोध म्हणजे राष्ट्राला विरोध, हे नवे समीकरण झाले आहे. त्यामुळे धर्माविषयी मी काटेकोर भूमिका घेईन, अशी प्रतिज्ञा तुम्ही केली पाहिजे. तिसरी गोष्ट म्हणजे मी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कोणत्याही हिंसक कृत्यात सहभागी होणार नाही. माझे मित्र किंवा माझे नातेवाईक सहभागी होत असतील तर त्यांना त्यापासून परावृत्त करेन. ही जबाबदारी तुम्ही स्वीकारली पाहिजे. जर हा समाज अहिंसक पद्धतीने पुढे जात राहिला तरच नागरी समाज नावाची गोष्ट भारतात अस्तित्वात राहणार आहे. ज्या समाजात नागरी समाज प्रबळ, मजबूत असतो त्या समाजाची लोकशाही मजबूत असते जिथे नागरी समाज सबळ होतो, तिथे लोकशाही सबळ होते. राष्ट्र वाचवण्यासाठी आणि राष्ट्रवाद राखण्यासाठी तुम्हाला हे आव्हान स्वीकारावे लागेल. तुम्ही ते स्वीकाराल अशी मी अपेक्षा करतो आणि थांबतो.

**शब्दांकन : प्रल्हाद मिस्त्री, राजेंद्र फेगडे**

●

# प्रिय डॉक्टर...



**विनायक सावळे** | शहादा
९४०३२५९२२६

प्रिय डॉक्टर,

पुन्हा एक नवीन पत्रसंवाद. ऑगस्ट महिना. अकरा वर्षे पूर्ण झालीत. कसे आहात तुम्ही? विचार आणि कृतीद्वारे अजूनही आमच्यासोबत असल्याची आमची भावना आहे. बोलता येतं तुमच्याशी. काळाची ताकद जबरदस्त असते ना, डॉक्टर! ती भळभळणारी वेदना आता नाही राहिलीये. त्या जागी आता आहे समर्पित भावनेने काम करण्याचा निर्धार. विपरीत परिस्थितीतही उभे राहाण्याची प्रेरणा. संघटना म्हणून वाढविस्ताराचा दृढ संकल्प. यात तुम्ही उभे आहात आमच्या साथीने. आजही लख्ख आठवतं, तुम्हाला फोन केला की तिकडून येणारा तुमचा हृदयीचा आवाज, काय रे विनायक? आता संघटनेत काही छान काम झालं तर, शाब्बास विनायक म्हणून आजही असे शब्द ऐकायला येतात. माधव बावगे सरांच्या नेतृत्वात संघटना उत्साहाने वाटचाल करीत आहे आणि तुम्ही मात्र सुरेश भटांच्या त्या गझलेतल्याप्रमाणे, 'विझलो' जरी आज मी, हा माझा अंत नाही, म्हणत आजही आमच्यासोबत आहात.



डॉक्टर, कार्यकर्त्याला प्रत्येक काळ अस्वस्थ करणाराच असतो ना? कधीच त्याला सगळं छान चाललंय असं वाटत नाही. कारण तो प्रश्नांवर काम करतो. ते प्रश्न त्याला सतावत असतात. अस्वस्थ करीत असतात. कधी काही चांगलं घडलं तर अजून अधिक चांगलं घडण्यासाठी त्याची धडपड सुरू असते. म्हणून प्रत्येक काळ त्याला नवी आव्हाने वाटत असतो. तो परिवर्तनाची वाट शोधत असतो. नवनिर्माण करीत असतो. तसा हा काळही प्रचंड आव्हानांचा. अनेक प्रश्नांचा आहे. त्या प्रश्नांकडे जाण्यापूर्वी डॉक्टर, एक किमान समाधानाची बाब तुम्हाला सांगायला हवी. धर्मांध राजकीय शक्तींना या देशाच्या जनतेने किमान अंकुश ठेवण्यात तरी यश मिळवले आहे. उन्मत्त, निरंकुश, विद्वेषी आणि संविधानमूल्यांविरोधी पक्षाला त्याची जागा दाखवली. एकाच वेळी लोकांच्या धार्मिक भावनांना भडकावून, दुसऱ्या बाजूला सर्व प्रकारचा मीडिया, शासकीय यंत्रणा, प्रसंगी न्यायव्यवस्थेला वापरून विरोधकांना नामोहरम करायचे आणि प्रचंड पैसा वापरून जनमत आपल्या बाजूने करायचे, हा जो प्रयोग त्यांनी उभा केला, या देशाच्या जनतेने त्याला पराजित केले आहे. पूर्ण खाली जरी खेचू शकलो नाहीत, पण निरंकुशता मात्र दिली नाही, हेही नसे थोडके. म्हणून समाधान आहे.

पण ज्या क्षेत्रात आपण काम करतो त्या क्षेत्राची आव्हाने मात्र तशीच शाबूत आहेत. दोन घटना तुम्हाला सांगाव्याशा वाटतात. उत्तर प्रदेशातील हाथरस येथे भोलेबाबाच्या दर्शनाला गर्दी उसळली. महिलांचा छळ करणारा, विनयभंगाचे गुन्हे दाखल असलेला, तुरुंगवारी केलेला हा बाबा. याच्या सत्संगाला काही हजार भाविकांची अपेक्षा असताना, दोन लाखांपेक्षा अधिक भाविक जमले. भोलेबाबाच्या पायाखालची माती घेण्यासाठी भाविक वाकले आणि प्रचंड चेंगराचेंगरी होऊन १२२ लोकांनी आपला जीव गमावला. त्यात महिला आणि मुलांचाही समावेश मोठ्या प्रमाणात आहे. संपूर्ण देशालाच हादरवून सोडणारी ही घटना आणि दुसऱ्या बाजूला, क्रिकेटचा विश्व कप जिंकल्यानंतर मुंबईला आयोजित केलेली विजयी रॅली. यात तीन लाख मुंबईकर आठ तास रस्त्यावर होते. यातही वाहनांचे नुकसान आणि किरकोळ जखमी झालेले लोक आहेतच. या दोन्ही गर्दी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, डॉक्टर. हाथरसची गर्दी जीवनातील समस्यांनी बेजार झालेल्या जनतेची आहे. जे जीवनाचे प्रश्न स्वतः सोडवण्याचं सामर्थ्य आणि इच्छाशक्ती गमावलेले लोक आहेत. प्रश्नांची उत्तरं ही जनता बाबाच्या पायाखालच्या मातीत शोधत आहे आणि दुसऱ्या बाजूला बेरोजगारी, महागाई, प्रचंड जीवघेणी स्पर्धा, नात्यांमधील तणाव, आशा, आकांक्षा,

स्वप्न पूर्ण होण्याबाबतच्या अनिश्चितता याने बेजार झालेली तरुणाईदेखील निराशच आहे. ही निराशा विसरण्याचा केविलवाणा प्रयत्न म्हणजे तीन लाखांची आठ तास रस्त्यावर झालेली उन्मादी गर्दी. जसं व्यसन प्रश्न विसरल्याचा भास निर्माण करतं, आनंदाची खोटी नशा तयार करतं, अगदी तेच कार्य ही उन्मादी गर्दी पार पाडते. खरेतर या दोन्ही गर्दी समाजाच्या निराशेचे प्रतीक आहेत. म्हणून एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या निराशेला भांडवल म्हणून वापरलं जातं. कधी ते बुवा-बाबा वापरतात, कधी राजकारणी याचा वापर करतात, तर कधी इथली बाजार व्यवस्था याचा खुबीने वापर करते. लक्षातही येत नाही. आपली लढाई आपल्याला किती व्यापक पातळीवर लढावी लागणार आहे, याची स्पष्ट जाणीव करून देणारी ही दोन उदाहरणे आहेत.

काळ बदलतोय, डॉक्टर आणि पिढीही बदलत आहे. हे नैसर्गिक जरी वाटत असलं, तरी आताच्या पिढीचा बदलाचा वेग प्रचंड आहे. पुस्तकांपासून दूर गेलेली आणि माहितीचा कचरा हातात असलेली ही पिढी. या पिढीला मदतीची गरज आहे. यांना केवळ दोष देऊन चालणार नाही. आपल्याला त्यांची भाषा शिकावी लागेल. भावविश्वही समजून घ्यावं लागेल त्यांचं. यशस्वी आयुष्याला विचारांची जोड असते हे पटवून द्यावे लागेल आणि हा विचारांचा पाया 'भारतीय संविधान' आहे इथपर्यंत आणावं लागेल.

आपली संघटना त्याच दिशेने काम करतेय, डॉक्टर. आपली युवा कार्यकर्ती प्रियंका खेडेकरच्या नेतृत्वात आपण युवा छावणी सुरू केली. या पहिल्याच वर्षी त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला आणि संघटनेच्या तरुणाईने या छावणीचे संयोजन केले. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह आपल्या संघटनेच्यामार्फत होत आहेत. मुलांना खगोलाचे शास्त्रीय ज्ञान देणारे 'तारांगण' आपण सुरू ठेवले आहे. विविध उपक्रम, सोशल मीडिया, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प, राष्ट्रीय अनुसंधान, विवेक वाहिनी, मानसिक आरोग्य व्यवस्थापन, महिला, प्रशिक्षण, संघटनेचे मुखपत्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका यांसह इतरही विभागांचं काम जोमाने सुरू आहे. सव्वा दोनशेपेक्षा अधिक शाखा आणि १०० पेक्षा अधिक ठिकाणी आपले संपर्क आहेत. यावेळी इस्लामपूर येथे झालेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणीसाठी ३२ जिल्ह्यातून २६० पेक्षा अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. आजपर्यंतचा हा उच्चांक आहे. संघटनेच्या वाढविस्ताराला प्रचंड संधी आहे. त्यासाठी संघटनेला तयार करण्याचा आपला निर्धार आहे.

आपल्या संघटनेला आता ३५ वर्षे पूर्ण होत आहेत, डॉक्टर. यानिमित्ताने आपण आळंदीला पस्तीस वर्षे पूर्तीचे अधिवेशन घेत आहोत, संत ज्ञानेश्वरांची आळंदी येथे.

'ही अविवेकाची काजळी ।
फेडूनी विवेक दीप उजळी ।।
ते योगिया पाहे दिवाळी । निरंतर ।।'

असे म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या कर्मभूमीत हे अधिवेशन संपन्न होणार आहे. त्यातील एक दिवस संविधान सन्मान परिषद असेल आणि पुढील दोन दिवस पस्तीस वर्षांच्या वाटचालीचे सिंहावलोकन आणि पुढील पंधरा वर्षांच्या भविष्यकालीन वाटचालीचा वेध घेणारं आणि दिशा ठरवणारं हे अधिवेशन असणार आहे. हाथरस प्रकरणानंतर जादूटोणाविरोधी कायदा राष्ट्रीय पातळीवर होण्याची मागणी आता राजकीय पक्षच करीत आहेत. जो कायदा महाराष्ट्रात तुमच्या बलिदानाच्या दुसऱ्याच दिवशी अस्तित्वात आला, तो कायदा आता देशपातळीवर होण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. आव्हान मोठे आहे पण ते संघटना म्हणून आपण स्वीकारायला हवे ना, डॉक्टर!

शेवटी अजून एक गोष्ट सांगायला हवी. अकरा वर्षांनंतर खुनाच्या खटल्याचा निकाल लागला. केवळ मारेकऱ्यांना जन्मठेप, पण कट रचणारे पुराव्याअभावी निर्दोष सुटले. निकाल समाधान देणारा नाही. सगळ्यांवर आरोप सिद्ध होऊन त्यांना फाशी होऊन संपवावे, असेही वाटत नाही. पण समाजात विचार स्वातंत्र्याचा संस्कार अबाधित ठेवण्याची जबाबदारी इथल्या शासन व्यवस्थेची, तपास यंत्रणांची आणि न्यायव्यवस्थेची आहे. ही जबाबदारी पार पाडण्यात या व्यवस्था अपयशी ठरत असल्याचे दुःख आहे. ३५ वर्षांची वाटचाल. या वाटचालीत आपण नक्की काही गोष्टी मिळवल्या, डॉक्टर. पण अजूनही आम्ही आमच्या पूर्ण क्षमता वापरलेल्या नाहीत याची जाणीव आहे. सगळंच काही छान छान आहे असेही नाही. अजूनही काही प्रश्न, ताण आहेतच. पण विचारांसाठी उभारलेल्या संघटनेवरील निष्ठा आणि सच्चेपणाची ताकद आम्हा सगळ्यांना तारून नेईल असा आम्हा सगळ्यांनाच विश्वास आहे. आमचा अनुभवही असाच आहे.

डॉक्टर, तुम्हाला कविता खूप आवडायच्या ना? मग कवी सुरेश भटांच्या एका गझलेच्या शेवटच्या चार ओळी तुम्हाला पुन्हा सांगाव्याशा वाटतात,

'येतील वादळे, खेटेल तुफान,
तरी वाट चालतो...
अडथळ्यांना भिऊन अडखळणे,
पावलांना पसंत नाही...'

बोलत राहू, डॉक्टर....

**(लेखक महा.अंनिसचे राज्य सरचिटणीस आहेत.)**



# वाढत्या आव्हानांना सामोरे जाण्याचा निर्धार करू या!

**माधव बावगे** । लातूर
९४०४८७०४३५

साथींनो, ऑगस्ट महिन्यात ९ तारखेला, ऑगस्ट क्रांतिदिनी संघटनेच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण होत आहेत आणि २० तारखेला संघटनेचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन आपण राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिवस म्हणून पाळतो.

संघटनेच्या साडेतीन दशकांच्या एकूण वाटचालीत डॉक्टर गेल्यानंतर ११ वर्षे झाली आहेत. सिंहावलोकन करताना आपल्याला दोन टप्पे दिसतात. एक, डॉ. दाभोलकरांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालील वाटचालीचा आणि दुसरा, त्यांच्यानंतरचा. महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या वाटचालीचा आढावा घेताना सुरुवात वैज्ञानिक दृष्टीकोन आणि चमत्कारविज्ञान याविषयीच्या बी. प्रेमानंद यांच्या दौऱ्यापासून करावी लागते. त्यानंतर श्याम मानव यांच्यासह डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी केलेले काम आणि नंतर त्यांनी दूरदृष्टी आणि कल्पकतेने स्वतंत्रपणे महाराष्ट्र अंनिसचे सुरू केलेले काम, अशी ही वाटचाल आहे. प्रवाहाविरुद्धची चळवळ असूनही संघटनेच्या कामाची रेषा मोठी कशी होईल याकडे डॉ.दाभोलकरांनी विशेष लक्ष दिले. यात दोन बाबींचा समावेश होतो, एक संघटना बांधणी आणि वैचारिक मांडणीचा भक्कम पाया रचून त्यावरील आपल्या सामाजिक कार्याचा दर्जा उंचावणे. या दोन्हीही बाबतीत त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य सामावले आहे. डॉ. दाभोलकरांनी एका नव्या संघटनेची शून्यापासून सुरुवात केलेली आहे. त्यात प्रथम कार्यकर्ते जोडण्याची एक प्रक्रिया असते. प्रथम समोर आलेल्या कोणत्याही कार्यकर्त्याचे म्हणणे, त्याची बाजू पूर्णपणे शांतपणे ऐकून घेणे आणि नंतर त्याला समाधानकारक उत्तर देणे हे त्यांचे महत्त्वाचे स्वभाववैशिष्ट्य होते. त्यांच्याकडे कार्यकर्ते पारखण्याची हातोटी होती. त्यांनी सर्व स्तरातील हजारो कार्यकर्ते जोडून त्यांच्यात संघटनेची वैचारिक बैठक रुजवली. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य आहे म्हणून त्यांनी कोणालाही देवधर्मविषयक व्यक्तिगत श्रद्धेचा त्याग करण्याची अट घातली नाही. संघटनेची शिस्तबद्ध वाटचाल व्हावी यासाठी अशा सर्व कार्यकर्त्यांना प्रशिक्षित केले. त्यामुळेच आजवरच्या वाटचालीत संघटना सतत वर्धिष्णूच राहिली. त्याचा परिणाम म्हणजे राज्य, देश आणि एवढेच नाही तर जागतिक स्तरावर संघटनेच्या कामाची दखल घेतली गेली आहे. गणेशमूर्ती संकलन, फटाकेमुक्त दिवाळी असे संघटनेने सुरू केलेले उपक्रम महाराष्ट्र सरकारने अंगीकारले. शेजारच्या कर्नाटक राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करण्यासाठी तसेच युगांडा देशात नरबळी विरोधी कायदा करण्यासाठी आपल्या संघटनेचे मार्गदर्शन घेतले गेले आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती असे जरी संघटनेचे नामकरण झालेले असले, तरी प्रत्यक्षात या संघटनेचे सुरुवातीपासूनचे उद्दिष्ट हे व्यापक समाज परिवर्तनाचेच राहिले आहे. संविधानाच्या निर्मितीत आपण जी स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता ही मूल्ये स्वीकारली त्यांचा आशयदेखील व्यापक समाज-परिवर्तनाचाच आहे. त्यामुळे आपली संघटना संविधानिक मूल्यांच्या आधारेच वाटचाल करते आहे. अंधश्रद्धा निर्मूलन ते वैज्ञानिक दृष्टीकोन, नंतर विवेकवाद आणि या टप्प्यांतून जात शेवटी मानवतावादाकडे; अशी संघटनेची वाटचाल सुरू आहे.

कार्ल मार्क्स यांचं एक प्रसिद्ध विधान आहे, 'जेव्हा विचार समाजमनाची पकड घेतात तेव्हा ते एक भौतिक शक्ती बनतात'. तद्वतच संघटनेचे विवेकी विचार कार्यकर्ते कृतिशीलतेतून समाजमानसापर्यंत पोहोचवत राहिले. दुसऱ्या बाजूला प्रसारमाध्यमांनी सकारात्मक साथ दिली त्यामुळे टी.व्ही., वर्तमानपत्राच्या माध्यमातून लोकमानसापर्यंत वास्तवतेचे ज्ञान आणि भान पोहोचत गेले. अंधश्रद्धा निर्मूलनाचा विवेकी विचार लोकमानसात पकड धरू लागला. सामाजिक समतेसाठीचा हा विचार- संघर्ष सुरू होता; पण इथल्या सनातनी धर्मांध शक्तींना हा बदल नको होता. जात, धर्म आणि लिंग याच्या आधारे सामाजिक शोषण, वर्ण, वर्ग संघर्ष हे असेच चालू राहावेत, लोक शहाणे न होता अंधश्रद्धच राहण्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात. अशाच प्रवृत्तीच्या तथाकथित सनातन संस्थेच्या मास्टरमाईंडनी बहुजन समाजातील आपल्या कडव्या साधक तरुणांनाच धर्मांधतेच्या कट्टरतावादी विषाचे डोस पाजून हस्तक मारेकरी बनवले आणि त्यांच्याकरवी २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात डॉ. दाभोलकरांचा खून केला गेला. या खून खटल्याचा निकाल मे २०२४ मध्ये लागला आणि त्यात फक्त हस्तक मारेकऱ्यांनाच शिक्षा झालेली आहे; परंतु खुनामागील मास्टरमाईंड मोकाट सुटले आहेत, याबद्दल पुरोगामी वर्तुळात असंतोष व्यक्त झाला आहे. न्यायालयाने तपास यंत्रणांच्या गलथानपणावर कडक ताशेरे ओढलेले आहेत. सूत्रधारांचे हात बरेच वर पोहोचलेले असतील तर

तपास यंत्रणांचा हा गलथानपणासुद्धा सहेतुक असू शकतो.

डॉ. दाभोलकरांच्यानंतर 'फुले-शाहू-आंबेडकर, आम्ही सारे दाभोलकर', 'आम्ही वारस विवेकाचे' अशी ब्रीदे अंगीकारत कार्यकर्त्यांनी वाटचाल सुरू केली. संघटनेच्या या वाटचालीत अनेक चढउतारदेखील आलेत. आर्थिक हलाखीच्या परिस्थितीतसुद्धा न डगमगता कार्यकर्त्यांनी विवेक आणि कृतिशीलतेतून प्रतिकूल परिस्थितीतही डॉ.दाभोलकरांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा जपला आहे. त्यामुळे संघटनेच्या कृतिकार्यक्रमांमध्ये कधीही खंड पडला नाही. कुठल्याही शासकीय किंवा परदेशी अनुदानाशिवय केवळ लोकसहभागातून संघटनेचे कार्य जोमाने चालू आहे. कार्यकर्त्यांच्या बळावरच जुलै २०२१ पासून 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या आपल्या नव्या मुखपत्राची सुरुवात झालेली आहे. ते अल्पावधीतच एक दर्जेदार नियतकालिक म्हणून वाचकांमध्ये लोकप्रिय झालेले आहे.

डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणायचे की, 'आपण एका संवेदनशील वास्तवासोबत काम करतोय; कारण समाजातील अनेक प्रवाहांच्या विरोधातील हे काम आहे.' महात्मा गांधी म्हणायचे की, 'कोणत्याही चळवळीला चार टप्प्यांतून जावे लागते; उपेक्षा, उपहास, संघर्ष आणि समन्वय'. सुरुवातीला उपेक्षा केली जाते. चळवळीच्या कामाची दखलही घेतली जात नाही. हे आपण अनुभवले आहे. तरीही ती चळवळ वाढतच राहिली तर तिचा उपहास केला जातो. अशाने काही समाजाचे भले होणार नाही, असे उपरोधिक बोलून कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास घालवण्याचा प्रयत्न होतो. त्यातूनही ती चळवळ वाढू लागली तर मग संघर्ष केला जातो; तो वैचारिक, शाब्दिक प्रसंगी हिंसक देखील असतो. जादूटोणाविरोधी कायदा मंजूर होण्यासाठी संघटनेने अशा संघर्षाला संयमाने तोंड दिले आहे. मग मात्र या प्रतिगामी शक्ती समन्वयाच्या पातळीवर येतात. आपल्या संघटनेशी समन्वयाच्या टप्प्यावर मात्र प्रतिगामी शक्ती केव्हा येतील हे सांगता येत नाही. आपल्या संघटनेचा संघर्षाचा टप्पा हा अत्यंत दीर्घ पल्ल्याचा आहे. त्यामुळेच डॉक्टर म्हणायचे की, ही लढाई काही दशकांची नसून अनेक शतकांची आहे. प्रतिगामी शक्तींनी गांधींच्या हयातीत त्यांना कायम विरोधच केला; शेवटी त्यांचा खूनदेखील केला. मात्र त्यानंतरही गांधी संपलेच नाहीत, तेव्हा त्यांनी गांधींना 'प्रातःस्मरणीय' बनवून समन्वयाचा देखावा केलेला आहे. मित्रहो, पुरोगामी आणि प्रतिगामी विचारांचा संघर्ष हा सातत्याने चालूच राहाणार आहे. संघर्षाच्या भूमिकेतही आपले काम अविरत चालू राहील, वाढत राहील ते केवळ राज्यभरातील समर्पित कार्यकर्त्यांच्या बळावरच, असे माझे ठाम मत आहे. म्हणून आपल्या सर्वांचा मला अभिमान आहे.

मित्रहो, बुवाबाजी, अंधश्रद्धा निर्मूलन, शास्त्रीय विचार पद्धती, वैज्ञानिक दृष्टीकोन, विधायक धर्मचिकित्सा, विवेकवाद ते मानवतावादाकडील वाटचाल आपण चळवळीच्या माध्यमातून करीत आहोत. आव्हाने संपणारी नाहीत. आव्हानांचे स्वरूपदेखील सतत बदलत आहे. व्यापक समाजपरिवर्तनाच्या या चळवळीत आपल्यापुढे जातीय ताणतणाव, वाढता दैववाद, धार्मिक उन्माद, चंगळवाद, शासकीय वरदहस्तातून वाढत चाललेली आध्यात्मिक बुवाबाजी, मनुवादी विचारांचा भडिमार, शिक्षणाचे भगवेकरण, आर्थिक विषमता अशी असंख्य आव्हाने अधिकाधिक तीव्र स्वरूपात आपल्यापुढे उभी राहत आहेत. आपली चळवळ ही जीवनाकडे पाहण्याचा विवेकी दृष्टीकोन देणारी, कृतिशील प्रबोधन करणारी चळवळ आहे. प्रतिदिनी समोर येणाऱ्या आव्हानांना विवेकी विचारांच्याआधारे कसे सामोरे जाता येईल? यावर परिवर्तनवादी चळवळींना विचार करावा लागेल. समाजातील पुरोगामी वर्तुळातील लोकांच्या आपल्या चळवळीकडून अपेक्षा वाढत चालल्या आहेत. त्यामुळे आपल्या चळवळीची जबाबदारी अधिक वाढतच चालली आहे.

साथींनो, आपल्या संघटनेच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण झालेली आहेत. वाढत्या आव्हानांना निर्धाराने सामोरे जावेच लागेल. या निमित्ताने आपण एकत्र येऊन निर्धार करू या. आपण हा स्वतःहून स्वीकारलेला विचार असल्याने आपली जबाबदारी अधिक आहे. ती आता टाळता येणार नाही. त्या विचारांपासून माघार घेता येणार नाही. तेव्हा आपण संघटनेला थोडा अधिक वेळ देऊ या. पुरोगामी महाराष्ट्रात जातींच्या भिंती गेल्या काही दशकात कोसळत असतानाच अलीकडे त्या पुन्हा उभ्या करण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत विवेकनिष्ठ होत व्यवस्था परिवर्तनासाठी प्रयत्नशील राहू या. संघटनेला ३५ वर्षे पूर्ण होत असतानाच भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव देखील साजरा करीत आहोत. त्यानिमित्ताने आळंदी येथे ८, ९, १० नोव्हेंबर २०२४ असे तीन दिवसांचे राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करण्याचे ठरविले आहे. त्यात संघटनेचे दोन दिवसांचे अधिवेशन आणि नंतरचा एक दिवस संविधानाच्या संदर्भात वेगवेगळ्या पैलूंवर दृष्टिक्षेप टाकणाऱ्या एक दिवसीय परिषदेचे आयोजन असेल ते यशस्वी करण्यासाठी आपण सर्वांनी सक्रिय सहभागी व्हावे, असे मी आवाहन करतो. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन!

विवेकाचा आवाज बुलंद करू या!

●

# माझे आणि माझ्या पत्नीचे विवेकवादी भान



**जगदीश काबरे ।** सांगली
९९२०१९७६८०

मी परिवर्तनवादी, विवेकवादी चळवळींमध्ये अनेक वर्षे सक्रिय राहिलो आहे. हा प्रवास कसा सुरू झाला आणि ती वाटचाल कशी झाली याविषयी अलीकडे एका मुलाखतीत मला कुमार नागे यांनी खालील तीन प्रश्न विचारले होते. ते प्रश्न आणि मी त्यांना दिलेली उत्तरे अशी-

**प्रश्न १ : आपण नास्तिकतेकडे कोणत्या वयापासून आणि कसे वळलात?**

**उत्तर :** मी आठवीत असताना मला वाचनाची सवय लागली. या अवांतर वाचनाची गोडी एवढी वाढली की मी दिसेल त्या छापील कागदावरील छापील अक्षरे वाचण्याचा सपाटा सुरू केला. त्या काळात वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, प्र. के. अत्रे, वि. द. घाटे अशा अनेक लेखकांच्या कथा-कादंबऱ्या वाचण्यात आल्या आणि ललित साहित्यात रस निर्माण झाला. दहावीत गेल्यावर मला मराठी विषयात आगरकरांचा धडा होता. सर्वसाधारणपणे शालेय पुस्तकात धडे कोणत्या मूळ पुस्तकातून घेतले आहेत, ते सुरुवातीलाच लिहिलेले असते. आम्हाला 'संदर्भासह स्पष्टीकरण करा' असा एक मोठा प्रश्न असायचा. त्यामुळे मी अशी सवय लावून घेतली होती की, धडा ज्या मूळ पुस्तकातून घेतला आहे ते मूळ पुस्तकच वाचून काढायचे. म्हणजे उत्तर अधिक चांगल्या पद्धतीने लिहिता येते. तेव्हाच मी आगरकरांचे 'सुधारकपत्राचे खंड' वाचून काढले होते. त्यामुळे माझ्या दृष्टिकोनात खूप फरक पडला. माझ्या वाचनाला एक दिशा मिळाली. अशा प्रकारचे वाचन करत असतानाच सावरकरांची 'क्ष-किरणे' आणि 'विज्ञाननिष्ठ निबंध' ही दोन पुस्तके माझ्या वाचनात आली. त्यात त्यांनी देवधर्मविषयक विचारलेल्या प्रश्नांनी माझी झोप उडवली. मलाही अनेक प्रकारचे देवाधर्माविषयीचे प्रश्न पडू लागले. मग मी घरातील मोठी माणसे, शाळेतील शिक्षक आणि घरी धार्मिक कर्मकांड, पौरोहित्य करायला येणारे आमचे गुरुजी, या सगळ्यांना असे वेगवेगळे प्रश्न विचारून भंडावून सोडू लागलो. पण त्यापैकी कोणीही, अगदी आमचे शिक्षकसुद्धा मला योग्य उत्तर देऊ शकले नाहीत. या सगळ्यांचे म्हणणे होते की, 'आमचे वाडवडील हे कुळाचार आणि कर्मकांड करत आले म्हणून आम्ही करतो-अगदी पटले नाही तरी करतो. कारण त्याने नुकसान तर होत नाही ना, अशी आमची धारणा आहे आणि मोठ्यांना का दुखवा असे आम्हाला वाटते. या पलीकडे आम्हाला माहीत नाही.'

मग माझ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी मला पुन्हा पुस्तकांकडे वळावे लागले. कारण आता पुस्तके हेच माझे गुरू होते. परिणामी, मी लोकहितवादी, महात्मा फुले, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे साहित्य वाचू लागलो. या वैचारिक वाचनामुळे माझे मन हळूहळू नास्तिकतेकडे वळायला लागले; अंधश्रद्धामुक्त होऊ लागले होते. म्हणून मग मी घरातील धार्मिक कर्मकांड करायला नकार देऊ लागलो आणि देवाला नमस्कार करणेही सोडून दिले.

एव्हाना मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षापर्यंत आलो होतो आणि वेगवेगळ्या सामाजिक चळवळीत लुडबुड करू लागलो होतो. या दरम्यानच माझ्या वाचनात नि. र. वऱ्हाडपांडे आणि दि. य. देशपांडे यांची विवेकवादावरची पुस्तके वाचनात आली. याचा परिणाम म्हणजे माझा नास्तिकतेकडून विवेकवादाकडे प्रवास सुरू झाला; तो आजतागायत सुरूच आहे. अशा प्रकारे वयाच्या बाविसाव्या वर्षी मी पूर्णपणे नास्तिक आणि विवेकवादी विचारसरणीचा झालो.

माझ्या आयुष्यात अनेक चढउतार आले असले तरी विवेकाने कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याची वृत्ती अंगी बाणल्यामुळे कोणत्याही संकटकाळात मला देवाला हात जोडावेसे वाटले नाही की संकटनिवारणासाठी काही धार्मिक कर्मकांड करावेसे कधीच वाटले नाही. कारण जीवनातील कोणत्याही समस्येचे मूळ कोणत्याही पारलौकिक कारणात नसून प्रत्येक समस्येचे कारण याच इहलोकातील व्यवहारात असते. त्यामुळे त्या समस्येचे उत्तरदेखील आपल्या भोवतालच्या परिस्थितीतच शोधून

मिळणार असते. ते शोधण्यासाठी मात्र आपल्यालाच प्रयत्न करावे लागतात, तरच जीवनातील संकटांचे निवारण होऊ शकते, असे मला खात्रीपूर्वक वाटत होते. याच पद्धतीने मी माझ्या जीवनातील आजवरच्या सगळ्या संकटांवर मात करत गेलो आहे. आज माझे वय ७३ आहे. नास्तिक झाल्यापासून आजपर्यंत म्हणजे जवळजवळ ५१ वर्षे मला म्हणूनच केव्हाही देवाधर्माची गरज वाटली नाही.

'शून्य धर्म, समृद्ध जीवन' हेच माझे सध्या ब्रीदवाक्य झाले आहे. म्हणूनच मी कोणाविषयीही द्वेष, आकस न बाळगत समृद्ध जीवन जगत आहे.

**प्रश्न : २ तुमच्या पत्नी माधुरी यांचे नास्तिकतेविषयी काय विचार होते आणि त्यांनी कोणत्या प्रकारे सहभाग घेतला?**

**उत्तर:** माधुरीचे आणि माझे जेव्हा सूर जुळू लागले तेव्हा आमच्या बोलण्यात देवधर्म, अंधश्रद्धा, घरात होणारे धार्मिक कर्मकांड या विषयांवरही चर्चा व्हायची. त्यावेळेला ती म्हणायची की, मी लहानपणापासूनच नास्तिकतेकडे झुकलेली आहे. देवाधर्माविषयी कधीच मला फार आकर्षण वाटलं नाही. घरात वेगवेगळे सणवार, धार्मिक कर्मकांड साग्रसंगीत केले जायचे. त्यात मी फारशी सहभाग घेत नसे. पण त्यानिमित्ताने घरात गोडधोड जेवण केले जात असे आणि मला स्वयंपाकात रुची असल्यामुळे मी स्वयंपाकघरात ते करण्यासाठी हिरिरीने पुढे असे. देवाधर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा-परंपरा, अंधश्रद्धायुक्त कर्मकांड यातील फोलपणा कळलेला असला तरीदेखील देवाची एखादी सुबक मूर्ती पाहिली की, आपसूक माझे हात जोडले जातात. तसेच मशिदीतही आणि जीझस पुढेही. ते देवाला नसून ते मूर्ती घडवणाऱ्या मूर्तिकारासाठी असतात. त्या प्रार्थना स्थळाच्या कोरीव काम करणाऱ्यांसाठी असतात. कारण त्याने किती मन लावून ती सुबक देखणी मूर्ती वा वास्तू तयार केलेली असते.

एकदा अशीच वटसावित्री, मार्गशीर्षातील लक्ष्मी व्रत, अशा व्रतवैकल्यावर चर्चा करत असताना ती म्हणाली होती की, मला एक कळत नाही की, ही सगळी व्रतवैकल्ये स्त्रियांनीच का करावीत आणि तीही पुरुषाच्या भल्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी. पुरुषांनी स्त्रियांसाठी एखादे व्रत का करू नये, स्त्रीच्या भल्यासाठी आणि तिच्या दीर्घायुष्यासाठी? मुळात अशी व्रतवैकल्ये करून खरेच आपले भले होत असते का? कोणाचे तरी झाले आहे का? याचा कधीतरी स्त्रियांनीच विचार करायला नको का? ही व्रतवैकल्ये म्हणजे संस्कृतिरक्षण असेल तर ती संस्कृती नसून स्त्रियांना रूढीबद्धतेत अडकवून पुरुषांची दासी बनवण्याची ती विकृती आहे, कारस्थान आहे.

देवाबद्दल तिचे म्हणणे होते की, जर परमेश्वरानेच आपल्याला निर्माण केले तर त्याला आपली दुःखे माहीत पाहिजेत. ती जर माहीत नाहीत तर बेजबाबदारपणे अपत्यांना जन्म देऊन पोरवडा निर्माण करून स्वस्थ बसणाऱ्या बापापेक्षा त्याची किंमत जास्त नाही. वास्तविक, 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' असे गुण ज्याला चिकटवले जातात त्याने उत्पत्ती करतानाच मानवाला जास्त परिपूर्ण निर्माण करणे त्याला अशक्य नव्हते आणि नंतर त्याच्याच सदोष घडणावळीमुळे (defective design) निर्माण झालेल्या दुःखासाठी त्याच्याचकडे धाव घ्यायची! हा तर त्याने जुलूमच केला म्हणावा. हातून घडलेले दोष दुरुस्त करता येत नसतील तर तो सर्वशक्तिमान नाही, की भोवती खुशामत करणाऱ्यांचा एक ताफा सदैव असावा, म्हणून त्याने असा सदोष माणूस निर्माण केला? एवढ्या परखड विचारांची होती माधुरी. तिचे निधन होऊन आता या १६ ऑगस्टला दोन वर्षे पूर्ण होतील.

**प्रश्न ३ : चळवळीतील वेगवेगळ्या संघटनांना देणग्या द्याव्या असे तुम्हाला का वाटले?**

**उत्तर :** मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना बाबा आमटे यांच्या आनंदवनात दरवर्षी मे महिन्यात होणाऱ्या 'श्रम छावणीच्या शिबिरा'ला एक शिबिरार्थी म्हणून गेलो होतो. तिथे माझ्यासारख्या अनेक समविचारी तरुण-तरुणींची ओळख झाली. सगळे कसे उत्साहाने भरलेले वातावरण होते. त्या शिबिरात सामाजिक काम करण्याच्या संदर्भात आपण कशी भूमिका घ्यावी, नेमके काय काम करायला हवे, कोणत्या दिशेने सामान्य माणसात वैज्ञानिक दृष्टीकोन जागृत करायला हवा, अशा वेगवेगळ्या विचारांवर ऊहापोह झाला. तो माझ्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम करून गेला आणि मग परत आल्यानंतर मी 'लोक विज्ञान संघटने'त काम करू लागलो. त्यानंतर १९८४ मध्ये श्याम मानव जेव्हा मुंबईत आले तेव्हा त्यांच्याबरोबर अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत कार्यरत झालो. दरम्यानच्या काळात ग्रंथाली वाचक चळवळ, मराठी विज्ञान परिषदेशीही संबंधित होतो.

१९८५ ला खगोल मंडळाचा संस्थापक अध्यक्ष झालो. २०१६ साली ब्राईट्स सोसायटीच्या संपर्कात आलो आणि सध्या ब्राईट्सबरोबर काम करत आहे. असो.

सांगायचा मुद्दा हा की, या चळवळींमध्ये काम करत असताना सुरुवातीलाच माझ्या असे लक्षात आले की, मोठ्या माणसांना आपण वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेकवादासंबंधी कितीही चांगल्या पद्धतीने समजावून देत असलो तरी 'कळते पण वळत नाही' अशी त्यांची स्थिती झालेली असते. कारण लहानपणीचे संस्कार एवढे घट्ट रुजलेले असतात की, ते बाजूला सारायचे तर आपल्या अस्तित्वाचे मूळच उपटले जाते की काय अशी भीती त्यांना वाटते. म्हणून त्यांना आपले म्हणणे पटले तरी ते 'लोक काय म्हणतील?' या भीतीपोटी जगरहाटी बदलून प्रवाहाविरुद्ध पोहण्यास तयार होत नाहीत किंवा फार तर असे म्हणता येईल की ते असे धाडस करायला धजत नाहीत. मग आपले सगळे म्हणणे फुकट जातेय, असे मला वाटायला लागल्यामुळे आपण नेमके काम कुठे करावे ज्याचा समाजात स्थायीस्वरूपी परिणाम होईल, याचा विचार सुरू झाला आणि वाचनात आलेले एक वाक्य आठवले – Catch them young. म्हणून मग मी असे ठरवले की, आपण पौगंडावस्थेतील मुलांमध्ये काम करायला हवे. कारण या वयातील मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते, त्यांचा 'स्व' जागृत होत असतो आणि ती स्वतः स्वतंत्र विचार करायला लागलेली असतात. तेव्हा त्यांना नेमकी विचारांची योग्य दिशा मिळणे आवश्यक असते. पण काम करत असतानाच आपला चरितार्थही चालायला हवा, हेही माझ्या मनात पक्के होते. कारण समाजासाठी काम करत असताना आधी आपण स्थिरस्थावर होणे आवश्यक असते. आपण जर समाधानी असलो तरच आपण लोकांना काहीतरी समाधान देऊ शकतो, असे मला वाटते. त्यामुळे मग मी शिक्षक व्हायचे ठरवले. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान शिकवायचे ठरवले. हे विषय शिकवताना वैज्ञानिक दृष्टिकोनातून जगायचे कसे, अंधश्रद्धा म्हणजे काय, विवेकवाद म्हणजे काय, याची आपल्याला मांडणी करता येईल असा विश्वास होता. म्हणून शिकवताना फक्त पुस्तकी अभ्यास न शिकवता त्या अभ्यासाबरोबरच जगाकडे डोळे उघडे ठेवून कशा पद्धतीने पाहायला हवे, आत्मविश्वासाने कसे जगायला हवे, जीवनातील कोणतीही समस्या सोडवताना प्रयत्न कसे करायला हवेत, वैज्ञानिक दृष्टीकोन हा माणसाला कसा घडवतो व त्यामुळे जीवन गुणवत्तापूर्ण कसे होते, हे सगळे सांगू लागलो.

शिक्षकी पेशा करत असतानाच वेगवेगळ्या चळवळींशी संबंध येत गेला. त्यांच्याबरोबर काम करताना लक्षात आले की, अनेक चळवळी शैक्षणिक कार्यक्रम राबवणारे उपक्रम करत असतात. पण त्यांना निधीची कमतरता पडते. अशा वेळेस आपल्याकडून होता होईल ती मदत करावी या उद्देशाने मी सुरुवातीला आर्थिक सुस्थितीत नसल्यामुळे त्या त्या संस्थांमधील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासात मदत करण्याचे काम सुरू केले. काही संस्थांमध्ये पुस्तके भेट दिली आणि २०१० नंतर जेव्हा आर्थिक सुस्थितीत आलो तेव्हा मी वेगवेगळ्या संस्थांना आर्थिक मदतही करू लागलो. एकंदरीत कॉलेजच्या आयुष्यापासून सामाजिक चळवळीकडे माझा ओढा होता आणि आपण समाजाचे काही देणे लागतो, असे मला सतत वाटत होते. त्यातून मी माझ्या उत्पन्नातून मदत निधी वेगळा काढू लागलो. मला असे वाटते की, आपण आपल्या आयुष्यात आपल्याला जेवढे लागेल तेवढे कमावल्यानंतर उरलेली सगळी रक्कम समाजाला परत केली पाहिजे. या विचारामुळेच जसजसे माझ्याकडे पैसे जमत गेले तसतशी मी वेगवेगळ्या संस्थांना मदत करत गेलो आणि यापुढेही करत राहीन. थोडक्यात, माझ्या जगण्यात असा सामाजिक परिवर्तनाचा दृष्टीकोन असल्यामुळे मी वेगवेगळ्या चळवळींना मदत देत आहे आणि चळवळींमध्ये प्रत्यक्ष कार्यरतही आहे. विविध सामाजिक चळवळींना शिक्षण साहाय्य निधी म्हणून मी आतापर्यंत काही लाख रुपयांच्या देणग्या माझ्या वैयक्तिक मिळकतीतून दिलेल्या आहेत. आता यापुढे माधुरीच्या स्मृतिप्रित्यर्थ 'मधुरजग फाउंडेशन' ही संस्था स्थापन करून त्यातून मदतनिधी देण्याचा मानस आहे.

त्यामुळे आमच्या घरात पुस्तकांसाठी भरपूर जागा आहे; पण देवघरासाठी मात्र नाही. वरील प्रश्नांना सविस्तर उत्तरे मी दिलेली आहेत. काही मतभेद वगळले तरी ती परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांसाठी विचारप्रवर्तक ठरतील असे वाटते.

**(लेखक परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते व साहित्यिक आहेत.)**

●



# सत्संग मेळावे की मृत्यूचे सापळे?

**सुशीला मुंडे ।** नवी मुंबई
९८७०७३०३६८

उत्तर प्रदेशातील हाथरस पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. १४ सप्टेंबर २०२० रोजी याच जिल्ह्यात एका युवतीवर समाजकंटकांनी सामूहिक बलात्कार करून तिचा खून केला होता. पोलिसांनीच तिच्या प्रेताची रात्रीच्या अंधारात परस्पर विल्हेवाट लावली. ‘आम्हाला आमच्या मुलीचा चेहरासुद्धा पाहू दिला नाही’, असा आकांत कुटुंबीय करीत राहिले. परंतु गुन्हेगारांना शासन व्हावे यासाठी गुन्ह्याचे पुरावे मिळविण्याची संविधानिक आणि नैतिक जबाबदारी ज्यांच्यावर असते त्या पोलीस प्रशासनानेच गुन्हेगारांना पाठीशी घालत कोणतेही पुरावे शिल्लक राहूच नयेत, यासाठी खून झालेल्या पीडितेचे प्रेत तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात न देता एखाद्या बेवारस प्रेताच्या बाबतीत जसे केले जाते तसे कृत्य करण्याचे कदाचित देशातील हे पहिलेच प्रकरण असावे. जनतेला न्याय देण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या प्रशासनाची ‘कोण आम्हासी पुसतो’, ‘आम्ही म्हणू तोच कायदा’ अशी हुकूमशाही दंडेली यामागे असते. अर्थातच, निर्दयी शासकांच्या पाठबळावरच प्रशासनातील ‘माणूस (?)’ देखील इतका मुजोर, निर्दयी होऊ शकतो.

वरील प्रकरणाची न्यायालयीन लढाई चालू असतानाच देशाला हादरवून टाकणाऱ्या एका घटनेने पुन्हा एकदा हाथरस चर्चेत आले आहे. २ जुलै २०२४ रोजी हाथरसमध्ये भरवलेल्या सत्संगातील चेंगराचेंगरीत तब्बल १२२ लोकांचा बळी गेला (हा आकडा वाढतोच आहे). ही दुर्घटना घडून तीन दिवसानंतर हा लेख लिहीत असेपर्यंत भक्तांचा ‘तारणहार’ भोलेबाबा व त्याच्या कार्यक्रमाचे आयोजक फरार आहेत. प्रशासन नेहमीप्रमाणे ‘शोध’ घेतच आहे. सामान्य तपासाच्या प्रक्रियेनुसार आस्ते कदम कारवाई होत राहील आणि शेवटी अशी प्रकरणे दडपली जाण्याचीच शक्यता अधिक असते. याविषयाबाबत देश पातळीवर विशेष कायदा होण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र अंनिसकडून यापूर्वीच निवेदने, पत्रव्यवहार, पाठपुरावा झालेला आहे. आता महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री यांना या प्रकरणाच्या चौकशीसाठी व देश पातळीवरील कायद्यासाठी पुन्हा स्मरणपत्र दिलेले आहे. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते काँग्रेसचे खासदार मल्लिकार्जुन खर्गे यांनी देखील या घटनेच्या निमित्ताने अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची मागणी केली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. वास्तविक अशा स्वरूपाच्या कायद्याच्या मागणीला पक्षीय मतभेद बाजूला सारून वेळ न दवडता सर्वपक्षीय पाठिंबा मिळायला हवा.

मात्र अशाप्रकारे १२२ लोकांच्या मृत्यूस कारणीभूत



ठरणाऱ्या भोलेबाबाला आणि त्याच्या संयोजकांना अटक करण्यासाठी सध्या तरी देशपातळीवर कोणताही विशेष कायदा नाही, ही खेदाची बाब आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि त्यांच्या हजारो सहकाऱ्यांच्या अनेक वर्षांच्या संघर्षातून २०१३ मध्ये पारित झालेला कायदा हा अनेक बुवाबाबांना गजाआड नेण्यास सहाय्यभूत ठरला आहे. जोपर्यंत सलग काही प्रकरणांमध्ये मोठ्या संख्येने लोक बळी जात नाहीत तोपर्यंत आपल्याकडे अशा प्रकरणांची गंभीरपणे दखल घेतली जात नाही. त्यामुळे आता घडलेल्या एका प्रकरणातील बळींची शासन आणि प्रशासन दखल घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई करेल का आणि जनता यातून काही शहाणपण शिकेल का, हा खरा प्रश्न आहे. कारण अशा प्रकारच्या चेंगराचेंगरीत मृत्यू होण्याचे हे काही पहिले प्रकरण नाही. यापूर्वी महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी प्रकरण, खारघर, नवी मुंबई येथील आप्पा धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरणासाठी जीवघेण्या कडकडीत उन्हात

आयोजित केलेला सोहळा. कथाकार प्रदीप मिश्रा यांनी मध्यप्रदेशातील सिहोर येथे रुद्राक्ष वाटपाच्या निमित्ताने जमवलेल्या गर्दीतील चेंगराचेंगरी, नाशिक येथील कुंभमेळ्यात साधूंनी उधळलेली नाणी उचलण्यासाठी झालेली चेंगराचेंगरी, अलीकडेच हज यात्रेदरम्यान उष्माघाताने झालेले मृत्यू, अशी अनेक प्रकरणे यापूर्वीही



घडलेली आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये प्रशासनाने कुटुंबीयांना भरपाई देण्यामागे फक्त पीडितांचा आवाज बंद करण्याचा हेतू असतो; थातूरमातूर चौकशी केली जाते, बळी गेलेल्यांना न्याय मात्र मिळतच नाही. तरीही काहीतरी आमिष दाखवून अशी गर्दी गोळा करणाऱ्या कुठल्याही बाबा, बुवा, अम्मा, माता, देवी, बापू, आप्पा यांना अटक किंवा शिक्षा कधीही झालेली नाही. कारण त्यांना शिक्षेपर्यंत पोहोचवण्याची ज्यांच्यावर जबाबदारी असते त्याच शासन, प्रशासनातील धेंडांचाच वरदहस्त असतो.

ज्याच्या तथाकथित सत्संगात एवढी गर्दी झाली, तो भोलेबाबा कोण आहे? तर हा पूर्वाश्रमीचा सूरज पालसिंग जाटव नावाचा शासकीय सेवेतला एक सामान्य हवालदार. एका महिला कर्मचाऱ्यावर जबरदस्ती केल्याचा त्याच्यावर गुन्हा होता. तिथून हकालपट्टी झाल्यावर नारायण साकार हरी उर्फ भोलेबाबा नाव धारण करून तो स्वयंघोषित धार्मिक गुरू बनतो. या पाखंडी भोलेबाबाची बुवाबाजी गेल्या २४ वर्षांपासून सरसास चालू आहे. तब्बल २४ वर्षांपूर्वी चिल्लर असलेला हा बाबा आज इतका मोठा झाला की त्याने गुलाबी आर्मी या नावाने स्वतःची आर्मी उभारलेली आहे. ही आर्मी काय काम करते, तर भोलेबाबाची सुरक्षा व्यवस्था पाहते. आलेल्या भक्तांना मंडपापर्यंत आणून सोडणे, त्यांची बैठक व्यवस्था पाहणे आणि त्याचबरोबर कोणीही मोबाईलमधून भोलेबाबाच्या प्रवचनाचे शूटिंग तर करत नाही ना, याची खबरदारी ही गुलाबी आर्मी घेत असते. सत्संगाला आलेल्या भक्तांशी अतिशय उर्मटपणे वागणारी ही आर्मी पोलिसांनाही जुमानत नाही. पोलीस यंत्रणा आणि प्रशासन या दोन्ही यंत्रणा गुलाबी आर्मीसमोर झुकत असल्याचे चित्र अशा सत्संगांमध्ये दिसून येते. कुठून येते एवढी हिंमत आणि कुठून येतोय एवढा माज? दीडशे-दोनशे लोकांची फौज पोसण्यासाठी एवढा पैसा येतो कुठून? एका सामान्य हवालदाराकडे एवढा जमीनजुमला, इतका पैसा आला कुठून? प्रवचनाच्या आधीच यांची गुलाबी फौज सत्संगाच्या ठिकाणी येऊन पोहोचत असते. बाबाच्या येण्याजाण्याच्या मार्गावर वाहतूक नियंत्रण करणे तसेच भोलेबाबाचे तेथील आगमन, निर्गमन सुरक्षित होतील यावर त्याच्या आर्मीचा कटाक्ष असतो. बाबाच्या मार्गात चुकूनही कोणी आडवा आला तर त्याला शिव्यांची लाखोली वाहिली जाते, धक्का मारून बाहेर काढले जाते. तरीही भक्तांचा आत्मसन्मान, अहंकार करपून जात नाही इतकी मानसिक गुलामगिरी त्यांनी आधीच स्वीकारलेली असते. संपूर्ण सत्संगाच्या कार्यक्रमामध्ये पोलीस प्रशासनाचा हस्तक्षेप बाबाला आणि गुलाबी आर्मीला जराही चालत नाही. सत्संगाच्या ठिकाणी तर ठरावीक क्षेत्रात पोलिसांना देखील मज्जाव असतो. एवढे धाडस? कुणाच्या आशीर्वादाने हे सगळं चालतं? अशी गुंडगिरीचीच पार्श्वभूमी असलेले लोक लक्षावधी लोकांचे गुरू आणि श्रद्धास्थाने कशी बनतात, याची चिकित्सा कोणी करीत नाही; करू पाहणाऱ्यांना करू दिली जात नाही, त्यांना बेदखल केले जाते.

या भोलेबाबाने आजवर अनेक चमत्कारिक दावे केले. परंतु सन २००० मध्ये त्याने एका सोळा वर्षांच्या मृत युवतीला चक्क जिवंत करून दाखवण्याचा दावा केला. ही घटना सुलतान घाट, आग्रा येथील आहे. हा दावा जाहीरपणे केल्यामुळे सुलतान घाट येथे मृत तरुणी, तिचे नातेवाईक आणि भोलेबाबा यांच्यासह तीनेक शे लोकांचा समुदाय उपस्थित होता. सदर खबर त्यावेळचे तिथले पोलीस इन्स्पेक्टर तेजवी सिंग यांना कळवण्यात आली. त्यांनी त्वरित हालचाली करून सदर ठिकाणचा ताबा घेऊन भोलेबाबाला समजावण्याचा प्रयत्न केला की, अशा पद्धतीने मृत व्यक्ती जिवंत केल्याचा चमत्कारिक दावा करू नये. तरीही भोलेबाबा सांगत होता की, 'ती आत्ताच जिवंत होईल आणि आत्ता दूध पिऊ लागेल'. शाब्दिक चकमक झाली, पोलीसही ऐकेनात आणि बाबाचा भक्तसमुदायही हटेना. बाका प्रसंग उद्‌भवला. बाबा रामपालने व त्याच्या भक्तगण टोळीने पोलिसांवर जसा उलटा हल्ला केला होता, त्याप्रमाणेच भोलेबाबाच्या

भक्तांनी पोलीस पथकावर दगडफेक केली. मात्र पोलीस यंत्रणा तिथून हटली नाही आणि भोलेबाबा यास अटक करून जेलमध्ये रवाना केले होते. बाबाच्या चमत्कारिक दाव्यांचा इतिहास इतका जुना आहे.

'मृत व्यक्तीला देखील जिवंत करू शकतो', अशा अशक्यप्राय दाव्यांवर श्रद्धा ठेवण्यापर्यंत जनमानसाची तयारी कशी होते? अशा बाबाभोवती जमणाऱ्या गर्दीत सर्वच 'भक्त' असतात असे नाही. त्यात बाबाच्या या धंद्यातील काही लाभार्थी प्रचारक, दलालदेखील असतात. एखाद्या तथाकथित सत्संगात भक्तांची संख्या पन्नास हजार असेल तर हे प्रचारक, दलाल सत्संगामध्ये लाखांहून अधिक लोक असल्याचा प्रचार करतात. बाबाच्या चेहऱ्यावर एक वेगळेच तेज, त्याच्या वाणीमध्ये कमालीचा गोडवा असल्याचा, बाबाच्या तेजाने, वाणीने आपण भारावून गेल्याचा प्रचार करीत राहातात. त्याच्यात दैवीशक्ती असल्याचा प्रचार केला जातो. अशावेळी जे कोणी सत्संगाला गेलेले नसतील त्यांनाही भोलेबाबाला भेटण्याची ओढ, उत्कंठा लागते. यातून भक्तांची संख्या वाढत राहते. बाबाच्या पायाखालील धुळीनेसुद्धा भले होते, अशी अतिशयोक्त विधाने करून बाबाचे व्यक्तिमाहात्म्य वाढवण्याची या भक्तांमध्ये चढाओढ लागते. प्रत्यक्ष हजेरी लावणाऱ्यांमध्ये आपल्या बाबाचा रुबाब, थाट, ऐट पाहून भक्तांच्या अंगावर मूठभर मांस चढते. असे हे प्रचारकी तंत्र वापरून जनमानसाचा ताबा घेतला जातो.

या प्रचारकी तंत्राला बळी पडून बाबाच्या सत्संगाला गर्दी करणारे हे भक्त असतात तरी कोण? असा बाबा एवढा मोठा झालेला असतो की, सामान्य भक्त त्याच्या आसपासच्या वर्तुळातही फिरकू शकत नाहीत. आपल्या शिष्याला तुच्छ लेखणारा, पायाशी बसवणारा, त्याचे शोषण करणारा, कधीही सत्यात न उतरणारे अशक्य कोटीतले व अतर्क्य, चमत्कारिक दावे करणारा, लोकांना मूर्ख बनवणारा गुरू हा कधीच चांगला गुरू असू शकत नाही. तरीही हे लोक त्याच्याकडे गर्दी का करतात? खरंतर या भक्तांच्या आयुष्यात अनेक व्यावहारिक समस्या असतात. आरोग्याचे, शिक्षणाचे, रोजगाराचे, तरुणांच्या विवाहाचे, बेभरवशाच्या शेतीचे असे अनेक प्रश्न सतावत असतात. प्रलंबित न्यायिक खटले, कर्जबाजारीपणा आणि सावकारी विळखा, व्यसनाधीनता, संततीप्राप्ती अशा एक ना अनेक समस्यांनी सामान्य माणूस पिचलेला असतो. या व्यावहारिक समस्या सुटण्याचा मार्ग व्यावहारिकच असतो तरीही इथल्या भ्रष्ट व्यवस्थेत समस्या सुटण्याचा मार्ग त्याला दिसत नाही. मग तो बाबाचा आशीर्वाद किंवा बाबाची चरणधूळ माथ्याला लावणे अशा भोंदूगिरीच्या, खोट्या पारलौकिक आश्वासनांना बळी पडतो.

उत्तरप्रदेशमधील हाथरस जिल्ह्यातील भोलेबाबाच्या तथाकथित सत्संगास हरियाणा, राजस्थान, मध्यप्रदेश इत्यादी राज्यांमधूनदेखील भक्त आले होते. त्यांच्यासाठी बाबा तारणहार होता. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये ९० टक्के महिला आहेत. कारण देवाधर्माचे भय आणि व्यावहारिक समस्या सुटण्याच्या पारलौकिक आश्वासनांवर श्रद्धा असणाऱ्यांमध्ये महिलांचेच प्रमाण अधिक आहे. नाहीतरी कुटुंबावर संकट ओढवेल याची सतत टांगती तलवार महिलांच्याच डोक्यावर अधिक असते. कारण तिचे जगणे कुटुंबासाठीच असते. पराकोटीच्या अंधश्रद्ध, अज्ञानी, अगतिक, अभावग्रस्त, भविष्याची चिंता, असुरक्षितता यांनी गांजलेल्या समाजाला त्यावरील पारलौकिक उपायांनी आश्वस्त वाटते. आपल्या बाबाच्या दिव्य वाणीमध्ये परमात्म्याचा वास आहे व ती दिव्य वाणी कानावर पडली तरी सारी संकटे, कष्ट, भय दूर होतील हा भाबडा आशावाद आणि आंधळा भक्तीभाव तमाम भक्तांना गर्दीत घेऊन आला आणि मृत्यूच्या दाढेत ढकलून गेला. सर्व मृतांमध्ये दारिद्र्याने पीडित व्यक्तीच दिसून येतात. परंतु बेफिकीर, निष्ठुर, निर्ढावलेल्या बाबाला मात्र भक्तांकडे मान वळवून पाहण्यासही वेळ नव्हता.

सत्संग, मेळावे, महाराजांच्या भव्य धार्मिक मिरवणुका, प्राणप्रतिष्ठा या सगळ्या भाऊगर्दीत अडाणी, शैक्षणिक व आर्थिक निम्नस्तर असलेला, दारिद्र्याने गांजलेलाच जनसमुदाय असतो असेही नाही. इथे उच्चशिक्षित, नवश्रीमंत, हायटेक तरुणाई, या सगळ्यांचाच भरणा असतो. मात्र त्यांच्या समस्या आणि अपेक्षा काही वेगळ्या असतात. चेंगरून मरणाऱ्यांच्या गर्दीत हा वर्ग नसतो. कारण बाबाच्या दरबारात यांची व्हीआयपी व्यवस्था असते. आयुष्यात सुखाचा, चंगळवादाचा शॉर्टकट म्हणून ही समस्त मंडळी अशा ढोंगी, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या बुवाबाबांच्या आश्रयाला जातात. जीवनात समस्या तर सर्वांनाच असतात. तरीही आपल्या बौद्धिक क्षमतेने त्यावर उपाय शोधण्याऐवजी अध्यात्माच्या बाजारू तत्त्वज्ञानाने भ्रमित होतात आणि संबंधित गुरू, अम्मा, महाराज, बापू, आप्पा यांना शरण जातात. व्यावहारिक समस्यांचा संबंध थेट पारलौकिकाशी जोडणे भक्तांच्या दृष्टीने फारच सहजसोपा आणि

बिनकटकटीचा उपाय असतो. यातूनच अध्यात्माचा बाजार मोठ्या प्रमाणावर फोफावतो.

एखाद्या अशा भोलेबाबाच्या तथाकथित धार्मिक कार्यक्रमाचे आयोजक आणि प्रायोजक कोण असतात? धर्मकारण हे अलीकडे राजकीय सत्ता हस्तगत करण्याचे साधन झाले आहे. त्यामुळे धार्मिक भोदूंकडे येणाऱ्या गर्दीचे मतांमध्ये रोखीकरण करण्याच्या हेतूने राजकारणी अशा भोदूंच्या कार्यक्रमांचे आयोजन करीत असतात. त्यांना राजकीय आश्रय देत असतात. अशी ही धार्मिक भोदूंची आणि राजकारण्यांची अभद्र युती झालेली आहे. ती सामान्य माणसाच्या लक्षात येत नाही तोपर्यंत माणसे किड्यामुंग्यांप्रमाणे चिरडली जातच राहतील. निसर्गात चमत्कार कधीही घडत नाहीत. जे काही चमत्कार घडल्यासारखे वाटतात त्यामागे माणसाला समजलेला किंवा न समजलेला असा काहीतरी कार्यकारणभाव असतो. अशी सामान्य समज सामान्य माणसाला येणे तसे काही कठीण नाही. परंतु अशी समज सामान्य माणसाच्या ठिकाणी निर्माण होऊच नये यासाठी धार्मिक भोंदू आणि राजकारणी प्रयत्नशील असतात. त्यामुळे मग हजची यात्रा असो, कुंभमेळा असो किंवा माउंट मेरीची यात्रा असो, धार्मिक स्थळांवर खूप मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होतच राहणार. एरवी रस्त्यात थोडा धक्का लागला तरी एकमेकांवर गुरगुरणारे लोक या प्रचंड गर्दीत मात्र धक्काबुक्की, ऊन, तहान, भूक विसरून, सोबत असलेली चिल्लीपिल्ली या कशाचीही तमा बाळगत नाहीत. मुलांच्या शिक्षणासाठी एसटीच्या मासिक पाससाठीदेखील यांना पैशाची चिंता सतावते. परंतु जिथे काहीही पदरात पडत नाही अशा सत्संगाला मात्र हालअपेष्टा सोसत मिळेल त्या वाहनाने शेकडो किलोमीटर दूर जाण्याची यांची तयारी असते. मैत्रिणींबरोबर सिनेमाला जाण्यासाठी परवानगी नाकारणारे पालक 'माझी मुलगी सत्संगात जाते' असं छाती फुगवून सांगतात. तथाकथित धार्मिकतेकडे, आध्यात्मिकतेकडे पाहण्याची ही समाजाची, सामान्य माणसाची दृष्टी भयसूचक आहे.

कोणत्याही संवेदनशील माणसाला हादरवून टाकणारी ही घटना आहे. निरपराध माणसे मुंग्यांसारखी मेल्याने भक्तांमध्येसुद्धा संतापाची लाट उसळली असेल असे जर आपल्याला वाटत असेल तर तुम्हाला दुसरा हादरा बसेल. कारण काही कट्टर भक्त जे यातून बचावले त्यांनी मुलाखतीत सांगितले की, बाबाच्या प्रवचनातील चेंगराचेंगरीत त्यांचा मृत्यू झाला नाही त्यामुळे ते अभागी ठरले आहेत. 'ज्यांना आम्ही परमात्मा मानतो त्या बाबाच्या चरणी आमचे मरण ओढवले असते आणि आमचे पार्थिव अशाच लाखो भक्तांच्या पायाखाली तुडवले गेले असते तर ते आपले भाग्य ठरले असते'; एका पत्रकाराने घेतलेल्या मुलाखतीत अशी विवेकशून्य बडबड जाहीरपणे करताना एक महिला दिसते. खारघर, नवी मुंबई येथे आप्पा धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण देण्यासाठी जमवलेल्या गर्दीत उष्माघात आणि चेंगराचेंगरीत जे मृत्यू पावले, तिथल्या भक्तांनी देखील अशीच मते व्यक्त केली होती की, ही त्यांची अंधश्रद्धा नसून ती त्यांची त्या तथाकथित धार्मिक मार्गदर्शकावरील श्रद्धा आहे. तथाकथित धार्मिकतेने, आध्यात्मिकतेने समाजाची, सामान्य माणसाची जगाकडे, ऐहिकाकडे पाहण्याची दृष्टी किती विकृत करून टाकली आहे. असे निर्बुद्ध विचार ऐकून कोणताही संवेदनशील माणूस कपाळाला हात लावेल. परंतु अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्ता कपाळाला हात लावून नशिबाला दोष देत बसत नाही. तो संवेदनशील तर असतोच, त्याचबरोबर तो विवेकीसुद्धा असतो. धार्मिकतेच्या, आध्यात्मिकतेच्या नावाखाली सामान्य माणसामध्ये जाणीवपूर्वक अविवेक जोपासण्याची प्रक्रिया सतत चालू आहे, त्या अविवेकाचेच हे बळी आहेत. म्हणून समाजाला विवेकशील बनविण्याचा घेतलेला वसा अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्ता टाकू शकत नाही.

पर्यटनस्थळी अपघाताने मृत्यू होतात म्हणून त्या ठिकाणी गर्दी होणार नाही अशी खबरदारी घेतली जाते. पर्यटक मरतात, पण भाविकही मरतातच ना? मग धार्मिक कार्यक्रमांच्या ठिकाणी मृत्यू टाळण्यासाठी दक्षता का घेतली जात नाही? शासन आणि प्रशासनाची इच्छाशक्ती असल्यास याबाबत अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करून अशा बेफाम गर्दीला आळा घालता येईल आणि निरपराध जीवांचे जाणारे बळी टाळता येतील. परंतु शासन, प्रशासन आणि अशा भोंदू धार्मिक बाबाबुवांची अभद्र युती झाली आणि या तिन्ही घटकांनी आपला विवेक सोडला तर पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांकडून त्यांना विवेकाचे भान द्यावे लागेल. याच दिशेने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती विवेक जागराचे कार्य करीत आहे. सामान्य भक्तांना थेट मृत्यूच्या सापळ्यात लोटणाऱ्या तथाकथित सत्संग मेळाव्यांविरोधात अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे पाठबळ मिळेपर्यंत संघर्ष आणि प्रबोधनाच्या माध्यमातून लोकजागृती करीत राहू या.

**(लेखिका महा.अंनिसच्या राज्य निमंत्रीत सदस्या आहेत.)**

●



# जादुटोण्याच्या संशयावरून खून

**विलास निंबोरकर ।** गडचिरोली
८६०५९८०१६९

भारतीय समाज आजही खूप साऱ्या अंधश्रद्धांच्या जोखडाखाली आहे. तो या अंधविश्वासापायी कधी कधी हिंसक जीवघेणाही होतो. याचे उदाहरण म्हणून नागभीड येथील महिलेच्या अंगात देवी येण्याच्या या जादुटोण्याच्या संशयावरून आसाराम दोनाडकर याच्या खुनाच्या घटनेकडे पाहाता येईल.

सदरची घटना मंगळवार, दि. २५ जून, २०२४ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील मौशी येथे घडली. जादुटोण्याच्या संशयावरून मारहाण करून आसाराम दोनाडकर (वय ६७ वर्ष) या व्यक्तीचा खून झाला. हा खून त्याच गावातील जयघोष मैंद, श्रीकांत मैंद व देशमुख या तीन तरुणांनी केला. आसाराम दोनाडकर यांच्या घरी जाऊन त्याला जीव जाईस्तोवर या तिघांनी बेदम मारहाण केली. अखेर त्याचा त्यात जीव गेला. ही बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर याची दखल घेऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य कार्यवाह विष्णूदास लोणारे भंडारा, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर गडचिरोली, अंनिस जिल्हा चंद्रपूरचे कार्याध्यक्ष पी. एम. जाधव, भंडारा अंनिस शाखेचे कार्यकर्ते पुरुषोत्तम गायधने व ब्रह्मपुरी शाखेचे कार्याध्यक्ष सुधीर अलोने आदींनी मौशी येथे जाऊन घडलेल्या घटनेची वस्तुस्थिती जाणून घेतली. तेथील ग्रामपंचायत कार्यालयास भेट दिली. त्यावेळी कार्यालयात सचिव केळे साहेब व शिपाई उपस्थित होते आणि काही वेळापूर्वी सरपंच व उपसरपंच साहेब घरी गेले, असे सचिवांनी सांगितले. विष्णुदास लोणारे यांनी सचिव केळे यांना आम्हा सर्वांचा परिचय करून दिला व गावात येण्यामागील भूमिका समजावून सांगितली. आम्हाला सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष, मृत पावलेल्या कुटुंबीयांच्या व ज्यांनी जीव घेतला अशाही कुटुंबातील सदस्यांना भेट द्यायची आहे, असे सांगितले. यावर त्यांनी नलिनी मोरेश्वर ठाकरे, उपसरपंच दिगंबर शिवराम लोखंडे, पोलीस पाटील कल्पना गोवर्धन मिसार यांना संपर्क साधून बोलावून घेतले. सचिव केळे, संघम नारायण बांबोळे व दादाजी शंभरकर टेकाडी हेही यावेळी उपस्थित होते.

ज्या व्यक्तीला मारण्यात आले ती व्यक्ती जादुटोण्याचा संशय घेण्यासारखे कोणते काम करीत होता असे विचारले असता सरपंच मॅडम यांना त्या व्यक्तीबद्दल फारसे काही माहीत नसल्याचे सांगितले. तर उपसरपंच लोखंडे व पोलिस पाटील कल्पना गोवर्धन मिसार यांनी ती व्यक्ती कॅन्सर, मूळव्याधसारख्या आजारांवर जडीबुटी म्हणजे वनौषधी देत असल्याबाबत सांगितले. मंत्रतंत्र, करणी, अंगात येणे, फुकफाक किंवा भूतबाधा या संबंधाने तो लोकांचे काम करत होता का? याविषयी विचारणा केली असता असे काही ऐकले नाही असे समजले. त्यानंतर त्यांच्याचकडून मारेकऱ्यांविषयी काही माहिती मिळेल अशी अपेक्षा करून त्यांना काही प्रश्न विचारले तर त्यांच्या घरची परिस्थिती मोलमजुरी करून पोट भरणारे, दोघेही एकाच समाजातील असून जवळपास नातेसंबंधात येतात. त्यांच्यात कोणत्याही



प्रकारचे झगडे, भांडण नव्हते. त्यांची घरे परस्परांपासून फार लांब आहेत, मात्र हे कशावरून घडले हे सांगता येणे कठीण असल्याचे त्यांनी संगितले. मैंद भाऊ जेव्हा आसाराम दोनाडकर यांच्या घरी जाऊन त्यांना मारहाण करीत होते तेव्हा आसाराम दोनाडकर यांचा मोठा मुलगा घरीच असल्याने त्यांनी पोलिस पाटील कल्पना गोवर्धन

मिसार यांना फोनवर माहिती देऊन घरी येण्यासाठी बोलावले होते. तेव्हा त्या आसाराम दोनाडकर यांच्या घरी आल्या त्यावेळी आसाराम हा घरीच बेशुद्धावस्थेत पडलेला होता, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर लगेच आसाराम यांना त्यांच्या मुलांनी ब्रह्मपुरी येथील सरकारी रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली व आसाराम यांना मृत घोषित केले. त्याच दिवशी आसाराम दोनाडकरच्या लालाजी या मोठ्या मुलाने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तेव्हा तिन्ही दोषींवर पोलीस कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळाली.

त्यानंतर आम्ही सरपंच नलिनी ठाकरे व पोलिस पाटील कल्पना मिसार यांना सोबत घेऊन मयत व्यक्ती आसाराम दोनाडकर यांच्या परिवारातील सदस्यांना भेट देण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. आसाराम यांची ६५ वर्षीय पत्नी, मोठा मुलगा लालाजी वय ३९ वर्ष, लहान मुलगा



ज्ञानेश्वर वय ३३ वर्ष यांची भेट झाली. दोन्ही मुले बारावी शिकून शेतीत काम करीत होते. या कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवर चालतो. वडिलांना कॅन्सरवर औषध देण्याचा वडिलोपार्जित वसा लाभलेला असल्याने ते घरी येणाऱ्या कॅन्सर ग्रस्त रुग्णांना वनौषधी देत असत. या औषधीमुळे बऱ्याच लोकांना फायदा होत असे. त्यामुळे बरीच पेशंट मंडळी लांबून औषधीसाठी येत असत. या औषधीचे किती पैसे बाबा घेत होते असे विचारले असता, औषधी विनामूल्य देत असल्याबाबत सांगितले. परंतु ज्यांना फायदा व्हायचा ते स्वतःच स्वेच्छेने पैसे देत असत असेही कळले. मात्र ते कधीही कोणाला एवढे की तेवढे असे म्हणत नसत. असे असताना त्यांना का मारले कळत नाही असे घरच्यांचे मत आहे. मग मारण्यारखे त्यांनी काय केले असावे असे वाटते? असा प्रश्न केल्यानंतर त्यांनीही वरील माहिती सांगून यात तुम्हाला चुकीचे काय वाटते असा प्रश्नही उपस्थित केला. मारण्याइतकी शंका उपस्थित होण्यासाठी या कुटुंबीयांकडून काही तरी केले जात असावी अशी शंका येत होती; पण आम्ही ज्यांच्याकडून काहीतरी माहिती मिळेल अशी अपेक्षा करत होतो त्याच जबाबदार व्यक्तींना काहीच माहिती नाही म्हटल्यावर आता करायचे काय? कोणत्या प्रश्नांनी उत्तर मिळू शकेल असे विचार करत असताना घरातील सदस्यांना विश्वासात घेऊन विचारले की, तुमचे बाबा कोणाला काही पाणी भरून देत होते का? तर उत्तर नाही, काही राकळ भारून द्यायचे का? तर उत्तर नाही. कोणाच्या घरी बोलावणे येत होते का? बाहेर गेल्यानंतर काय करत होते माहीत नाही. पण घरून मात्र कोणीही बोलावून नेत नव्हते एवढे मात्र खरे असे उत्तर मिळणे अपेक्षित होते आणि तेही खरेच ठरले. जेव्हा आम्ही त्यांच्या घरी गेलो तेव्हा त्यांच्या अंगणात एक डेर (वाळलेल्या लाकडाचा खांब) गाडलेली होती आणि त्याच्या जवळ जमिनीवर लहान लहान तीन लोखंडी त्रिशूल गाडलेले होते व त्यावर शेंदूर फासलेले होते. तेव्हा त्यांच्या घरात रोग्यांवर उपचार करण्यासाठी कोणाच्या तरी अंगात येत असावे अशी शंका आली; पण मुलांनी, पत्नीने व उपस्थित असलेल्या शेजारच्या व्यक्तींनी वनौषधी व्यतिरिक्त काहीच करत नव्हते असे म्हणाल्याने ती गोष्ट शेवटी तशीच मनात ठेवून घरच्या मंडळींचा निरोप घेऊन आम्ही तिथून निघालो.

ज्यांनी त्या व्यक्तीचा जीव घेतला त्यांच्या परिवारातील सदस्यांना भेटण्यासाठी आम्ही सर्वजण त्यांच्या घरी आलो. मारेकऱ्यांची आई सुनंदा जयघोष मैंद व श्रीकांत मैंदची पत्नी शितल उपस्थित होते. तर दुसऱ्या मुलाची पत्नी ही सासुरवाडीत फार कमी राहाते आणि प्रकृतीच्या कारणास्तव जास्त करून माहेरी राहात असते असे सासू सुनंदाबाईने सांगितले. विष्णूदास लोणारे यांनी या घटनेचा काही सुगावा लागतो का म्हणून जुजबी प्रश्न विचारायला सुरुवात केली. तुमच्या मुलाने सदर व्यक्तीला मारण्याआधी घरात काही बोलणे झाले होते का? उत्तर – नाही. त्यांच्यासोबत घरगुती कारणांवर काही वाद होते का? उत्तर – नाही. तुमच्या घरात सतत कोणी आजारी असतात का? तेव्हा समजले आजारी म्हणून नाही पण दोन्ही मुलांचे एकाचवेळी लग्न झाले. दोन्ही सुनांना सारखेच दिवस राहिले मात्र एका सुनेला पूर्ण दिवस गर्भधारणा राहून मूल जन्माला आले आणि

दुसऱ्या सुनेचा सातव्या महिन्यात गर्भपात झाला, असे कळले. मग त्यांनी डॉक्टरऐवजी बाहेरच्या मांत्रिक, देवी यांचा सल्ला घेणे सुरू केले. पण सासू मात्र आढेवेढे घेत म्हणायची, ''आता कोणाचे पोरं आणि सुना सासवाले (सासुबाईला) सांगतात का जी. ते का करत होते न का नाही का. गोळ्या घेत राहाचे.''

त्यानंतर मग त्या दुसऱ्या सुनेला काही आहे का? पुन्हा म्हणाली, ''आता दुसऱ्या वेळी चार महिने झाले होते, ती माहेरी गेली होती. आणि माहेरी असतानाच घराच्या दरवाजावर उभी होती. तिले कोणत्या का सापाने चावाचा निमित्त झाला. बिचारी ती वाचली पण तिचा गर्भ उतरून गेला.'' मग या वेळी कोणाला दाखवले. पुन्हा अपेक्षित उत्तर तेच, ''आता आम्हाले सांगतेत का?'' मग तुम्हाला कसे माहीत झाले? -आमचा प्रश्न. तेव्हा ती म्हणाली, ''तुमच्यासारख्याकडून माहीत होत होते.'' मुलगा मारायला जाण्याआधी घरी आला होता का? मुलाची आई म्हणाली, ''आम्ही घरी बसून रायणारे आहूत का? दोन पैसे कमवून तं दोन चार घास खाऊन मिळतात.'' म्हणायचे तात्पर्य, मुलगा मारायला जाण्याआधी घरी येऊन गेला की नाही हे घरच्यांना माहीत नाही, असे त्यांचे म्हणणे होते. एका सुनेला मूल न होण्याचे कारण त्यांना सलत होते. कोणत्या तरी वैदूने मरणाऱ्या व्यक्तीने तुझ्या पत्नीला जादूटोणा म्हणा की करणी (बाहेर बाधा) केलेली आहे, असे सुचवले असावे, अशी शंका येते. दोन्ही मुले व सोबत असलेला देशमुख नामक व्यक्ती यांना दारूचे व्यसन होते. दारूचे व्यसन करूनच आसाराम दोनाडकर यांच्या घरी गेले व नशेच्या धुंदीत स्वतःच्या जीवाची पर्वा न करता त्यांनी त्याचा जीव घेतला, एवढे मात्र खरे.

आम्ही गावाकडे परत यायला निघालो तेव्हा एका झाडाखाली चार-पाच माणसं आपापसांत चर्चा करत होती. यांच्याकडून काही माहिती मिळू शकते का म्हणून मी गाडीत न बसता त्या घोळक्याजवळ गेलो. तेव्हा नेहमीप्रमाणे वयस्क माणसे हे कोणी तरी हेरगिरी करणारे असतील म्हणून आधीच कोणाचा का होता का आम्हाले का माहीत राहील. ते रायतेत तिकडे नं हे रायतेत इकडे. पण का झाला का. एकदमच झाला. नं जेव्हा पोलीस पकडून नेले तेव्हा फलान्याले मारले म्हणून माहीत झाला. एवढे ऐकल्यावर माझा एकच प्रश्न होता तो म्हणजे, जर हे कसूरदार असतील तर शिक्षा झाली पाहिजे की नाही? आणि दोषी नसतील तर यांची सुटका झाली पाहिजे की नाही? न्याय तं मिळालाच पाहिजे. मग सांगा न्याय कसा मिळेल? साक्षी पुरावे पाहिजे की नाही? तुम्ही लोक काहीही सांगणार नसाल तर कोणाची बाजू सत्याची आहे हे कोणी कसे ठरवावे? न्यायाधीशाला पुरावे पाहिजे की नाही? असो, आम्ही कोणी पोलिसांचे गुप्तहेर नाहीत, असे सांगून आमचा परिचय करून दिला. गावात येण्यामागचा हेतू सांगितला. तेव्हा एक म्हातारा माणूस म्हणाला, आजी, सांगू का? त्या मरणाऱ्या व्यक्तीच्या बायकोच्या अंगात देवी येत होती. जवळच्या गावातून बरेच लोक दाखवाले येत होते. ज्याईले गुण दिसत होता ते पुन्हा पुन्हा यायचे, आम्ही जात होतून. आम्हाले गुण घडाचा तं आम्ही जावाचे. ज्याईले गुण घडला नाही ते नाही यायचे. बऱ्याच जणांना फायदाही होत होता. पण त्यांच्या घरचे म्हणत होते की, आमचे बाबा फक्त कॅन्सरवर औषध द्यायचे. पैसे कोणाकडूनही घेत नव्हते. मंत्रतंत्र, करणी, अंगात येणे असे काहीही करत नव्हते. तेव्हा ती व्यक्ती म्हणाली, खोटे सांगत आहेत. आमच्या एका कार्यकर्त्याने त्या वृद्ध महिलेच्या कपाळावर पडलेला मोठा डाग पाहून म्हणाले की, ''तुमच्या कपाळावर एवढा मोठा डाग कशाचा आहे? केव्हापासून आहे?'' तेव्हा ती म्हणाली, ''आजी, कुंकवाचा हो, आजकाल कुंकू कोठी असली मिळते, सगळंच डुप्लिकेट.'' मग आम्ही सर्वांनी निष्कर्ष काढला की, दोन्हीकडील लोक जरी खरे सांगत नसले तरी वस्तुस्थिती हीच असावी की, हे सर्व प्रकार अज्ञान, गैरसमज व समाजामध्ये रुतून बसलेला जादुटोणा, करणी, भानामती, चेटूक, कोणत्या तरी शक्तीचा वापर करून दुसऱ्याचे नुकसान करणे आदी बाबींवरील प्रचंड विश्वास होय. हे काढून टाकण्यासाठी शासनाच्या पुढाकाराने गावागावांत अंधश्रद्धा निर्मूलन मोहीम मोठ्या प्रमाणात राबविण्यात आली पाहिजे.

ग्रामपंचायतमध्ये आम्ही उपस्थित लोकांना आम्ही अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाविषयी माहिती देऊन सरपंच, उपसरपंच व पोलिस पाटील यांना महाराष्ट्र अंनिपचे मासिक व जादुटोणाविरोधी कायद्याची पुस्तिका दिली. सहकार्य केल्याबद्दल त्यांचे अभार व्यक्त केले. ग्रामपंचायतमध्ये सदर मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी सांगितले आणि आम्ही मौशी गावाचा निरोप घेतला.

**(लेखक महा.अंनिसच्या वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह आहेत.)**

●

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
## *वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग*

**‘बुवाबाजी नष्ट करू या, वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवू या!’**

शालेय शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन हे नीतिमूल्य संविधानाच्या चौकटीत राहूनच रुजविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करायला हवेत. समाजात बुवाबाजी, भोंदूगिरी, छद्मविज्ञान, फलज्योतिष, भ्रामक वास्तुशास्त्र अशा विविध अंगांनी शोषण होते आहे. एकीकडे एकविसावे शतक हे विज्ञान आणि तंत्रज्ञान युगाचे म्हणून ओळखले जाते, तर दुसरीकडे नरबळी, पैशांचा पाऊस पाडणे, मांडूळ जातीच्या सापांची गुप्त धनासाठी तस्करी करणे, देवाधर्माच्या, भुताटकीच्या नावाखाली शारीरिक, मानसिक, आर्थिक, लैंगिक फसवणूक केली जात असल्याचे दिसून येते. यामागे केवळ आणि केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव हेच कारण अभ्यासाअंती दिसून आले आहे. यासाठी यावर मूलगामी व प्रभावी उपाय म्हणून विद्यार्थिदशेतच, अगदी लहान वयातच विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन दिले, त्यांना वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय हे समजावून सांगितले, वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी आपण जर प्रयत्न केले तरच त्याचा परिणाम पुढील काही पिढ्यांमध्ये दिसून येईल. भारतीय राज्यघटनेत ५१अ कलमानुसार वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांना चिकित्सा करण्याची, प्रश्न विचारण्याची, प्रत्येक घटनेमागील कार्यकारणभाव जाणून घेण्याची सवय लहान वयातच झाली तर भविष्यात हे विद्यार्थी डोळस आणि सुज्ञ नागरिक म्हणून समाजात वावरताना दिसतील. त्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा ‘वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग’ डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मरणार्थ पाळल्या जाणाऱ्या ‘वैज्ञानिक दृष्टीकोन दिवसा’पासून (२० ऑगस्ट) ‘भोंदूगिरी नष्ट करू या, वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवू या’ हे अभियान सुरू करीत आहे. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक शाखेने राबवायचे आहेत.

१) प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर घेणे.
२) विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन प्रकल्प राबविणे.
३) चमत्कार सादरीकरण करणे.
४) ‘वयात येताना’ हा कार्यक्रम मुलामुलींसाठी आयोजित करणे.
५) सर्पविज्ञान प्रबोधन कार्यक्रम आयोजित करणे.

वरील उपक्रम राबविण्यासंदर्भात शाखांना व कार्यकर्त्यांना व्यक्तिगतरीत्यासुद्धा माहितीचा पूर्ण आराखडा देण्यात येईल. उपक्रम राबविल्यानंतर त्याची माहिती वृत्तपत्रात प्रसिद्धीसाठी देऊन सदर माहितीचे संकलन स्वतः जवळ ठेवावे; तसेच जिल्हा शाखेलाही कळवावे. जिल्हा शाखेने संबंधित विभागाच्या राज्य पदाधिकाऱ्यांना व्हॉट्सअपद्वारे रिपोर्टिंग करावे.

- **दिगंबर कट्यारे**, राज्य कार्यवाह, ९८६०३११३२२
- **विलास निंबोरकर**, राज्य सहकार्यवाह, ८६०५९४०१६९
- **प्रकाश कांबळे**, राज्य सहकार्यवाह, ९४२३११८७३०

**आवाहन**

**चमत्कार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला २५ लाख रुपयांचे आव्हान समितीने दिले आहे. चमत्काराचा दावा करणाऱ्या व्यक्तींना समितीची आव्हान प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.**
**संपर्क : ९४०४८७०४३५**

# महा. अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत** । पालघर
९८२३२८०३२७

**सामाजिक न्याय दिन**

**कोराडी :** शाखेच्या वतीने छ. राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून तसेच अंमली पदार्थ सेवनविरोधी दिन असा संयुक्त कार्यक्रम महादुला येथे साजरा करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांनी उपस्थित मजूर वर्गाला संबोधित केले. यावेळी नशाबंदी मंडळातर्फे पोस्टर प्रदर्शनी आयोजित केली होती व व्यसनांचे दुष्परिणाम दर्शवणारी पत्रके वितरीत करण्यात आली. कार्यक्रमाला शाखा अध्यक्ष ताराचंद पखीडे, जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, उमेश भोसकर, यशोदा मेश्राम, माला कोयींबे यांचेसह महिला व पुरुष मजूरवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला सहभाग शाखा कार्यवाह मीनाक्षी सोनटक्के यांनी तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन शाखा कार्याध्यक्ष बबन गायकवाड यांनी केले.

**अहमदपूर :** अहमदपूर शाखा आणि ज्ञानदीप मिलिटरी अक्॑डमीच्या संयुक्त विद्यमाने, राजर्षी छ. शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. डॉ. सखाराम वाघमारे या कार्यक्रमाचे व्याख्याते होते. याप्रसंगी डॉ. वाघमारे यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंनिसचे शाखा उपाध्यक्ष एन. डी. राठोड, तर प्रमुख पाहुणे अक्॑डमीचे संस्थापक माजी सैनिक उद्धव इप्पर, हरीदास तम्मेवार, शाखा प्रधान सचिव उमाकांत पाचंगे, ताडमे सर, ॲड. रमेश गायकवाड, सूर्यकांत बोईनवाड सर, एन. डी. दुर्गे, गौतम कांबळे, नागनाथ पारेकर, नितीन गुट्टे, राम मेजर, जितेंद्र मेजर, कुर्जर मॅडम, दै. ‘चालूवार्ता’चे तालुका प्रतिनिधी हनुमंत सोमवारे व मिलिटरी क॑म्पचे विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अहमदपूर शाखेचे कार्याध्यक्ष रमेश भालेराव यांनी केले तर आभार उद्धव इप्पर साहेब यांनी मानले.

**घणसोली :** शाखेतर्फे राजर्षी छ. शाहू महाराज जयंती निमित्ताने कोपरखैरणे मधील ’यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ आर्ट, कॉमर्स न्ड सायन्स’ येथे मा. उत्तम रोकडे व मा. राजेंद्र पंडित यांचे व्याख्यान झाले. शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणांच्या प्रेरणा घेऊन टाकाऊ कालबाह्य रूढी परंपरांचा त्याग करू या, असा व्याख्यानातून संदेश देण्यात आला. व्याख्यानाला प्राचार्य डॉ. लक्ष्मण तळणीकर, डॉ. कविता शिंदे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह महा. अंनिसचे गजानंद जाधव, ए. एच. शाह व अशोक निकम तसेच ८५ विद्यार्थी उपस्थित होते.

**लातूर :** २६ जून रोजी राजर्षी छ. शाहू महाराजांच्या जयंती निमित्त माजी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. गौतम बुद्ध ते संत तुकाराम महाराज यांच्या तत्त्वज्ञानाचे सार म्हणजे राजर्षी शाहू महाराज यांचे जीवनकार्य होय, असे मत डॉ. रोडे यांनी व्यक्त केले. सामाजिक न्यायाचे जनक राजर्षी शाहूंचा शैक्षणिक दृष्टीकोन उदात्त व प्रगत होता परंतु आजही त्यांच्या विचारांना अभिप्रेत शैक्षणिक क्रांती घडवू शकलो नाही, असेही ते म्हणाले. यावेळी विचारपीठावर राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य सरचिटणीस रुक्साना मुल्ला, ‘उचल्याकार’ लक्ष्मण गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय समारोपात माधव बावगे म्हणाले, ‘मानवतेची व समतेची पताका रोवणाऱ्या शाहू महाराजांचा आदर्श शासनकर्त्यांनी व प्रशासकीय यंत्रणेने घ्यावा’. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य पदाधिकारी उत्तरेश्वर बिराजदार यांनी केले. सूत्रसंचालन शहर अध्यक्ष डॉ. दशरथ भिसे यांनी तर आभार प्रदर्शन प्रधान सचिव सुधीर भोसले यांनी केले.

**बोदली:** दिनांक २८ जून २०२४ ला ग्रामपंचायत कार्यालय, बोदली येथे महा. अंनिसची शाखा कार्यकारिणी गठित करण्यासाठी सभा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष देवेंद्र मेश्राम तर प्रमुख

मार्गदर्शक म्हणून महा. अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर व प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच आकाश निकोडे व उपसरपंच भगवान चिळंगे उपस्थित होते. छ. शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून व सामाजिक न्याय दिवस साजरा व्हावा या हेतूने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व सर्व संमतीने पुढील एक वर्षासाठी कार्यकारिणी गठित करण्यात आली. अध्यक्ष देवेंद्र आनंदराव मेश्राम, उपाध्यक्ष बाबुराव केशवराव गेडाम, अर्चना कवासे (राऊत), कार्याध्यक्ष आकाश गजानन निकोडे, प्रधान सचिव भगवान दादाजी चिळंगे, विविध उपक्रम विभाग प्रमुख सुजाता दिवाकर पिपरे, महिला सहभाग कार्यवाह भावना तुलसीदास भोयर, सदस्य गीता तुलसीदास चिळंगे, देवाजी नैताम, देवेंद्र रामदास पिपरे.

**नवेगाव/मुरखळा :** राजर्षी छ. शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस म्हणून ग्रामपंचायत, मुरखळा व महा. अंनिसची शाखा नवेगाव/मुरखळा यांचे संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामपंचायत मुरखळाचे सरपंच दशरथ चांदेकर, उमाजी खेवले सदस्य तथा कार्याध्यक्ष महा.अनिस, परमानंद पुनमवार सदस्य ग्रामपंचायत मुरखळा, कोठारे साहेब कार्याध्यक्ष महा.अंनिस, हरिदास कोटरंगे शहर प्रधान सचिव, उपेन्द्र रोहनकर शहर कार्याध्यक्ष, रवि नागापुरे प्रधान सचिव महा. अनिस शाखा मुरखळा, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी तथा महा. अनिसचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

### बकरी ईद रक्तदान अभियान

**नंदुरबार :** बकरी ईद निमित्त महाराष्ट्र अंनिसच्या नंदुरबार शाखेच्या वतीने रक्तदान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. नंदुरबार येथील जनकल्याण रक्तपेढीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन वेळी अंनिसचे सोशल मीडिया विभागाचे राज्य कार्यवाह कीर्तिवर्धन तायडे, जिल्हा प्रधान सचिव वसंत वळवी, शाखेचे कार्याध्यक्ष सूर्यकांत. आगळे, बलदेव वसईकर, सुबोध अहिरे, फिरोज खान, दीपक चौधरी, अनंतकुमार सूर्यवंशी, प्रा. अमजद पठाण, प्रा. शेख शौकत अली मसूद व कार्यकर्ते उपस्थित होते. तायडे यांनी रक्तदान शिबिराची भूमिका स्पष्ट केली.

**पनवेल :** पनवेल मधील विविध सामाजिक संघटना गेली सहा वर्षे बकरी ईद निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करत आहेत. यावर्षीही १६ जून रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पनवेल येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मुस्लिम समाजातील पन्नासहून अधिक रक्तदात्यांमध्ये पुरुषांबरोबरच स्त्रियांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ईद साजरी करण्याचा हा परिवर्तनाचा मार्ग कौतुकास्पद आहे. शाखा पनवेल, संविधान प्रचारक, अंजुमन फराजंदन ए तौहीद एज्युकेशन अँड वेल्फेअर ट्रस्ट, सर्वोदय, राष्ट्र सेवा दल, ग्रामस्वराज्य समिती महाराष्ट्र, ग्राममित्र, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्था, कुष्ठरोग निवारण समिती शांतीवन, युसुफ मेहेरअली सेंटर, तारा, मिशन माणुसकी अशा विविध संघटनांच्या सहभागातून हा उपक्रम पार पडला. रोटरी ब्लड बँक, खांदा कॉलनीच्या सहकार्यातून हे शिबिर संपन्न झाले.

### व्याख्यानाचे आयोजन

**हिंगणघाट :** शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ अभ्यास वर्गाच्या १५८ व्या व्याख्यान मालिकेत 'समाजातील साहित्य' या विषयावर महा. अंनिसच्या हिंगणघाट शाखेचे जिल्हाध्यक्ष लेखक कवी प्रा. अभिजीत डाखोरे यांचे व्याख्यान वर्धा वर्धन हाट सभागृहात गुरुवारी २७ जूनला आयोजित करण्यात आले. यावेळी मंचावर महा. अंनिसचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार, जिल्हा महिला विभागाच्या कार्यवाह द्वारकाताई ईमडवार उपस्थित होते. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष अरुण भोसले यांनी पीपीटी द्वारे जिल्हात राबविण्यात आलेले उपक्रम, कार्यक्रम यांचा आलेख मांडला. सूत्रसंचालन शहर शाखेचे युवा विभाग कार्यवाह शुभम सोळंके यांनी केले तर प्रास्ताविक जिल्हा विविध उपक्रम विभागाचे कार्यवाह निखिल जवादे यांनी व आभारप्रदर्शन विवेक वाहिनीच्या जिल्हा कार्यवाह डॉ मंजुषा देशमुख यांनी केले. यावेळी वर्धा जिल्हा शाखेला मिळालेले सन्मानचिन्ह जिल्हा प्रधान सचिव सुनील ढाले यांना तर राज्य कार्यकारिणीने दिलेला लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार डॉ मंजुषा देशमुख यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी जिल्हा उपक्रम विभागाच्या कार्यवाह डॉ माधुरी झाडे, वैज्ञानिक जाणिवा शिक्षक प्रशिक्षण विभागाचे राज्य सहकार्यवाह प्रकाश कांबळे, राज्य महिला विभागाच्या राज्य सहकार्यवाह सारिका डेहनकर, शंकर श्रीरामे, रूपेश वैद्य, चैतन्य धनविज, राजेश डेहनकर, तनू वराडे, ज्योती भोसले, रजनी सुरकार आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

**घाटकोपर :** शाखेतर्फे वटपौर्णिमेनिमित्त दि. १९ जूनला रात्री ९ ते ११ ऑनलाइन मुक्तसंवाद आयोजित करण्यात आला. संवादाचा विषय होता 'सावित्री सत्यवानाची, की ज्योतिबाची?' या विषयावर डॉ सुषमा बसवंत आणि आरती नाईक यांनी मार्गदर्शन केले. या ऑनलाइन संवादाला ६० पेक्षा जास्त उपस्थिती होती.

**निमगुळ :** वटसावित्री पौर्णिमेच्या निमित्ताने निमगुळचे कार्यकर्ते दिलीप खिंवसरा यांनी महिलांना झाडांची रोपे वाटप केली. यावेळी दिलीप खिंवसरा यांनी सांगितले की, कोणतेही सण उत्सव विधायक, कृतिशील, पर्यावरणपूरक साजरे करणे काळाची गरज आहे. शेवटी सर्वांनी 'झाडे लावा, झाडे जगवा' अशा घोषणा दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

### प्रशिक्षण शिबीर

**कोल्हापूर :** शाखा पदाधिकारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण कागल येथे घेण्यात आले. या प्रशिक्षण कार्यशाळेत डॉ. प्रवीण चौगुले सरांनी Leadership Development व डॉ. बी एम हिर्डेकर सरांनी Critical Thinking या विषयांवर मार्गदर्शन तर केलेच परंतु निवास व्यवस्था व प्रशिक्षणासाठी हॉल मिळवून देण्यात दोघांचेही मोठे योगदान आहे. कृष्णात स्वाती यांनी संघटना बांधणीसंदर्भात मार्गदर्शन केले. काही सांघिक खेळ, प्रबोधन गीते, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींची रेलचेल या शिबिरात होती. कृष्णात स्वाती, रेश्मा खाडे यांच्यासह कागल, कोल्हापूर व करवीर शाखेच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घेऊन शिबिर यशस्वी केले. यावेळी जिल्ह्यातून जवळपास ४० कार्यकर्ते प्रशिक्षणात सहभागी झाले होते. समारोपाच्या प्रसंगी दि कागल एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी प्रताप उर्फ भैया माने यांनी सदिच्छा भेट दिली व कामाचा आढावा घेतला.

### कार्यकर्ता संवाद मेळावा

**नागपूर :** दर तीन महिन्यांनी होणारा कार्यकर्ता संवाद व नियोजन बैठक राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांचे अध्यक्षतेखाली येथील रवि भवन सभागृहामध्ये मेळावा स्वरूपात संपन्न झाला. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांनी कार्यकर्त्यांना आम्ही सारे दाभोलकर बनायला सज्ज व्हावे, अशी प्रेरणा दिली. तसेच हाथरस दुर्घटनेबाबत संवेदना व्यक्त करताना जनतेने बुवाबाबांच्या मागे न जाता समाज सुधारकांच्या विचारांच्या वाटेवर चालावे असेही संबोधित केले. अध्यक्षीय मनोगतात गजेंद्र सुरकार यांनी कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाची गरज अधोरेखित करतांना म्हटले की, प्रशिक्षित कार्यकर्ते दुर्गम भागात जाऊन समाजाचे प्रबोधन करीत आहेत. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा प्रधान सचिव अशोक खोरगडे यांनी संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने केली. उपस्थितांनी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार प्रसार करणाऱ्या महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांबद्दल कौतुकाचे उद्गार काढले. जिल्ह्यातील विविध शाखांमधून जिल्हा प्रधान सचिव विनोद उलीपवार, अशोक खोरगडे, सुधाताई बामनपल्लीवार, सेवकराम राऊत, मनीष अडांगळे, मनीषा साखरे, माधुरी बारमासे, प्रतिभा खोब्रागडे, नरेंद्र पाटील, विजय मोकाशी, लता ढोक, दीपा चव्हाण, सुभा थुलकर, अंकिता हुलके, मंगेश राऊत, अशोक पाटील, दामोदर शंभरकर, मीनाक्षी सोनटक्के, संगीता आळणे, रंजना कोल्हे, विलास भालेराव, विश्वास पित्तुलवार, दिवाकर शिर्के, शैलेश चौधरी, गुणवंतराव लकडे, सुधाकर आडे, गुलाब साबळे, अनुज हुलके, ताराचंद पखिडे, निरंजन फिराके, राहुल चोरे, निखिल पुरी, सुनील करडमारे, विनोद तांदूळकर, अतुल शनेश्वर, पल्लवी तांदूळकर, महेंद्र दिवटे, शोभाताई राऊत, सुनंदा गायकवाड, अलका माटे, डॉ. एम. एस. वानखेडे, रवींद्र राऊत इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी केले तर सूत्रसंचालन जोडीदाराची विवेकी निवड विभागाच्या जिल्हा कार्यवाह डॉ. कविता मते यांनी केले. 'हम होंगे कामयाब...' या सामूहिक गीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

●

## राष्ट्रव्यापी अंधश्रद्धा विरोधी कायदा हवा

### हाथरस दुर्घटनेसंदर्भात काँग्रेस अध्यक्ष खर्गेंची मागणी

#### मुद्दा राज्यसभेत उपस्थित

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

हाथरस चेंगराचेंगरीबद्दल राज्यसभेने बुधवारी शोक व्यक्त केला आणि मृतांना श्रद्धांजली वाहिली. भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी ठोस यंत्रणा निर्माण करण्यास कटिबद्ध असल्याचेही वरिष्ठ सभागृहाकडून सांगण्यात आले.

विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी, महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांत अंधश्रद्धा आणि काळी जादू प्रतिबंधक कायद्याच्या धर्तीवर देशातही असाच कायदा लागू



करण्याची मागणी केली.

सभापती जगदीप धनखड यांनी दुर्घटना दुर्दैवी असल्याचे सांगितले. सदस्यांनी काही काळ मौन पाळून मृतांना श्रद्धांजली वाहिली.

प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून, या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशही देण्यात आल्याचे सभापतींनी सांगितले.

हाथरससारख्या घटना टाळता येतील, असे सांगून सभापती म्हणाले. अशा प्रकारच्या मेळाव्याच्या वेळी कोणत्या प्रकाराची व्यवस्था करावी आणि कोणत्या प्रकाराची यंत्रणा असावी यावर सभागृहाने चर्चा करणे आवश्यक आहे. अशा घटना घडू नयेत, म्हणून स्थानिक प्रशासनाने संवेदनशील असण्यावरही त्यांनी भर दिला. असे अपघात घडण्यामागे अंधश्रद्धा हे प्रमुख कारण असून, त्यासाठी कोणताही कायदा नसल्याची खंत खर्गे यांनी व्यक्त केली.

## महा. अंनिसचे विविध उपक्रम



वटपोर्णिमेनिमित्त 'तुही रे माझा मितवा' कार्यक्रम उत्साहात संपन्न (कोल्हापूर)



वटपोर्णिमेनिमित्त 'आम्ही समतावादी' अभियान (पनवेल) आरती, महेंद्र, प्रियांका, पूजा, मनोहर तांडेल व साथी

## छ.राजर्षी शाहू महाराज यांची १५० वी जयंती (सामाजिक न्याय दिन)



घणसोली (नवी मुंबई) उत्तम रोकडे, राजेंद्र पंडित व साथी




(लातूर) माधव बावगे, अनिल दरेकर व साथी




अहमदपूर (लातूर) डॉ. सखाराम वाघमारे, एन. डी. राठोड व साथी



नवेगाव-मुरखळा (गडचिरोली) विठ्ठलराव कोठारे, उपेंद्र रोहनकर, हरिदास कोटरंगे व साथी




कोराडी (नागपूर) जगजीत सिंग, ताराचंद पखीडे, गौरव आळणे व साथी




पनवेल (रायगड) अल्लाउद्दीन शेख, आरती नाईक, प्रियांका खेडेकर व साथी

ISSN : 2584-0398 Registered News Paper

Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025

R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025

Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक आठवा, ५ ऑगस्ट २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-

Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 8, 5th August 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट **'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



**वार्षिक वर्गणीदार व्हा!**
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क - व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.